
ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५

येथें वाग्यज्ञे तोषावे

महाराष्ट्र साहित्य परिषद



जानेवारी २०२६ मध्ये सातारा येथे आयोजित केल्या जाणाऱ्या
९९ व्या, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे
नियोजित अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक मा. विश्वास पाटील

## ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन - बोधचिन्ह







## ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन - बोधचिन्ह
## अनावरण सोहळा क्षणचित्रे

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

**अंक क्र. ३८८**

**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५**

संपादक । **सुरेश देशपांडे**

प्रकाशक । **सुनिताराजे पवार** प्रमुख कार्यवाह

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**

४९६, सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ४११०३०.

दूरभाष । ०२०-२४४७५९६३

संकेतस्थळ । www.sahityaparishad.org

ई-मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।
सकाळी ९.३० दुपारी १२.३०
दुपारी ५.०० ते रात्री ८.००

महाराष्ट्र
साहित्य
परिषद

# मसाप पत्रिका


**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५**

**अंक ३८८**

संपादक
**सुरेश देशपांडे**

मुद्रक–प्रकाशक
**सुनिताराजे पवार**
प्रमुख कार्यवाह,
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्य**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मूल्य : **६० रुपये**



संपादक मंडळ

**प्रा. मिलिंद जोशी**
**सुनिताराजे पवार**
**विनोद कुलकर्णी**
**वि. दा. पिंगळे**
**अंजली कुलकर्णी**
**शिरीष चिटणीस**
**जयंत येलूलकर**
**माधव राजगुरू**


---


या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक, संपादन समिती, सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

**मसाप पत्रिका** । **ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५**

संपादकीय । **सुरेश देशपांडे । ७**

विश्वासरावांचा समृद्ध विशाल अक्षर कॅनव्हास । **रामदास खरे । ८**

तपस्वी इतिहासकार : गजानन भास्कर मेहेंदळे । **प्रा. डॉ. राजा दीक्षित । १६**

भैरप्पा गेले तेव्हा! । **गणेश कुलकर्णी । ३०**

९९ वे साहित्य संमेलनाची पालखी साताऱ्यात । **महादेव गायकवाड । ३७**

**साहित्य संमेलने – अध्यक्ष आणि वर्ष सूची । ३९**

ग्रामीण साहित्य प्रवाह : काही निरीक्षणे । **प्रा. डॉ. राजाभाऊ विनायक भैलुमे । ४३**

**कार्यवृत्त । ५०**

महाराष्ट्र साहित्य परिषद

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
## कार्यकारी मंडळ (२०२१-२०२६)

### विश्वस्त मंडळ

**प्रा. डॉ. शिवाजीराव कदम** **डॉ. पी. डी. पाटील** **यशवंतराव गडाख**

### पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

अध्यक्ष । **डॉ. रावसाहेब कसबे**

उपाध्यक्ष । **विद्याधर अनास्कर** उपाध्यक्ष । **डॉ. तानाजीराव चोरगे** उपाध्यक्ष । **राजीव बर्वे**

कार्याध्यक्ष । **प्रा. मिलिंद जोशी** प्रमुख कार्यवाह । **सुनिताराजे पवार**

कोषाध्यक्ष । **विनोद कुलकर्णी** पत्रिका संपादक । **सुरेश देशपांडे**

### स्थानिक कार्यवाह

व्याख्याने व स्मृतिदिन । **शिरीष चिटणीस**

विशेष पारितोषिके । **मृणालिनी कानिटकर-जोशी**

वार्षिक ग्रंथ पारितोषिके । **अंजली कुलकर्णी**

परीक्षा विभाग । **माधव राजगुरू**

ग्रंथालय विभाग । **वि. दा. पिंगळे**

अतिथीनिवास-वास्तू देखभाल । **ॲड. प्रमोद आडकर**

### सदस्य

**डॉ. आशुतोष जावडेकर** (पुणे शहर)
**डॉ. सतीश देसाई** (पुणे शहर)
**ज्योत्स्ना चांदगुडे** (पुणे शहर)
**रावसाहेब पवार** (पुणे जिल्हा)
**राजन लाखे** (पुणे जिल्हा)
**डॉ. पुरुषोत्तम काळे** (पुणे जिल्हा)
**रवींद्र बेडकिहाळ** (सातारा जिल्हा)
**सोपानराव चव्हाण** (सातारा जिल्हा)
**पद्माकर कुलकर्णी** (सोलापूर जिल्हा)
**ॲड. जे.जे. कुलकर्णी** (सोलापूर जिल्हा)
**कल्याण शिंदे** (सोलापूर जिल्हा)
**नंदकुमार सावंत** (सातारा जिल्हा)
**प्रकाश देशपांडे** (कोकण)
**राजीव जोशी** (ठाणे जिल्हा)
**पद्माकर शिरवाडकर** (ठाणे जिल्हा)
**सुरेश देशपांडे** (ठाणे जिल्हा)
**प्रकाश होळकर** (नाशिक जिल्हा)
**ॲड. नितीन ठाकरे** (नाशिक जिल्हा)
**चंद्रकांत पालवे** (अहमदनगर जिल्हा)
**जयंत येलूलकर** (अहमदनगर जिल्हा)
**प्राचार्य तानसेन जगताप**(जळगाव जिल्हा)
**डॉ. शशिकला पवार** (धुळे जिल्हा)
**प्रा. दशरथ पाटील** (सांगली जिल्हा)
**राजन मुठाणे** (कोल्हापूर जिल्हा)

# संपादकीय

नमस्कार,

हा अंक आपल्या हाती येईपर्यंत दिवाळी होऊन गेली असेल, तरीदेखील काहीशा उशिराने सर्व वाचकांस आगामी वर्ष साहित्यानंदाचे जावो, ही शुभेच्छा!

साहित्याचा आनंद वाढवणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची तयारी आता जवळपास पूर्ण होत आली असेल. साहित्य संमेलनाचे पडघम वाजायला सुरुवात झाली, की सर्वांनाच नेहमी उत्सुकता असते ती, यंदाचे साहित्य संमेलन कुठे भरणार आहे आणि अध्यक्ष कोण असतील? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे सप्टेंबर महिन्यातच मिळाली आणि संमेलनाची माळ सातारा या ऐतिहासिक शहराच्या गळ्यात पडली आणि या ऐतिहासिक परंपरेत शोभून दिसतील असेच; भारदस्त व्यक्तिमत्त्वाचे आणि इतिहासविषयकही लेखन करणारे कादंबरीकार; मा. श्री. विश्वासराव पाटील यांची अध्यक्षपदी निवड झाली, ही आनंदवार्ताही आली.

या आनंदावर विरजण पडणाऱ्या काही घटनाही घडल्या, त्या म्हणजे ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि शिवचरित्रकार, युद्ध इतिहासाचे व्यासंगी संशोधक अभ्यासक गजानन भास्कर मेहेंदळे यांच्या दु:खद निधनाची बातमी (१७ सप्टेंबर २०२५) येऊन पोहोचते न पोहोचते तोच २४ सप्टेंबर २०२५ या दिवशी ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या निधनाची बातमी आली. अवघे साहित्य विश्व झाकोळून गेले. त्यांच्या कादंबरीतील अत्यंत सूक्ष्म तपशीलही उमाताई कुलकर्णी यांनी सरस अनुवादांच्या रूपाने मराठी वाचकांपर्यंत पोहोचवले, त्यामुळे भैरप्पा यांना वि. स. खांडेकर यांच्याइतकीच लोकप्रियता मिळाली. त्यांच्या कादंबऱ्यांतील तत्त्वज्ञान, वैचारिकता ही वाचकांना कधीही जड वाटली नाही.

या सर्व घटनांची नोंद घेणारे लेख या अंकात वाचावयास मिळतील. कादंबरीकार विश्वासराव पाटील यांच्यावरचा श्री. रामदास खरे यांचा लेख, गजानन भास्कर मेहेंदळे यांच्यावरील श्री. राजा दीक्षित यांचा लेख, भैरप्पा यांच्याशी परिचित श्री. गणेश कुलकर्णी यांचा लेख तसेच सातारा शहर आणि साहित्य संमेलन– असा दृष्टिक्षेप टाकणारा महादेव गायकवाड यांचाही लेख असा उत्तम वाचनीय ऐवज असलेला अंक वाचकांच्या पसंतीस उतरेल, अशी खात्री आहे. त्यासोबतच आतापर्यंतच्या साहित्य संमेलनांची स्थळे आणि अध्यक्ष अशी एक सूचीही आहे, जी साहित्य अभ्यासकांना उपयोगी पडू शकेल. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील साहित्यविषयक कार्यक्रमांची माहिती देणारे 'शाखा–वृत्त' आणि पुस्तक परीक्षण ही नेहमीची सदरे आहेत.

हा अंक हातात येईपर्यंत नवीन वर्ष सुरू होईल... नवीन वर्षाच्या अनेक शुभेच्छा!

■■

**सुरेश देशपांडे**

# विश्वासरावांचा समृद्ध विशाल अक्षर कॅनव्हास

**रामदास खरे**

सातारा या ऐतिहासिक शहरात ९९ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन, जानेवारी २०२६ मध्ये आयोजित केले आहे, या बातमी पाठोपाठ या संमेलनाच्या अध्यक्षपदी वाचकप्रिय कादंबरीकार मा. विश्वास पाटील यांची निवड झाल्याची सुखद बातमी आली आणि अवघे साहित्यविश्व आनंदित झाले. साताऱ्यासारख्या ऐतिहासिक शहरात, इतिहासावर समर्थपणे लिहिणाऱ्या आणि भारदस्त व्यक्तिमत्त्वाच्या विश्वासराव पाटील यांची निवड होणे हा सुयोग आहे, असेच म्हणावे लागेल. प्रशासकीय अधिकारी म्हणून आणि साहित्यिक म्हणून विश्वासराव पाटील यांना महाराष्ट्रातील सामाजिक प्रश्नांची सखोल जाणीव आहे म्हणून त्यांच्या लेखनात इतिहासासह सामाजिक विषयही दिसून येतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि साहित्याचा मागोवा घेणारा लेख...

'इतिहास' म्हणजे नक्की काय? याचे उत्तर या शब्दातच सामावलेलं आहे. 'इति + ह् + आस' म्हणजे 'असे झाले', 'याप्रमाणे घडले', आणि ज्याप्रमाणे ते घडले त्याप्रमाणे ते सर्वांना सांगितले आणि नंतर ते लिहूनही ठेवले. प्राचीन वास्तू, किल्ले, ताम्रपट, शिलालेख, नाणी, शिल्पे, हत्यारे, पोथ्या, जीर्ण कागदपत्रे, बखरी इत्यादी सर्व साधनसामुग्रीचा पद्धतशीर उपयोग करून, आधार घेऊन, सत्यता पारखून, अभ्यास करून त्याचा यथायोग्य निष्कर्ष, अर्थ काढून प्रत्यक्ष इतिहासलेखन करणे ही एक मोठी जबाबदारीही असते. इतिहास म्हणजे फक्त घटनांची नोंद नसते, तर त्या त्या कालखंडाचे समाज जीवन, संघर्ष, संस्कृती, निसर्ग, या सर्वांचे त्यातून आकलन होते. मोगल काळात विविध सम्राटांनी आपापल्या राजवटीचे, प्रसंगांचे वृत्तान्त लिहून घेण्याची प्रथा पाडली. पुढे मराठेशाहीत हीच प्रथा पुढे नेली, त्याला 'बखर' असे संबोधले जाते. अशा बखरींमध्ये तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब असे, त्यामुळे त्यांना ऐतिहासिक मूल्य प्राप्त झाले. पुढे भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा म्हणजेच ब्रिटिशांचा प्रवेश झाल्यावर काही अभ्यासकांनी प्राचीन, मध्ययुगीन भारताचा अभ्यास करून मौलिक ग्रंथ निर्माण केले. भारताचा इतिहास लिहिणाऱ्यांमध्ये इतिहासकार रा. गो. भांडारकर यांचे नाव खूप वरचे आहे. या इतिहासलेखन परंपरेतील सर्वश्रेष्ठ नाव म्हणजे इतिहास संशोधक वि. का. राजवाडे हे होय. उपलब्ध साधन सामुग्री महत्प्रयासाने गोळा करून 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या ग्रंथाचे तब्बल बावीस खंड त्यांनी साकारले आणि इतिहासच घडवला. त्यांच्यापासून प्रेरणा, ऊर्जा घेऊन पुढील काळात अनेक इतिहास-संशोधक, लेखक आपापल्या परीनं इतिहासलेखन क्षेत्रात मोलाची भर घालू लागले. काही लक्षणीय नावं म्हणजे वा. सी. बेंद्रे, ग. ह. खरे, द. वा. पोतदार, वा. वि. मिराशी, सेतू माधवराव पगडी हे होत. आश्चर्याची गोष्ट इंग्रजीत जास्तीत जास्ती लेखन छत्रपती शिवाजी महाराजांवर झाले आहे. त्यामध्ये बंगाली इतिहासकार जदुनाथ



सरकार यांच्या शिवचरित्र लेखनास उच्च स्थान प्राप्त झाले आहे.

आपल्या महाराष्ट्रात इतिहासपर लेखन करणाऱ्या सशक्त लेखकांची मोठी फळीच बघायला मिळते. इतिहासाकडे बघण्याची प्रत्येकाची दृष्टी वेगळी आणि लेखनशैली वेगळी. ऐतिहासिक घटना आणि त्यातला माणूस केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या लेखणीतून ललित अंगाने उतरलेल्या अनेक साहित्यकृतींनी मराठी साहित्याचे दालन समृद्ध झाले आहे. नाथमाधव, वि. वा. हडप, ना. सं. इनामदार, गो. नी. दांडेकर, रणजित देसाई, ना.सं.इनामदार, शिवाजी सावंत, बाबासाहेब पुरंदरे, इंदुमती शेवडे यांनी इतिहासाची गोडी वाचक-रसिकांना लावली आणि इतिहासाचे महत्त्व घराघरांत पोहोचवले. त्यातलेच एक महत्त्वाचे नाव, ज्यांनी इतिहास हा क्लिष्ट विषय रंजक पद्धतीने हाताळला; अथक परिश्रम, मेहनत, ध्यास आणि प्रचंड अभ्यास याद्वारे त्यांचे लेखन लोकाभिमुख झाले आणि बेस्ट सेलरच्या यादीतही झळकले ते लेखक म्हणजे आदरणीय विश्वासराव पाटील.

सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी 'पानिपत'कार विश्वासराव पाटील यांची निवड झाली आणि अवघ्या साहित्य वर्तुळात, वाचक-रसिकांत 'सुयोग्य व्यक्तीची सार्थ निवड' म्हणून अभिप्राय उमटू लागले. जवळजवळ तीन दशकांनंतर ऐतिहासिक, सामाजिक, चरित्रात्मक विषयावर विपुल लेखन करणारे विश्वासरावांसारखे समर्थ लेखक, अध्यक्ष म्हणून मराठी साहित्य संमेलनास लाभत आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. (१९९७ साली अहिल्यानगर (अहमदनगर) येथे झालेल्या संमेलनाचे अध्यक्ष ऐतिहासिक कादंबरीकार ना. सं. इनामदार होते). विश्वासरावांच्या अनेक साहित्यकृती या बेस्ट सेलरच्या यादीत समाविष्ट झाल्या, लोकाभिमुख झाल्या, पुस्तकांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या हे अवघ्या मराठीजनांसाठी भूषणावह. 'पानिपत' ते 'ग्रेट कंचना सर्कस' असा विशाल आणि समृद्ध कादंबरी लेखनाचा कॅनव्हास मराठी साहित्यविश्वाला बहाल करणाऱ्या कलंदर, अभ्यासू, संवेदनशील आणि सामाजिक जाण असलेल्या विश्वासरावांचे सर्वप्रथम मनःपूर्वक अभिनंदन!


इतिहास विषय माझ्या आवडीचा. आधी शाळेत आणि नंतर कॉलेजमधील वाचनालयात मी ऐतिहासिक ग्रंथ वाचायचो. त्याची गोडी मला पुढेही लागली. ऐतिहासिक लेखन म्हणजे भूतकाळातील महत्त्वाच्या प्रसंगांची संशोधनात्मक चिकित्सात्मक मांडणी. विविध पुरावे, जुनी दुर्मीळ कागदपत्रे धुंडाळून, प्रसंगांची सत्यता तपासून लिहिलेला दस्तावेज. या लेखनात सनावळी, युद्ध, विविध प्रसंग, विविध व्यक्तिरेखा, त्यांचे योगदान, समाज, मानवी जीवन, स्वभाव दर्शन, निसर्ग, भूगोल, असं सारं सारं समाविष्ट असतं. त्यावेळी थोर लेखक सेतू माधवराव पगडी, हरिभाऊ आपटे, ना.सं.इनामदार, बाबासाहेब पुरंदरे, शिवाजी सावंत, भा.द.खेर, इत्यादी लेखकांचे जाडजूड ग्रंथ वाचल्याचे मला चांगलेच स्मरते.

बहुतांशी ऐतिहासिक लेखनाची मांडणी, शैली ही काहीशी रुक्ष, बोजड, वर्णनात्मक किंवा बखरीच्या अंगाने जाणारी असायची. मात्र याला काही लेखक अपवाद आहेत. त्यातील प्रमुख नाव म्हणजे विश्वासराव पाटील. रंजकता, नाट्यमयता, संवादात्मक चित्रदर्शी भाषाशैली, लालित्य, घटनांचे सखोल प्रभावी चित्रण, ही विश्वासराव पाटील यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. इतिहास हा विषय रंगतदार, आकर्षक व वाचनीय करण्याचं श्रेय त्यांना नक्कीच जातं.

१९८८ च्या सुमारास प्रकाशित झालेली महत्त्वाची ऐतिहासिक कादंबरी, 'पानिपत'! मी नुकताच नोकरीत रुजू झालो होतो. प्रवासामध्ये, घरी, प्रसंगी ऑफिसमध्ये या कादंबरीची मी झपाटल्यासारखी पारायणे केली होती. ऐन मोक्याच्या क्षणी मराठ्यांचे दुर्दैव आड आलं आणि त्यांना मोठ्या पराभवाला सामोरं जावं लागलं. त्यातील शेवटच्या करुण प्रसंगाचा विलक्षण प्रभाव माझ्या मनावर झाला, आणि त्या मनःस्थितीत विश्वासरावांना विस्तृत पत्रही लिहिलं होतं. त्यावर त्यांचं बोलकं पत्र आलं. पानिपतमधल्या काही भावुक ओळी त्यांनी मला लिहून पाठवल्या होत्या. ते संवाद साधतात, ''जोवर या मातीत भाऊबंदकीची आणि बेदिलीची बीजे आहेत, तोवर मराठी मातीच्या भाळी पानिपतचा मळवट पुन्हा पुन्हा भरला जाणार आहे. पानिपत एकदा नव्हे अनेकदा घडणार आहे.''

अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विश्वासरावांची निवड झाल्याचे समजताच पानिपतची ती गहिरी आठवण हलकेच ताजी झाली.

१४ जानेवारी १७६१. इतिहासाच्या क्षितिजावर आणि पानिपतच्या मैदानावर तो काळाकुट्ट दिवस उगवला. त्या दिवशी जे झाले ते महाभयंकर झाले. इ.स. १९४५ मध्ये अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा–नागासाकी शहरांवर अणुबॉम्ब टाकले त्यानंतर टप्प्याटप्प्याने लाखो लोक मरण पावले. मात्र इथे पानिपतच्या युद्धात दोन्हीकडचे दोन लाख सैनिक,





माणसे, जनावरे त्या आठ तासांच्या युद्धात मरण पावले. हिंदुस्तानच्या इतिहासात आजवर असे युद्ध झालेले ऐकिवात नाही. पानिपतचे हे तिसरे महाभयंकर युद्ध. याआधी दोन युद्धे झाली होती आणि त्यात मुघलांचा विजय झालेला. हे तिसरे युद्ध! ते अफगाण सेनानी अहमदशहा अब्दाली आणि मराठ्यांचे सेनानी सदाशिवराव पेशवे यांच्यामध्ये. दिल्लीच्या तख्तावर बसलेल्या बादशहाच्या रक्षणासाठी म्हणजेच हिंदुस्तानच्या रक्षणासाठी एका वेगळ्याच ध्येयाने प्रेरित होऊन मराठे वीर पानिपतवर क्रूरकर्मा अब्दालीला भिडण्यासाठी गेले होते. खरे म्हटले, तर हे केवढे मोठे साहस! महाराष्ट्रातून थेट उत्तरेत जाऊन अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून अब्दालीच्या अफगाण फौजांशी दोन हात करणे यातच मराठ्यांनी बाजी मारली होती. पण... पण... मराठ्यांचे दुर्दैव. सकाळी नऊला चालू झालेले हे महायुद्ध संध्याकाळी पाचच्या सुमारास संपले. खरोखरच संपले कारण लढण्यासाठी कोणी जिवंत शिल्लकच राहिले नव्हते! दुपारपर्यंत मराठ्यांचा विजय ठरलेला होता. त्यानंतर असे काही पारडे फिरले आणि अब्दालीने मराठ्यांच्यावर विजय मिळवला. हिंदुस्तानचे दुर्दैव. त्या पराभवाची अनेक कारणे आहेत.


मराठ्यांची सर्वोच्च सद्गुणांची आणि दुर्दैवी दुर्गुणांची कहाणी म्हणजे पानिपत! हे युद्ध हिंदू-मुस्लिमांचे नव्हतेच, तर हे युद्ध होते या राष्ट्रावर आक्रमण करणाऱ्या परकीय शक्ती विरुद्ध. हिंदुस्तानच्या रक्षणासाठी मराठ्यांनी जो काही भीम पराक्रम गाजवला त्याला तोड नाही. मराठे इतका कडवा प्रतिकार करतील, हे अब्दालीच्या स्वप्नातदेखील नव्हते. या युद्धामुळे तो हादरला, वरमला आणि त्यानंतर खैबरखिंडीतून हिंदुस्थानावर आक्रमण करण्याची त्याची हिंमत झाली नाही. या पानिपत विषयाची मोहिनी अनेक लेखक-कवींना पडलेली. ज्ञानपीठकार लेखक वि. स. खांडेकर यांनी आपल्या एका लेखात म्हटले होते, की ''येत्या तीस वर्षांत पानिपत विषयाचा वेध घेणारा तरुण लेखक नक्की निर्माण होईल असा मला विश्वास आहे.'' आणि झालेही तसेच. हा विश्वास सार्थ ठरवला एका तरुण कादंबरीकाराने. त्या कादंबरीकाराचे नाव विश्वास पाटील!


हा भलामोठा विषय रेखाटण्यापूर्वी विश्वासराव मराठ्यांचा समग्र इतिहास वाचत होते. पानिपत विषयाने त्यांना अक्षरशः वेड लावले. आपल्या वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी विश्वासरावांनी हा विषय लिहायला घेतला आणि तब्बल तीन वर्षांच्या अथक संशोधनानंतर, अभ्यासानंतर 'पानिपत' (राजहंस प्रकाशन) ही सहाशे पानांची महाकादंबरी नोव्हेंबर १९८८ मध्ये प्रकाशित झाली आणि पुन्हा इतिहास घडला. आजघडीला पानिपतच्या चाळीसच्यावर आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. अनेक महत्त्वाचे पुरस्कार लाभले, वाचक-समीक्षकांच्या पसंतीची मोहर पानिपतला लाभली, मुलाखती, चर्चासत्रे झाली. मराठीतील गेल्या पन्नास वर्षांतील सर्वोत्कृष्ट दहा पुस्तकांमध्ये पानिपतचा समावेश झाला. तसेच पानिपत कादंबरीचा समावेश बेस्ट सेलर यादीत झाला आहे. याच विषयावरचे 'रणांगण' हे नाटक चंद्रलेखाने रंगभूमीवर आणले. त्याचा शुभारंभ दि. १० डिसेंबर १९९८ रोजी चक्क पानिपतच्या रणभूमीवर करण्यात आला. देश-विदेशात त्याचे प्रयोग झाले. २०१९ मध्ये आशुतोष गोवारीकर यांनी 'पानिपत' हा भव्य चित्रपट साकारला. मात्र पानिपत या ग्रंथापुढे तो फिल्मी वाटला. पानिपतचा विविध भारतीय, तसेच इंग्रजी भाषांमध्ये अनुवाद झाला. मराठी साहित्याच्या क्षितिजावर विश्वास पाटील हे नाव तळपू लागले. पानिपतची लढाई ही फक्त पराभवाची कहाणी न रेखाटता मर्द मराठ्यांच्या झुंजार मनोवृत्तीचे दर्शन आणि असामान्य शौर्याची, त्यागाची चित्तथरारक कहाणी विश्वासरावांनी शब्दबद्ध केली. मराठी माणसाच्या विजिगिषू वृत्तीचे श्रेष्ठत्व आणि न्यूनत्व या दोन्हींचे प्रतीक म्हणून विश्वासरावांनी पानिपत हा विषय निवडला होता.

इयत्ता पाचवीचा वर्ग. वर्गात गुरुजी पानिपतचा धडा शिकवीत आहेत. गुरुजी एकेकाला प्रश्न विचारीत आहेत. आता पाळी त्या मुलावर. ''उभा राहा. सांग. पानिपतची तीन युद्धे कधी झाली?'' तो मुलगा जागेवरून उठतो. काही स्मरल्याचे भासवून सांगतो, ''गुरुजी... पानिपतचे एक युद्ध झाल्यानंतर दुसरे झाले आणि दुसरे संपल्यावर लगेच तिसरे युद्ध सुरू झाले.'' असे त्या मुलाने म्हणताच पुढचा प्रसंग सांगणे आवश्यक आहे का? छडी लागे छम छम... तोच मुलगा काही वर्षांनी त्याच 'पानिपत' या विषयावर अभ्यासपूर्ण महाकादंबरी लिहितो, अनेक पुरस्कार मिळवतो, देश-परदेशांत त्याच्या पुस्तकाचे कौतुक होते. आता दुसरा प्रसंग. एक मुलगा शिकण्यासाठी दूर खेडेगावातून मुंबईसारख्या महानगरात येतो. डिलाईल रोडवरील एका चाळीमध्ये वास्तव्य करतो. १५ बाय १० फूट आकाराच्या खोलीत अनेक जण दाटीवाटीनं राहतात. कोणी पोटासाठी आलेला, तर कोणी कोणी शिक्षणासाठी. तो मुलगा मुंबईतले टक्केटोणपे खाऊन, प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन, अनुभवाने समृद्ध होऊन स्वकर्तृत्वाने मोठी झेप घेतो आणि एकेदिवशी त्याच मुंबईचा कलेक्टर बनतो. पुढे अगदी जवळून मुंबईतल्या गिरणी कामगार वस्तीतल्या कष्टकरी




मंडळींचे भकास जगणे बघतो, त्यांच्या वेदना, त्यांचे प्रश्न, कॉर्पोरेट विश्व, राजकारण आणि आजूबाजूचा कोलाहलदेखील समजून घेतो. यथावकाश याच विषयावर 'लस्ट फॉर लालबाग' सारखी अस्वस्थ करणारी कादंबरी लिहितो. आहे ना खास बात?

कादंबरीकार विश्वास पाटील यांचा जन्म २८ नोव्हेंबर १९५९ रोजी सांगली जिल्ह्यातील नेर्ले या छोट्याशा गावी झाला. वडिलांचा व्यवसाय शेतीचा, शिवाय ते शेतकरी कामगार पक्षाचे पुढारीदेखील होते. त्यांचे गाव आणि परिसर सतत शेतकऱ्यांचे मेळावे, सभा, मोर्चे याने दुमदुमून जायचा. आजूबाजूचा परिसर रमणीय. तेथील देवदेवता, रूढी, परंपरा, सण, उत्सव हे सारे नजरेसमोर घडत असे आणि यांचा परिणाम नकळत विश्वासरावांच्या बालमनावर झाला. लोकसंस्कृतीचे नाते त्याचवेळी त्यांच्या मनात फुलू लागले. शालेय जीवनात विश्वासराव पोवाडे रचित आणि गात देखील. मित्रमंडळींमध्ये त्यांना 'बालशाहीर' म्हणून ओळखले जाई. पुढे माध्यमिक स्तरावर शिकत असताना कांबळे गुरुजी आणि आपटे गुरुजी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विश्वासरावांना वक्तृत्वाचे धडेही याचवेळी मिळाले. आईवडिलांची खूप इच्छा होती परिस्थितीमुळे आपल्याला शिक्षण मिळाले नाही; परंतु आपल्या मुलाने खूप शिकून मोठे साहेब व्हावे, नाव कमवावे, असे त्यांना मनोमन वाटे. महाविद्यालयीन शिक्षण घेताना विश्वासरावांना वाचनाची गोडी लागली आणि व्यक्त होण्यासाठी थोडेफार लेखनही करू लागले. १९७५ मध्ये त्यांची 'कायदा' ही पहिली कथा तरुण भारत वृत्तपत्रात छापून आली, आणि मग पुढे शिक्षणाबरोबरच लेखनाचा सिलसिला सुरूच झाला. मराठा, नवयुग, आणि इतर नियतकालिकांमधून त्यांचे कथालेखन प्रसिद्ध होऊ लागले. चित्रपट आणि तमाशा पाहण्याची आवड याच काळातली. पुढे बी.ए.नंतर शिवाजी विद्यापीठातून एम.ए.ची पदवी संपादन करून कायद्याचे शिक्षण सुरू केले. चिकाटी आणि मेहनत या जोरावर विश्वासरावांनी एलएलबीची पदवीदेखील संपादन केली. विश्वासरावांचे वडील पुढारी असल्याने त्यांच्या घरी सतत लेखक, पत्रकार, वक्ते, प्रोफेसर यांचा राबता असायचा. प्रत्यक्ष शाहीर अमर शेख यांचे कार्यक्रम बघण्याचे भाग्य त्यांना लाभले. कॉलेजमधील विविध वक्तृत्व स्पर्धांत, साहित्यविषयक उपक्रमांत विश्वासराव भाग घेत. सुप्रसिद्ध साहित्यिक, पत्रकार आचार्य अत्रे तर त्यांचे दैवत. अत्र्यांची अनेक नाटके त्यांना तोंडपाठ होती.

१९९६ च्या सुमारास विश्वासराव एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन भारतीय प्रशासकीय सेवेत सामील झाले. सनदी अधिकारी या नात्याने त्यांनी आत्तापर्यंत विविध जिल्ह्यांमध्ये, विविध पदांवर काम केले आहे. नोकरी करीत असताना लेखनाचा वसा त्यांनी जाणीवपूर्वक जपला, वाढवला. अल्पावधीतच



एक सशक्त, दमदार लेखक म्हणून विश्वासराव नावारूपाला आले. सरांच्या लेखनाचा झपाटा, आवाका आणि विषयांचे वैविध्य, सारंच विलक्षण आहे. संशोधनात्मक पद्धतीचे लेखन करताना विश्वासरावांनी संदर्भ ग्रंथांच्या अभ्यासाबरोबरच त्या त्या स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन, तेथील लोकांना भेटून त्यांच्याकडून माहिती, कागदपत्रे मिळवून हे मौलिक ग्रंथ साकारले आहेत. एकीकडे महत्त्वाच्या अधिकार पदावर काम करीत असतानाच दुसरीकडे त्यांचे सातत्याने वाचन, लेखन सुरू होतेच.

सखोल संशोधन, मानवी भावभावनांचे जिवंत दर्शन आणि उत्कट आविष्कार, नाट्यमयता, प्रत्ययकारी चित्रण, आणि सहजसुंदर अलंकारिक भाषाशैली, लेखन सातत्य ही विश्वासरावांच्या लेखनाची वैशिष्ट्ये. विश्वासरावांच्या लेखणीतून उतरलेली एकेक साहित्यकृती बावनकशी सोन्यासारखी- अस्सल, लखलखीत. काहीतरी वेगळं, सकस देण्याचा त्यांचा प्रयत्न आपल्याला थक्क करतो. सर्वच साहित्यकृतींचा विस्तृत धांडोळा एका लेखात घेणं केवळ अशक्य. त्यांच्या काही लक्षणीय साहित्यकृतींकडे एक धावती नजर टाकू या.

झाडाझडती (राजहंस प्रकाशन) : धरणग्रस्तांच्या समस्या, पुनर्वसन करताना झालेले राजकारण, समाजकारण, माणसाचे जगणे याचा वेध या कादंबरीत घेतला आहे.

गाभुळलेल्या चंद्रबनात (मेहता पब्लिशिंग): तमाशा या लोककलेच्या पार्श्वभूमीवर एक विलक्षण प्रेम कहाणी.

नागकेशर (मेहता पब्लिशिंग हाऊस) : गल्लीपासून थेट दिल्लीपर्यंत पेटत जाणाऱ्या रगेल राजकारणाची आणि जीवघेण्या डावपेचांची कहाणी.


लस्ट फॉर लालबाग (राजहंस प्रकाशन) : अस्वस्थ महानगरीतल्या उद्ध्वस्त गिरणी कामगारांच्या कुटुंबांची, संघर्षाची, गुन्हेगारी विश्वाची व अटळ अशा जागतिकीकरणाची भयावह कहाणी.


फ्रेडरिक नित्शे : जीवन आणि तत्त्वज्ञान (पद्मगंधा) : अस्तित्ववादी परंपरेचा आद्यप्रवर्तक नित्शे या जर्मन तत्त्ववेत्त्याचा जीवन प्रवास रेखाटला आहे.

बंदा रुपया (मेहता पब्लिशिंग) : साहित्य, इतिहास, संगीत, लोककला, नाटक, चित्रपट अशा क्षेत्रांतली मुशाफिरी

क्रांतिसूर्य (मेहता पब्लिशिंग): क्रांतिसिंह नाना पाटील यांची तेजस्वी समरगाथा.

अण्णा भाऊंची दर्दभरी दास्तान (राजहंस प्रकाशन) : मायमराठीसाठी डफावर थाप मारून संयुक्त महाराष्ट्राची रणलावणी गात थेट दिल्लीपर्यंत धडक







मारणारे झुंजार शाहीर अण्णा भाऊ साठे यांची चरित्रगाथा.

चंद्रमुखी (राजहंस प्रकाशन) : एक कलासक्त राजकारणी आणि एक सौंदर्यवती कलावंतीण यांची अनोखी कहाणी.

पांगिरा (राजहंस प्रकाशन) : सामान्य कष्टकऱ्यांच्या सामूहिक जाणिवांची, वेदनेची आणि व्यथेची कादंबरी.

नॉट गॉन विथ द विंड (मेहता पब्लिशिंग हाऊस) : हॉलिवूड ते बॉलिवूड या प्रवासातील अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा धांडोळा.

महानायक (राजहंस प्रकाशन) : नेताजी सुभाषचंद्र बोस यांची चित्तथरारक जीवनकहाणी.

संभाजी (राजहंस प्रकाशन) : लढवय्या संभाजी महाराजांची चित्तथरारक जीवन कहाणी.

महासम्राट या मालिकेतील झंझावात आणि रणखैंदळ हे दोन खंड (मेहता पब्लिशिंग हाऊस) : छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील ऐतिहासिक कादंबरी मालिकेतले हे दोन खंड. महाराजांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना, लढा, स्वराज्य स्थापनेतील संघर्ष चित्रदर्शी भाषाशैलीमध्ये लेखकाने प्रभावीपणे रेखाटला आहे. त्यापैकी एप्रिल २०२५ मध्ये नवी दिल्ली येथे यातील दुसऱ्या खंडाचा इंग्रजी अनुवाद 'द वाइल्ड वॉरफ्रंट' (प्रकाशक: वेस्टलँड) प्रकाशित झाला. इंग्रजी अनुवाद श्री. नदीम खान यांनी केला.

'ग्रेट कंचना सर्कस' (मॅजेस्टिक) : या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे सर्वप्रथम ही कादंबरी हिंदी भाषेत प्रकाशित झाली. त्यानंतर आता मराठीत. पत्रकार रवी बुले यांनी या कादंबरीचा सुंदर अनुवाद केला आहे. वाणी प्रकाशनाने ती प्रसिद्ध केल्यावर हिंदी भाषकांमध्ये ती प्रचंड गाजली. दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी जपानने केलेल्या बर्मावरील बॉम्ब हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे, ज्यामध्ये आसाममधील एका प्रसिद्ध सर्कसमधले कलाकार तिथे फसले जातात. संकटांचे अगणित डोंगर पार करून, प्रतिकूल परिस्थितीशी झगडून, प्रसंगी प्राण पणाला लावून, संघर्ष करून हिंदुस्तानात कसे निसटून येतात आणि जिद्दीने पुन्हा सर्कसचा व्यवसाय कसा उभारतात याची चित्तथरारक, उत्कंठावर्धक कहाणी प्रत्ययकारी शैलीत कादंबरीत रेखाटली आहे. मराठी वाचकांचा तिलाही उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

**लाभलेले महत्त्वाचे पुरस्कार :**

पानिपत कादंबरीसाठी १९८९चा गोव्याचा 'नाथमाधव पुरस्कार', १९९०चा कलकत्याच्या 'भारतीय भाषा परिषदे'चा पुरस्कार. फक्त पानिपतसाठी एकूण पस्तीस पुरस्कार लाभले हाही एक विक्रमच. झाडाझडती – कादंबरीसाठी १९९० चा

‘प्रियदर्शिनी राष्ट्रीय पुरस्कार’, ‘विखे पाटील पुरस्कार’, आणि १९९२ मध्ये ‘साहित्य अकादमी पुरस्कार’, महानायक या ग्रंथासाठी १९९८ चा ‘गडकरी पुरस्कार’ लाभला.


विश्वासराव हे साहित्य अकादमीचे सदस्य असून मराठी भाषा नियामक निमंत्रक म्हणूनही ते कार्यरत आहेत.

पानिपत कादंबरीमुळे अनेक मानसन्मानाचे योग मिळाले आणि देश-विदेशात त्यांच्या साहित्यकृतींचे कौतुक झाले. आपला मुलगा मोठा कलेक्टर व्हावा, प्रज्ञावंत लेखक व्हावा, हे विश्वासरावांच्या आईवडिलांचे स्वप्न विश्वासरावांनी अशा प्रकारे पूर्ण केले.

साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर लगेचच विश्वासरावांनी महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये झंझावाती दौऱ्यांना सुरुवातही केली आहे. वाचक-रसिकांना प्रत्यक्ष भेटून, त्यांचे प्रश्न जाणून घेऊन त्यांच्या शुभेच्छांचा स्वीकार करीत ते पुढे जात आहेत. वाचन संस्कृती जपण्यासाठी, सजग वाचक निर्माण करण्यासाठी विश्वासरावांच्या मनात अनेक योजना आहेत. त्या मूर्त स्वरूपात प्रत्यक्षात साकारतील याबद्दलची खात्री आहेच. एका मुलाखतीत विश्वासराव अगदी सहज बोलून गेले आणि ते मला भावले. ते म्हणाले,

‘‘साहित्य ही माणसांची गोष्ट असते. राजकीय, सामाजिक, ग्रामीण विषय असे आपण म्हणतो; परंतु अंती त्या सर्व माणसांच्याच गोष्टी असतात. माणूस हाच केंद्रबिंदू असतो. अनुभवास आलेल्या सर्व गोष्टींकडे मी माणूस या नजरेनं पाहतो. यामुळेच सर्व साहित्यप्रकार मला भावतात. संमेलन आणि पुढचा कार्यकाळ साहित्यक्षेत्राला दिशादर्शक ठरावा यासाठी मी प्रयत्न करेन.’’


सध्याचा काळ हा मोठा विचित्र आहे. विविध प्रकारच्या तंत्रज्ञानाचा विळखा आपल्या सभोवताली पडलेला आहे. सोशल मीडियाचे बंधन झुगारून तसेच




तंत्रापेक्षा साहित्याचा मंत्र जपणे किती आवश्यक आहे हे विश्वासरावांनी आजवर विविध व्याख्यानांतून वाचकांवर ठसवले आहे. साहित्यात माणसाला केंद्रबिंदू मानणारे विश्वासराव पाटील यांची लेखन कारकीर्द अधिकाधिक बहरत जावो आणि विविध विषयांचा कॅनव्हास वाचक-रसिकांना अनुभवायला मिळो, अशी सदिच्छा व्यक्त करून विश्वासरावांचे पुनश्च अभिनंदन करतो आणि त्यांच्या लेखन प्रवासास अनेक शुभेच्छा देतो.

■■

**रामदास खरे**
सी-२१३, चंद्रवदन सोसायटी क्र-१,
गणेशवाडी, कौशल्य हॉस्पिटल जवळ,
पांचपाखाडी, ठाणे-४०० ६०१.
संपर्क : ९८६९०१४३१९.



# तपस्वी इतिहासकार : गजानन भास्कर मेहेंदळे

प्रा. डॉ. राजा दीक्षित

ज्येष्ठ इतिहास संशोधक, शिवचरित्रकार आणि युद्ध इतिहासाचे गाढे अभ्यासक गजानन भास्कर मेहेंदळे यांचे १७ सप्टेंबर २०२५ रोजी निधन झाले. एकांड्या शिलेदाराप्रमाणे इतिहास संशोधनाचे काम करणारे, प्रसिद्धीपासून दूर राहणारे मेहेंदळे यांच्या इतिहास-लेखनाला संदर्भस्रोतांचा भक्कम आधार होता. इतिहासलेखन करताना अनेकदा भाषांचा अडथळा असतो; पण मेहेंदळे यांनी आपल्या साधनेने त्यावर मात करून अनेक संदर्भ उलगडून दाखवले. युद्धशास्त्र या विषयाचा त्यांचा अभ्यास असल्यामुळेच अन्य इतिहासकारांनी न सांगितलेल्या अनेक महत्त्वपूर्ण गोष्टी त्यांनी सांगितल्या आहेत. गजानन भास्कर मेहेंदळे या थोर इतिहास संशोधकाला आदरांजली वाहणारा हा लेख लिहिला आहे मराठी विश्वकोश मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. राजा दीक्षित यांनी...

साहित्य अकादमीसाठी संपादित केलेल्या 'निवडक शेजवलकर' (२००७) या ग्रंथाच्या प्रस्तावनेत विश्वनाथ काशिनाथ राजवाडे आणि त्र्यंबक शंकर शेजवलकर या थोर इतिहासकारांविषयी मी असे म्हटले होते की, ''प्रज्ञा व प्रतिभा, व्यासंग व विश्लेषक बुद्धी, तळमळ व त्याग आणि विक्षिप्तपणा व वादग्रस्तता हे या दोघांचेही समान विशेष.'' मराठीतील इतिहासलेखन क्षेत्रात या कोटीतला आणखी एक इतिहासकार पुढे निर्माण झाला. तो म्हणजे गजानन भास्कर मेहेंदळे (१९ डिसेंबर १९४७– १७ सप्टेंबर २०२५). त्यांच्या निधनाने इतिहासविश्वावर मोठा आघात झाला असे म्हणणे ही औपचारिकता नाही. ती वस्तुस्थिती आहे. डिंक–कात्री इतिहासलेखन करणारे खूप असतात; पण इतिहासकार मात्र हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असतात. मेहेंदळे तसे इतिहासकार होते. 'कोणताही

मूर्ख इतिहास घडवू शकतो; पण इतिहास लिहायला मात्र अंगी असामान्यत्वच असावे लागते!' या अर्थाचे उद्‌गार ऑस्कर वाईल्ड यांनी काढले होते. मेहेंदळे यांच्या अंगी असे असामान्यत्व होते. अस्सल साधनांच्या भक्कम आधारावर इतिहास लिहिणाऱ्या वस्तुनिष्ठतावादी इतिहासकारांमध्ये त्यांची गणना करावी लागेल. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांविषयी त्यांनी केलेले लेखन म्हणजे मराठी इतिहासलेखन शास्त्रातील एक स्मरणशिळा बनलेली आहे. शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या 'भारत इतिहास संशोधक मंडळ' (स्थापना गुरुवार, ७ जुलै १९०७ म्हणजे शके १८३२ची आषाढ शुद्ध प्रतिपदा) या पुण्यातील संस्थेला जे स्थैर्य आणि संशोधकीय समृद्धी प्राप्त झालेली आहे, त्यामध्ये अलीकडच्या काळात मेहेंदळे यांचा मोलाचा वाटा आहे.

ग. भा. तथा गजाभाऊ मेहेंदळे यांनी १९६९च्या सुमारास भारत इतिहास संशोधक मंडळात जायला सुरुवात केली. (सोयीसाठी प्रस्तुत लेखात येथून पुढे या संस्थेचा उल्लेख मी 'मंडळ' एवढाच करणार आहे.) मेहेंदळे हे या सुमारास युद्धशास्त्राचे विद्यार्थी होते आणि १९७१च्या युद्धकाळात ते पत्रकारितेचा भाग म्हणून आणि जिज्ञासेपोटी बांगला देश परिसरात जाऊन आले होते. युद्धशास्त्राच्या मार्गाने ते अगदी सहजपणे इतिहास संशोधनात शिरले ते मात्र कायमचेच. मंडळाशी त्यांचा संबंध सुमारे छप्पन्न वर्षांचा. माझा संबंध गेल्या सुमारे अर्धशतकाचा. स्वाभाविकपणे मी त्यांना दीर्घकाळ पाहत आलो. मी त्यांच्या जवळच्या वर्तुळातला नव्हतो. मंडळाच्या राजकारणापासून आणि प्रशासकीय कारभारापासून मी सदैव दूर राहिलो. मात्र मी मंडळाचा एक आस्थेवाईक आजीव सभासद आहे. जेव्हा काही छोटीमोठी जबाबदारी सोपवली गेली, विशेषतः प्रा. श्री. मा. भावे यांनी सोपवली, तेव्हा ती मी निष्ठेने पार पाडत आलो. उदाहरणार्थ, मंडळाच्या शताब्दीच्या वेळी १२ ऑक्टोबर २०१० रोजी मुख्य समारंभाला राष्ट्रपती मा. प्रतिभाताई पाटील पाहुण्या म्हणून आल्या होत्या, तेव्हा कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माझ्याकडे होते, स्मरणिकेचे संपादन मी केले होते आणि शताब्दीनिमित्तच्या व्याख्यानमालेचे व अन्य काही उपक्रमांचे आयोजनही मी केले होते. हे अशासाठी

**मंडळ शताब्दी**




सांगतोय की, गजाभाऊ मेहेंदळे यांच्याशी या निमित्ताने थोडाफार संबंध येत राहिला. आम्ही नेहमी एकमेकांशी आदरपूर्वक वागत आलो. प्रस्तुत लेख म्हणजे मेहेंदळे यांचे चरित्रकथन नव्हे, विस्तारित परिचयपत्रिका नव्हे वा निव्वळ श्रद्धांजली-लेखही नव्हे. मी स्वत: इतिहासाचा एक प्राध्यापक आणि छोटा संशोधक आहे. या नात्याने आणि व्यक्ती म्हणून मला दीर्घकाळ दिसलेले, जाणवलेले, भावलेले आणि क्वचित प्रसंगी न पटलेले गजानन भास्कर मेहेंदळे मी या लेखात चित्रित करत आहे. माझ्या दृष्टीने असणारे त्यांचे योगदानसुद्धा वाचकांपुढे ठेवत आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मराठीतील वाङ्मयेतिहासाच्या सातव्या खंडाच्या तिसऱ्या भागात (संपा. प्रा. रा. ग. जाधव, २०१०) आणि इंग्रजीतील दुसऱ्या खंडात (संपा. राजेंद्र बनहट्टी व डॉ. गं. ना. जोगळेकर, २००४) मी एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील मराठीतील इतिहासलेखनाचा परामर्श घेतलेला आहे. त्यामध्ये मेहेंदळे यांच्याबद्दलही लिहिलेले होते; पण ती अगदी कमी शब्द-मर्यादेतील ओझरती दखल होती. येथे ती सविस्तर आहे. प्रस्तुत लेखात (सत्यता पडताळून) अनेक तारखा मी देत आहे, कारण मंडळाचा इतिहास लिहायचा झाला, तर अनेक साधनांपैकी हा लेख आणि मी संपादित केलेली शताब्दी स्मरणिका ही त्याची दोन साधने असू शकतील. मला जरा पुसटशा आठवणाऱ्या एकदोन गोष्टींची खातरजमा मी डॉ. पद्माकर प्रभुणे आणि डॉ. अनुराधा कुलकर्णी यांच्याकडून करून घेतली. डॉ. कुलकर्णी आणि श्री. पराग पुरंदरे यांनी गजाभाऊंविषयीच्या आत्मीयतेतून काही छायाचित्रे उपलब्ध करून दिली. लेखाचे एकंदर स्वरूप लक्षात घेता त्यामध्ये स्वाभाविकपणे 'मी' डोकावत राहणार; या लेखापुरता तरी तो उपग्रह समजावा!

गजाभाऊ मेहेंदळे हे नाव उच्चारताच कोणाही जाणकाराला आठवेल, ती त्यांची शिवचरित्र-विषयक कामगिरी. मराठी इतिहासविश्वाचे फार मोठे दुर्दैव असे की, काही मातब्बर इतिहासकारांची शिवचरित्रे पूर्णांशाने वाचकांच्या हाती पडूच शकली नाहीत. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांची उभी हयात ऐतिहासिक साधने जमा करण्यातच खर्ची पडली. या कामातून त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे बहुमोल असे बावीस खंड उभे केले; पण त्या साधनांच्या आधारे शिवचरित्र लिहिण्याची संधी काही त्यांना नशिबाने दिली नाही. शेजवलकरांना शिवचरित्राचा संकल्प पूर्ण करणे शक्य नसल्याची जाणीव झाली होती म्हणून, त्यांनी 'श्रीशिवछत्रपति : संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने' (१९६४) असा भला थोरला ग्रंथ तयार केला. त्याचे मोल असे की, त्यासाठी शेजवलकरांना साहित्य अकादमीचा पुरस्कार (मरणोत्तर) मिळाला. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांनी महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्याकडे शिवचरित्र लेखनाची कामगिरी सोपवली होती; पण काळाच्या ओघात पोतदारांचे शिवचरित्र हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातला विनोद ठरण्यापलीकडे काहीही घडले नाही. नाही म्हणायला त्यांचे काही लेख एकत्र करून डॉ. कमल गोखले यांनी 'श्री शिवचरित्राचे पैलू' हे पुस्तक संपादित केले.

**इतिहासाचार्यांच्या पुतळ्यापाशी**



(अधिक संदर्भासाठी माझा हा लेख पाहावा – 'दत्तो वामन पोतदारांचा 'शिवाजी'', माणूस, पुणे, ७ जून १९८०, पृ. १२–१६.) ग. ह. तथा तात्यासाहेब खरे यांनी शिवचरित्रलेखन हाती घेतले होते; परंतु तेही पूर्णत्वास गेले नाही. या इतिहासकार–चतुष्टयामधील एकाचे जरी शिवचरित्र लिहून झाले असते, तर ती मोठी भाग्याची गोष्ट ठरली असती; पण ते होणे नव्हते! याच माळेतला पुढला मौक्तिक म्हणजे गजाभाऊ मेहेंदळे. शेजवलकरांच्या ग्रंथाने दुधाची तहान निदान ताकावर तरी भागवली गेली. मेहेंदळे यांच्यामुळे ती अधिक भागवली गेली, पण पूर्ण भागली नाही ती नाहीच! जे काही काम मेहेंदळे यांनी करून ठेवले, ते इतके मौलिक होते की, ते पूर्ण होण्याने मराठी इतिहासक्षेत्री एक आनंदवनभुवनच निर्माण झाले असते; पण तेही पूर्णांशाने होणे नव्हते! त्यांच्या 'श्री राजा शिवछत्रपती' या महाग्रंथाचा पहिला भाग १९९६, तर दुसरा द्विखंडी भाग १९९९मध्ये प्रकाशित झाला. दोहोंचे पुनर्मुद्रण २००७ मध्ये झाले आणि येत्या वर्षभरातसुद्धा मंडळातर्फे होणार आहे. सुमारे अडीच हजार पृष्ठांचा हा ग्रंथराज म्हणजे शिवचरित्र लेखनातील उत्कृष्ट संशोधकीय प्रकल्प म्हणता येईल. सुमारे ७००० तळटिपा आणि ७५ परिशिष्टे या संख्येचा उल्लेख केला तरी त्यासाठी गजाभाऊंनी काय तपश्चर्या केली असेल याचा अंदाज येऊ शकेल. याव्यतिरिक्त 'Shivaji : His Life and Times' (२०११, दुसरी आ. २०२५) हा सुमारे हजार पानी इंग्रजी ग्रंथ (ज्यामध्ये मात्र पूर्ण शिवचरित्र आहे) आणि 'शिवछत्रपतींचे आरमार' (संतोष प्र. शिंत्रे यांच्यासह, २०१०), तसेच शिवाजी महाराजांविषयीचे अन्य काही ग्रंथ यांमधून त्यांनी आपले संशोधनाधारित निष्कर्ष मांडलेले आहेत; पण त्या सर्वांचा परामर्श येथे अभिप्रेत नाही. अन्य ग्रंथांपैकी एकाचे उदाहरण मात्र देतो आणि पुढे जातो. तो ग्रंथ, खरे तर नव्वद पानी छोटे पुस्तक म्हणजे 'Tipu as He Really Was' (२०१८) हे इंग्रजी पुस्तक होय. त्यामध्ये हैदर अली आणि टिपू सुलतान या पितापुत्रांचे धर्मांध क्रौर्य मेहेंदळे यांनी समकालीन



'चित्रमित्र' यांनी काढलेले रेखाचित्र

अस्सल साधनांच्या आधारे निस्संदिग्धपणे दाखवून दिलेले आहे. पुस्तकाच्या ग्रंथसूचीत Historical Sketches of the South of India या मूळच्या १८१० ते १८१७ या काळातील ग्रंथाच्या तीन खंडांची नोंद करताना त्यांची माहिती ज्या पद्धतीने मेहेंदळे यांनी दिलेली आहे, ते पाहण्याजोगे आहे (पृ. ८८). शिवचरित्र असो, भारतातील मुस्लीम राजवटी असोत, इस्लामची ओळख असो वा दुसऱ्या महायुद्धाचासुद्धा महाकाय इतिहास असो, गजाभाऊ मेहेंदळे यांची सर्व प्रकाशित व अप्रकाशित पुस्तके येत्या वर्षभरात कमी किमतीत अभ्यासक व सामान्य वाचक यांना मंडळातर्फे उपलब्ध करून देणार असल्याचे अध्यक्ष प्रदीप रावत यांनी जाहीर केले आहे. तसेच त्यांच्या स्मरणार्थ मंडळात एक अध्यासन स्थापन करण्यात येणार आहे. मेहेंदळे यांच्या 'श्री राजा शिवछत्रपती' या ग्रंथाची प्रस्तावना; शिवाजी महाराजांविषयीचा आणि एकंदर इतिहास संशोधन–पद्धतीविषयीचा त्यांचा दृष्टिकोन समजावून घेण्यासाठी; अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे त्या संदर्भात काही विवेचन करतो. शिवाजी महाराजांचा उल्लेख बहुतेक ठिकाणी आपण एकेरी म्हणजे नुसता 'शिवाजी' असा का केला आहे, याचे स्पष्टीकरण ते बुद्धिवादी पद्धतीने देतात. एकतर महाराजांविषयी

अनादर नाही, उलट गाढ आदरभाव आहे, हे ते सूचित करतात. देवाचा किंवा आईचा उल्लेख आपण एकेरीच करतो; तसेच 'शिवाजी म्हणतो' या खेळातला एकेरी उल्लेखसुद्धा लोकांच्या मनातील गाढ आदराचेच द्योतक आहे, हे ते नमूद करतात. इतिहास संशोधनाच्या दृष्टिकोनातून चरित्र लिहिताना लेखकाने भाविक असू नये, शक्य तेवढे तटस्थ वृत्तीने लिहावे. अन्यथा चरित्रातील ऐतिहासिकता लोप पावून त्याला कथा-कादंबरीचे किंवा निव्वळ स्तुतिस्तोत्राचे स्वरूप येऊ शकते. जास्तीत जास्त तटस्थता राखण्यासाठी आपण शिवाजी महाराजांचा आणि सामान्यत: इ.स. १८५० पूर्वीच्या बहुतेक सर्व व्यक्तींचा उल्लेख सर्रास एकेरीच केल्याचे मेहेंदळे यांनी नमूद केले आहे. या चर्चेच्या शेवटी ते विनम्रतेने म्हणतात, ''हा खुलासा वाचल्यावरही प्रस्तुत शिवचरित्रातील शिवाजी महाराजांच्या एकेरी उल्लेखामुळे कोणाच्या भावना दुखावल्या जात असतील, तर त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो आणि तसा उल्लेख करण्यामागील माझ्या हेतूचा विपर्यास करू नये, अशी विनंती करतो.'' त्यांनी असेही नमूद केले आहे की, ''प्रामुख्याने आणि विश्वसनीय साधनांच्या आधारे सांगितलेली सुसंगत हकीगत, असे या शिवचरित्राचे स्वरूप आहे आणि तशी हकीगत सांगणे एवढाच माझा हेतू आहे.'' आरंभीच अशी निस्संदिग्ध भूमिका घेतल्यामुळे गजाभाऊंचे शिवचरित्र वादाच्या भोवऱ्यात अडकले नाही. अन्यथा हल्ली महापुरुषांविषयी काही लिहिणे हे संभाव्य सामाजिक उद्रेकांमुळे आणि भावुक अविवेकी मनगटशाहीमुळे अवघड होत चालले आहे! असो. प्रस्तावनेत आपण शिवचरित्राच्या अभ्यासाकडे आणि लेखनाकडे कसे वळलो, याची जी हकीगत गजाभाऊंनी कथन केलीय ती मुळातूनच वाचावी अशी आहे. या प्रवासात, विशेषतः आरंभीच्या टप्प्यात, आपण कुठे चुकत होतो हे सांगण्याचा त्यांचा प्रांजळपणा वाखाणण्याजोगा आहे. केवळ वैज्ञानिक संशोधनात नव्हे, तर कोणत्याही संशोधनात प्रामाणिकपणा अत्यंत गरजेचा असतो. गजाभाऊंचा हा प्रामाणिकपणा अगदी नितळ, पारदर्शी होता. आपण 'फार खडतर व्रत' आचरत आहोत याची त्यांना पुरेशी आणि स्पष्ट जाणीव होती. त्यांचे हे शब्द अतिशय मोलाचे आहेत : ''इतिहास नेमका कोणत्या मार्गाने गेला ते निव्वळ तर्क करून ठरविता येत नाही, विश्वसनीय अशा साक्षीदारांकडे म्हणजेच इतिहासाच्या साधनांकडे, चौकशी करूनच ते ठरवावे लागते; पण कित्येकदा या साक्षीदारांनाच अधलीमधली काही माहिती नसते, किंवा असली तरी त्यांनी ती सांगितलेली नसते. अशा ठिकाणी, नेमके काय घडले ते माहीत नाही, असे सांगणे म्हणजे इतिहास सांगणेच आहे. सारांश, सत्याच्या जास्तीत जास्त जवळ जाणारे चरित्र, म्हणजेच ऐतिहासिक चरित्र, लिहावयाचे असेल तर साधनांची ग्राह्याग्राह्यता विचारात घेऊन हिणकस साधने बाजूला काढली पाहिजेत आणि विश्वसनीय साधने दाखवित असलेल्या मार्गाने गेले पाहिजे. कल्पनेच्या वारूवर स्वार होऊन मन:पूत संचार करण्याचा मोह तर अगदी कटाक्षाने टाळला पाहिजे.'' कल्पनाचित्र उभे करण्याचे संशोधनात्मक स्वातंत्र्य घेणे मेहेंदळे यांना पूर्णपणे अमान्य होते. शिवाजी महाराजांच्या आग्र्याहून सुटकेविषयी विश्वसनीय साधने उपलब्ध नसताना कल्पनाविलास करणाऱ्यांवर त्यांच्या टीकेचा रोख दिसून येतो. एका चरित्रकाराच्या या प्रकारच्या दोषाबाबत ते मार्मिकपणे म्हणतात, ''जे निर्णय शिवाजी महाराजांनी घ्यावयाचे आहेत ते उपर्युक्त चरित्राच्या लेखकांनी स्वत:च घेतले आहेत!'' पुढे ते असेही बजावतात की, ''त्या प्रकारचा दोष ज्यात आहे असे शिवचरित्रविषयक लेखन अलीकडे बरेच होऊ लागले आहे आणि अशीच परिस्थिती कायम राहिली, तर पुढील दहा-वीस वर्षांत शिवचरित्राविषयीच्या अशा काल्पनिक इमारतींची एक कल्पनानगरीच निर्माण होईल, असे मला वाटू लागले आहे. म्हणून नाइलाजाने मी हे लिहीत आहे. या माझ्या लिहिण्याचा कितपत उपयोग होईल याविषयी मात्र मी साशंक आहे.'' मेहेंदळे अशी नुसती



**संशोधनात रमलेले मेहेंदळे**

टीका करून थांबत नाहीत. त्यांच्या शिवचरित्रात कोणत्या गोष्टी कुठे सापडतील आणि तारखा, संदर्भ, अवतरणे, इत्यादींबाबत काय धोरण ठेवले आहे, हे त्यांनी अगदी सुस्पष्ट आणि तपशीलवार सांगितले आहे. त्यामध्ये संदर्भग्रंथ, परिशिष्टे, तारखा, संदर्भ, अवतरणे, वाचनदुरुस्ती, स्थलनिर्देश, विशेषनामे, नकाशे, शुद्धिपत्र आणि पुरवणी टीपा या सर्व मुद्द्यांविषयीचे सूक्ष्म आणि सुस्पष्ट विवेचन त्यांनी केलेले आढळते. मेहेंदळे यांची प्रस्तावना म्हणजे संशोधनाच्या पद्धतीशास्त्रावरची कायमस्वरूपी कार्यशाळाच आहे. 'ना मूलं लिख्यते किंचित्' हा मंत्र त्यांनी कायम आचरला. तसे करताना आपल्यापेक्षा ज्येष्ठ अभ्यासकांचीसुद्धा भीडभाड त्यांनी बाळगली नाही. मंडळाशी संबंधित एका ज्येष्ठ अभ्यासकांनी शाहजहानचे एक फार्सी फर्मान पुढे आणले. मेहेंदळे यांची अशी पक्की खात्री होती की, ते फर्मान बनावट आहे. त्यामुळे त्या संशोधनावर मेहेंदळे अक्षरशः तुटून पडले. १९८९ ते १९९२ या काळात तो वाद खूप गाजला होता. केवळ फार्सीच नव्हे, तर ते करत असलेल्या संशोधनाला आवश्यक अशा लिपी आणि अनेक भाषा गजाभाऊंनी आत्मसात केलेल्या होत्या. त्यांचा मूळ कागदपत्रांबाबतचा, अस्सल साधनांचा, वस्तुनिष्ठतेचा आग्रह लक्षात घेता एका अर्थी ते इतिहासाचार्य राजवाडे यांच्या परंपरेतले होते, असे म्हणता येऊ शकते. खरे तर या विषयात खोल जाऊ लागलो, तर आपल्याला युरोपातील प्रबोधनकाळ (Renaissance) आणि ज्ञानोदयाचा (Enlightenment) कालखंड यांच्यापर्यंत तरी जावे लागेल. इ.स.च्या १८-१९व्या शतकांमध्ये सामाजिक शास्त्रांमध्ये आणि इतिहास संशोधनक्षेत्रात जे विचार प्रस्थापित झाले, त्यांचाही विचार करावा लागेल. इतिहासाचे तत्त्वज्ञान हा असा एक गहन प्रांत आहे की, तो या लेखाच्या मर्यादेत मावणार नाही; परंतु विवेचनाच्या सोयीसाठी अगदी छोटीशी मुशाफिरी तरी करावी लागेल. इतिहासाचे तत्त्वज्ञान 'चिकित्सक' (Critical) आणि 'परिकल्पक' (Speculative) अशा दोन प्रकारचे आहे. सोप्या भाषेत सांगायचे, तर चिकित्सक तत्त्वज्ञान 'लिखित' इतिहासाबद्दल चर्चा

करते की, ज्या चर्चेत संशोधन-साधने, त्यांची अस्सलता, विश्वसनीयता, अंतरंग व बहिरंग परीक्षण, इतिहासातील वस्तुनिष्ठता यांसारख्या गोष्टींचा सखोल विचार केला जातो. शतकानुशतके 'घडलेल्या' इतिहासाचा, त्याच्या स्वरूपाचा, नियमबद्धतेचा, सिद्धान्तांचा विचार परिकल्पक तत्त्वज्ञान करते. गजानन भास्कर मेहेंदळे यांना यातील चिकित्सक तत्त्वज्ञान लागू पडते, हे उघड आहे. इतिहासाच्या सैद्धांतिकतेचा विचार करण्याची क्षमता त्यांच्यात असेलही; पण त्या विचाराच्या वाटेला ते कधी गेल्याचे दिसत नाही. प्रबोधन काळापासून पुढे १९ व्या शतकापर्यंत पाश्चात्त्य जगतात जी वैचारिक क्रांती झाली, त्यातून आधुनिक सामाजिक शास्त्रे विकसित झाली आणि त्यांना नियमबद्धतेची व वस्तुनिष्ठतेची चौकट देण्याचे प्रयत्न सुरू झाले. फ्रेंच तत्त्वज्ञ व समाजशास्त्राचा जनक ऑगस्त कॉम्त, तसेच जर्मन इतिहासकार लिओपोल्ड फॉन रांके यांच्यासारख्यांच्या मांडणीतून १९ व्या शतकात प्रत्यक्षार्थवाद (Positivism) तथा वस्तुनिष्ठतावाद पुढे आला. त्यामध्ये कागदपत्रांचे, मूळ घटितांचे, वस्तुनिष्ठतेचे (Objectivity) महत्त्व ठसवले गेले. 'जे घडले ते जसेच्या तसे सांगणे' या तत्त्वाला आणि अस्सल साधनांवर आधारित इतिहाससंशोधनाला रांकेने महत्त्व दिले. 'No documents, no history', हे जणू या मंडळींचे ब्रीदवाक्यच होते. १९ वे शतक हे 'साधनांचे शतक' म्हणून ओळखले गेले. या परंपरेचा मोठा प्रभाव इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्यावर पडला. तो प्रभाव महाराष्ट्रातील इतिहासविश्वात झिरपत गेला. मेहेंदळे हेसुद्धा एका अर्थी या परंपरेचे पाईक म्हणता येतील. राजवाडे हे भारत इतिहास संशोधक मंडळाचे संस्थापक. द. वा. पोतदार, द. वि. आपटे, त्र्यं. शं. शेजवलकर, ग. ह. खरे, चिं. ग. कर्वे, शं. ना. जोशी, सरदार आबासाहेब मुजुमदार, वा. कृ. भावे, य. न. केळकर, दि. वि. काळे, रा. वि. ओतुरकर, चिं. ना. परचुरे, मा. मो. ओंकार इत्यादिकांची मंडळ परंपरा ही एका अर्थी राजवाडेंच्या प्रत्यक्षार्थवादी परंपरेतील प्रभावळ म्हणता येईल. स्वाभाविकपणे गजाभाऊ मेहेंदळे यांच्यासारखे जे तरुण पुढे भारत इतिहास संशोधक मंडळाचा भाग बनले, ते या परंपरेचा वारसा आत्मसात करून इतिहास-साधना करू लागले. मात्र येथे एक लक्षात ठेवले पाहिजे. या 'मंडळ परंपरे'चे मोठेपण लक्षात घेऊन आणि तिचा भाग असणाऱ्या (तसेच येथे नावे समाविष्ट नसलेल्या) प्रत्येक संशोधकाबद्दल आदर बाळगूनसुद्धा राजवाडे आणि मेहेंदळे यांचा विचार स्वतंत्रपणे करायला हवा. तो खरेतर एका स्वतंत्र लेखाचा विषय आहे; पण येथे त्याची किमान चर्चा तरी करायलाच हवी.

लेखाच्या सुरुवातीला मी राजवाडे आणि मेहेंदळे यांच्यातील साम्य सूचित केलेले आहेच. त्या दोघांच्या प्रत्यक्षार्थवादी असण्याचा उल्लेख आधीच्या परिच्छेदात आलेला आहे. 'नि:स्पृहपणे विख्यात व्हावे' ही रामदासोक्ती दोघांनाही लागू पडते. त्या दोघांच्या फकिरीतली श्रीमंती काही वेगळीच होती! मेहेंदळे यांनी आपला शिवाजी महाराजांवरील ग्रंथ राजवाडे यांना अर्पण केलेला आहे, हे स्वाभाविकच आहे. 'इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांची इतिहासदृष्टी' असा एक संशोधनपर लेख मी मंडळाच्या त्रैमासिकात (वर्ष ८३, अंक १ ते ४, जुलै २००६ – एप्रिल २००७, पृ. १३-२७) लिहिलेला होता. मंडळात ३१ डिसेंबर २००६ रोजी दिलेल्या 'राजवाडे स्मृति-व्याख्याना'वर तो आधारलेला होता. त्यांच्या बहुस्पर्शी प्रज्ञा, प्रतिभा व कार्यशक्तीविषयी त्या लेखात लिहिलेले आहे. राजवाडे हे खचितच आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील एक टोलेजंग व्यक्तिमत्त्व होते. त्या बाबतीत मेहेंदळे यांची तुलना राजवाडे यांच्याशी होऊ शकत नाही. मात्र इतिहास संशोधक म्हणून दोघांची तुलना शक्य आहे. किंबहुना अशी तुलना मनात येणे, हे मेहेंदळे यांच्या मोठेपणाचे एक गमक आहे. ही तुलना करताना माझ्या उपरोल्लेखित लेखातील एक विधान उद्धृत करतो : ''दुर्वास आणि दधीची अशा

समन्वयामुळे राजवाडे यांचे ऐतिहासिक ऋषित्व ‘धगधगितोज्ज्वळ’ बनले.’’ मेहेंदळे यांच्याबद्दलसुद्धा काही प्रमाणात हे लागू पडते. ‘धगधगितोज्ज्वळ’ हा शब्द मुळात तुकोबांचा. न्या. रानडे यांनी त्यांच्या एका ‘धर्मपर व्याख्याना’त त्याचा चांगला ऊहापोह केलेला आहे. असो. राजवाडे यांना जेमतेम चार-पाच वर्षांचे वैवाहिक आयुष्य लाभले. बाळंतरोगाने त्यांच्या पत्नीचे निधन झाले आणि नवजात मुलगाही लगेच निवर्तला. व्रतस्थ ब्रह्मचाऱ्याप्रमाणे त्यांनी उर्वरित सर्व आयुष्य आचरले. मेहेंदळे हेसुद्धा आजन्म ब्रह्मचारी होते. एक गमतीचा योगायोग असा की, राजवाडे (चार-पाच वर्षे वगळता), शेजवलकर, ग. ह. खरे आणि मेहेंदळे हे मंडळाशी संबंधित चार दिग्गज ब्रह्मचारी. त्या सर्वांनी आपला बहुतांश वेळ इतिहास संशोधनाच्या कामी कारणी लावला आणि मराठी इतिहासाचे दालन अतिशय समृद्ध केले. राजवाडे हे सरदार खंडेराव चिंतामण मेहेंदळे यांच्यासह भारत इतिहास संशोधक मंडळाचे संस्थापक होते. गजाभाऊ मेहेंदळे हे मंडळाच्या विशेष संवर्धकांपैकी एक होते. दोघांचेही मंडळावर निरतिशय प्रेम होते. मात्र मंडळ स्थापनेनंतर सुमारे सात वर्षांनी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या कामाविषयी राजवाड्यांची नाराजी ओढवली. राजवाडे एकदा चांगलेच कोपले आणि पोतदारांचा शब्दप्रयोग वापरायचा, तर ‘आपल्या स्वभावस्वतंत्रतेला वश होऊन’ त्यांनी जणू मंडळाला रामराम ठोकला. पुढे ते धुळे येथे जाऊन राहिले आणि तेथेच ३१ डिसेंबर १९२६ या दिवशी त्यांचे निधन झाले. तेथे त्यांच्या स्मरणार्थ ९ जानेवारी १९२७ रोजी ‘वि. का. राजवाडे संशोधन मंडळा’ची स्थापना झाली. गजाभाऊ मेहेंदळेसुद्धा काही वेळा रागाच्या भरात मंडळात येणे सोडून देत असत; पण ते तेवढ्यापुरतेच असे. राजवाड्यांप्रमाणे त्यांनी मंडळाला कायमचा रामराम ठोकला नाही. असो. हे दोघेही प्रत्यक्षार्थवादी, वस्तुनिष्ठतावादी होते. या संदर्भात मेहेंदळे यांच्याविषयी यापूर्वी चर्चा केलेली आहे; पण राजवाड्यांच्या भूमिकेबद्दल दोन शब्द लिहिणे आवश्यक वाटते. ‘मी फक्त मराठीतच लिहीन’ अशी राजवाडे यांची प्रतिज्ञा होती आणि ‘मराठीची तोंडदाबणी’ होत असल्याची रास्त तक्रार त्यांनी १९२६ मध्ये पुण्यातील शारदोपासक संमेलनात केली होती. मराठीचा असा जाज्वल्य अभिमान त्यांना असला तरी पाश्चात्त्य ज्ञानाचे महत्त्व ओळखून त्यांनी १८९४ मध्ये ‘भाषांतर’ हे नियतकालिक सुरू केले होते. मेहेंदळे यांनी मराठीतून विपुल लेखन केलेले असले तरी राजवाड्यांच्या पद्धतीचे भाषासेवक ते नव्हते आणि ती काही त्यांची उणीव म्हणता येणार नाही. राजवाडे यांची उभी हयात मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करण्यात आणि त्यांचे २२ खंड सिद्ध करण्यात खर्च झाली, हे यापूर्वी नमूद केलेले आहे. आज तंत्रज्ञानाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा हाताशी नसताना राजवाडे यांनी हे कार्य करण्यामागे जाज्वल्य राष्ट्रवाद आणि प्रत्यक्षार्थवाद या दोन्ही गोष्टी होत्या. ‘‘एक अस्सल चिटोरे सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे’’, हे त्यांचे उद्‍गार प्रसिद्ध आहेत. किंबहुना रांकेच्या प्रत्यक्षार्थवादाचा भारतीय आविष्कार राजवाडे यांच्या रूपाने पाहायला मिळतो. त्यांनी असे स्पष्टपणे नमूद केले होते की, ‘‘निर्मत्सर, तटस्थ, निरहंकार व निर्लेप वृत्तीने झाली असेल ती हकीगत प्रामाणिकपणे दिली पाहिजे.... स्वत:च्या किंवा समाजाच्या, देशाच्या किंवा स्वकीय कालाच्या अभिमानाला बळी पडून कोणत्याही प्रकारच्या पूर्वग्रहांना थारा देता उपयोगी नाही. इष्टानिष्ट मतांचे अधिष्ठान मनात कल्पून हकिगतीवर अभिप्राय देण्याच्या किंवा हकीगत इष्टानिष्ट भासविण्याच्या खोट्या भरीस पडता कामा नये.’’ स्वीकारार्ह अशा अस्सल, तसेच त्याज्य अशा दुय्यम साधनांबाबत ऊहापोह करून त्यांनी हे स्पष्ट केले होते की, ‘‘विश्वसनीय कागद सांगतील तोच आणि तेवढाच इतिहास, त्यात कल्पितांना स्थान असता कामा नये.’’ राजवाड्यांचे हे विचार एका अर्थी मेहेंदळे यांनी पुरेपूर अनुसरले. किंबहुना त्यांनी ते राजवाड्यांपेक्षाही काटेकोरपणे पाळले, असे दिसते.

खुद्द राजवाडे यांनी मात्र आपल्या उक्तीशी विसंगत कृती केल्याची उदाहरणे आढळून येतात! वस्तुनिष्ठतावादी राजवाडे प्रत्यक्षात ''शिवाजी आग्र्यास गेला होता, तो भर मोगल दरबारात औरंगजेबाचा खून पाडण्याच्या हेतूनेच'', अशी कल्पनेची भरारी मारतानासुद्धा आढळतात. ही विसंगती मेहेंदळे यांच्या लेखनात व भाषणात आढळत नाही. राजवाडे यांच्या विसंगती क्षम्य नाहीत, हे नक्की. मात्र त्यांचे एकंदर श्रेष्ठत्व लक्षात घेता त्यांच्या विसंगती चंद्रावरच्या डागासारख्या पाहाव्या, असे मला वाटते. पुढे जाण्यापूर्वी राजवाडे आणि मेहेंदळे यांच्यातील एक गमतीशीर साम्य-भेद सांगायचा, तर राजवाडे विड्या ओढत असत आणि मेहेंदळे सिगारेटी फुंकत असत. संशोधनाला वाहून घेतलेल्या त्यागी माणसांना कुठेतरी असा एखादा विरंगुळा हवाच ना! गजाभाऊ मेहेंदळे ऐतिहासिक कागदकेंद्री होते. ते हिंदुत्ववादी होते; पण त्यांच्या हिंदुत्ववादाने अस्सल कागदपत्रांना कधी कमी लेखले नाही, त्यांच्याशी कधी प्रतारणा केली नाही. त्यांच्या वस्तुनिष्ठतावादाला त्यांनी कधी कृत्रिमपणे वा खोडसाळपणे त्यांच्या जीवनातल्या विचारप्रणालीचा रंग फासला नाही. त्यांनी निवडलेले संशोधनाचे विषय त्यांच्या विचारप्रणालीकडे अंगुलीनिर्देश करतात; पण त्या विषयांच्या हाताळणीत काविळीचा दोष दाखवता येणार नाही. तेथे सत्याचा पद्धतीशास्त्रीय शोधच आढळतो. 'आमच्या देशात प्राचीन काळी विमाने वापरात होती, ताजमहाल हा मुळातला तेजोमहालच होता, किंबहुना जगातील प्राचीन स्थापत्याचे आविष्कार ही भारतीयांचीच कामगिरी आहे', असे अगाध प्रतिपादन मेहेंदळे यांनी कधी केले नाही. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या तुडुंब भरलेल्या ॲम्फी थिएटरमध्ये मेहेंदळे यांच्यासाठी श्रद्धांजली सभा झाली. या वेळी जे शोकसंदेश वाचले गेले, त्यांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे संदेश होते आणि संघाचे सहकार्यवाह कृष्णगोपाल हे प्रमुख पाहुणे होते. सध्याच्या भाजपानुकूल 'भारतीय इतिहास अनुसंधान परिषद (ICHR), नवी दिल्ली' या संस्थेचे अध्यक्ष प्रा. रघुवेन्द्र तंवर (जे खरोखरच विद्वान सद्गृहस्थ आहेत, हे मी अनुभवाने जाणतो) यांचीही प्रमुख उपस्थिती होती. संघ परिवाराने मेहेंदळे यांना इतके 'आपले' मानले असले, तरी ते संघाच्या 'पठडी'तले, 'भारतीय इतिहास संकलन समिती' छापाचे इतिहासकार आहेत, असे मला वाटत नाही कारण कागद बोलताहेत तेच सांगेन, कागदांचा रंग बदलणार नाही, असा जणू मेहेंदळे यांचा बाणा होता. ज्या सभेचा उल्लेख येथे केला, त्या सभेत मेहेंदळे यांचे एक चाहते चित्रकार 'चित्रमित्र' यांनी काढलेल्या एका सुंदर रेखाचित्राच्या प्रती त्यांनी अनेक उपस्थितांना वितरित केल्या. ते चित्र या लेखात छापलेले आढळेल.


गजाभाऊंच्या जीवनाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू असतीलच; पण 'हाडाचा वस्तुनिष्ठ इतिहास संशोधक' हेच त्यांचे जीवनसार म्हणता येईल! चांगल्यावाईटाची लेबले न लावता येथे राजवाडे यांचे त्यांच्यापासूनचे वेगळेपण लक्षात घ्यावे लागेल. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर थोड्या दिवसांनी गजाभाऊ जन्मले. राजवाडे यांचे संपूर्ण जीवन मात्र पारतंत्र्यात व्यतीत झाले. दुसरे असे की, इतिहासकार हा त्यांच्या अनेक पैलूंपैकी एक पैलू होता. तसेच ते इतिहास-चिंतक होते, तत्त्वज्ञ होते. त्यांची मते पटतील वा पटणार नाहीत, त्यांच्यात विसंगती आढळतील, त्यांच्या मर्यादा जाणवतील; पण त्यांनी इतिहासाविषयी काही मूलभूत तात्त्विक चर्चा केलेली आहे, हे महत्त्वाचे. इतिहास हे त्यांच्यासाठी एक साम्राज्यवादविरोधी व राष्ट्रवादी हत्यारसुद्धा होते. राजवाडे हे खऱ्या अर्थाने एक चतुरस्र विद्वान होते आणि राष्ट्रवादी बुद्धिमंत होते. त्यांची प्रतिभा बहुमुखी होती. ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी असे म्हटले होते की, ''त्यांच्या

बुद्धीचे लघुगुरुत्व माझ्या मते (१) भाषाशास्त्रज्ञ (२) वैय्याकरण (३) शब्दसंग्राहक (४) इतिहाससंशोधक या अनुक्रमाने आहे.'' एकंदरीत, विश्वनाथ काशिनाथ राजवाडे आणि गजानन भास्कर मेहेंदळे यांच्यात प्रत्यक्षार्थवादी इतिहास संशोधनपद्धती संदर्भातील साम्य जाणवले तरी मेहेंदळे यांना प्रति–राजवाडे संबोधण्याच्या मोहात कोणी न पडलेले बरे! प्रति–राजवाडे ही गोष्ट शक्य नाही आणि प्रति–मेहेंदळे ही गोष्टही शक्य नाही. ब्रह्मदेवाने आता पुन्हा एकदा प्रतिसृष्टी निर्माण करायचा घाट घातला, तर आमचे हे दोन इतिहास संशोधक त्याची पार पंचाईत करून टाकतील! हेसुद्धा त्यांच्या मोठेपणाचे एक रहस्य आहे.

गजानन भास्कर मेहेंदळे हे माझ्यापेक्षा सात वर्षांहून थोडे अधिक मोठे. म्हणजे तसे आम्ही समकालीनच. मी सुमारे अर्धशतकभर तरी त्यांना पाहत आलो. आधी म्हटल्याप्रमाणे त्यांचे–माझे संबंध निकटचे नसले तरी सौहार्दाचे होते. त्यांच्यापेक्षा प्रदीप रावत अधिक जवळचे. पदव्युत्तर शिक्षण घेत असताना मी आणीबाणीच्या काळात सत्याग्रह करून तुरुंगात गेलो, तेव्हापासून रावत यांची ओळख. तसेच मंडळ परिवारातले प्राचार्य नंदकुमार निकम, डॉ. रवींद्र लोणकर, डॉ. बी. डी. कुलकर्णी, डॉ. चंद्रकांत अभंग आणि रवींद्र ठिपसे हे तर मित्रच. पांडुरंग बलकवडे हेसुद्धा स्नेही. अन्य स्नेहीजन खूपच आहेत. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी मी मंडळाचा सभासद झालो. १९८० साली मंडळाचा आजीव सभासद झालो. मंडळाच्या कट्ट्यावरील गप्पांच्या अड्ड्यापासून मंडळाच्या ग्रंथालयापर्यंत आणि थेट अध्यक्षांच्या केबिनपर्यंत मी संचार केलेला आहे; पण हे फारच नैमित्तिक. मी मंडळात दैनंदिन हजेरी लावणाऱ्यांपैकी नव्हतो आणि नाही. सार्वजनिक संस्था म्हटली की, राजकारण आलंच! मंडळातही ते होतंच. मी सदैव त्यापासून दूर राहिलो; पण वार्षिक सभेला उपस्थित राहणे, मतदान करणे, अनेक कार्यक्रमांना उपस्थित राहणे आणि काही मदत वा कामासाठी हाक आली, तर तत्परतेने प्रतिसाद देणे, ही माझी पद्धत. स्वाभाविकपणे मंडळात सक्रिय असणाऱ्या गजाभाऊ मेहेंदळे यांच्याशी जरुरीपुरता संबंध येत असे. माझे गुरुजन असणारे डॉ. अ. रा. कुलकर्णी, डॉ. ग. भा. जोशी, प्रा. म. आ. कुलकर्णी हे मंडळाच्या कारभारात शिरण्यास उत्सुक होते; पण त्यांना ते फारसं साध्य झालं नाही. ग. ह. तथा तात्या खरे मंडळाच्या कारभारात असत; पण राजकीय डावपेचांमध्ये नसत, अशी माझी समजूत आहे. मंडळात डॉ. म. श्री. माटे, डॉ. गो.त्र्यं. कुलकर्णी, डॉ. उषा रानडे, डॉ. कमल चव्हाण इ. लोकांचे कार्यकारी मंडळ बराच काळ कारभार पाहत होते. त्या सर्व ज्येष्ठांशी माझा थोडाफार संबंध येत असे. मंडळात 'मध्ययुगीन भारत वर्ग' या अभ्यासक्रमासाठी मी अध्यापन केले होते (१९८१–८२ व १९८६–८७) आणि १९८३ च्या (मुख्यत: डॉ. गोपाळ बेणारे आयोजित) पंढरपूर येथील महाराष्ट्र इतिहास परिषदेस मंडळ चालकांसह मीही उपस्थित राहिलो व माझ्या आयुष्यातील पहिले शोधनिबंध वाचन केले. पुढे मात्र मंडळाच्या कारभाऱ्यांविरुद्ध असंतोष निर्माण होत गेला आणि त्यांना विरोध करणारा एक गट उभा राहिला. त्यामध्ये गजानन मेहेंदळे चांगलेच सक्रिय होते. प्रा. म. आ. कुलकर्णी, प्राचार्य नंदकुमार निकम, डॉ. रवींद्र लोणकर इ. मंडळीही सक्रिय झाली होती. प्रदीपदादा रावत आणि निनाद बेडेकर हे तर मेहेंदळे यांचे मित्रच. यादी वाढवत नाही. मुद्दा असा की, मंडळात राजकारण तापत गेले. मी, चंद्रकांत अभंग असे काही लोक अलिप्त राहिलो. दरम्यान कोर्टकचेऱ्या सुरू झाल्या. अखेर १९९१ मध्ये चॅरिटी कमिशनरच्या आदेशानुसार आधीचा कारभार स्थगित होऊन सहा महिन्यांसाठी एका मध्यावधी समितीकडे तात्पुरता कारभार सोपवला गेला; पण कोर्टकचेऱ्यांमुळे हे मध्यावधी मंडळच सुमारे २६ वर्षे कारभार करत होते. प्रा. श्री. मा. भावे यांनी या समितीचे कार्यवाह आणि पुढे २०१७ साली निवडणूक झाल्यानंतर २०२० पर्यंत मंडळाचे अध्यक्ष या नात्याने सुमारे तीन दशके मंडळाची धुरा वाहिली. सर्वांना सांभाळून घेत विधायक मार्गाने त्यांनी मंडळाचा

कारभार पाहिला. नको असलेल्यांची सत्ता गेल्यामुळे या सर्व व्यवस्थेवर मेहेंदळे समाधानी होते. किंबहुना या काळात राजकीय रणधुमाळी थंडावली, तसे मेहेंदळे यांचे संशोधनकार्य अधिक जोमाने चालू राहिले. मेहेंदळे म्हणजे सडाफटिंग गृहस्थ. कॉटबेसिस तत्त्वावर एका होस्टेलमध्ये बरीच वर्षे राहिले. साधी राहणी आणि मिताहार. सिगारेटपेक्षाही व्यसन कागदपत्रांचे, पुस्तकांचे, संशोधनाचे. पुढे प्रदीपदादा रावत यांचा प्रेमळ आधार त्यांना मिळाला. जागा बदलली. स्थैर्य येत गेले. गजाभाऊ आणि प्रदीपदादा यांचे नाते रामलक्ष्मणाचे शोभावे असे. त्यांची वैचारिक कुंडली छान जुळत होती. मंडळाविषयीची त्यांची तळमळ अगदी तोडीस तोड. दोघेही हिंदुत्ववादी असले तरी दोघे बुद्धिवादाने मार्गक्रमणा करणारे. 'की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने' ही गोष्ट दोघांमध्ये समान. प्रदीपदादा पुण्याचे भाजपचे खासदार म्हणून निवडून आले, तेव्हा अगदी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना सांगून त्यांनी लोकसभा सदस्यत्वाची जी शपथ घेतली ती परमेश्वराला स्मरून नव्हे, तर सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून आणि राज्यघटनेवर हात ठेवून! मुद्दा असा की, रावत-मेहेंदळे हे दोघे हिंदुत्ववादी खरे; पण कोणाच्या आदेशावर चालणारे नव्हते. स्वतंत्र बुद्धीने, मंडळाच्या हिताला प्राधान्य देऊन आणि आपण आखून घेतलेल्या शिस्तीने काम करणारे होते. रावत हे प्रत्यक्ष कारभार चालवणारे. प्रा. भावे यांच्या निधनानंतर २६ ऑक्टोबर २०२० रोजी ते मंडळाचे अध्यक्ष झाले. गजाभाऊ प्रत्यक्ष कारभारात कधीच पडले नाहीत; पण ते मंडळाच्या कारभारामागील प्रेरक शक्ती होते, नैतिक धाकही होते. आजचे कोषाध्यक्ष प्राचार्य नंदकुमार निकम हे मूळचे काँग्रेसच्या विचारसरणीचे बारामतीकर असले तरी मंडळाच्या कारभारात मेहेंदळे-रावत यांच्याशी त्यांचा चांगला स्वरमेळ जुळून आला. किंबहुना मंडळाचा कारभार आता एका उदार ध्येयवादी इतिहासनिष्ठ चौकटीत होऊ लागला. सर्वच विश्वस्तांचे, कारभारी मंडळाचे स्नेहबंध असे गुंफले गेले की, सर्वत्र करड्या शिस्तीच्या कारभारासाठी ओळखले जाणारे आणि महाविद्यालयात दरारा असणारे निकम सर गजाभाऊंच्या श्रद्धांजली सभेचे प्रास्ताविक करायला उभे राहिले, तेव्हा चांगलेच गहिवरले. मंडळाकडे आता सुदैवाने पैशांचा ओघ सुरू आहे; पण त्याहीपेक्षा तेथे संशोधनार्थ निर्माण झालेली ही कुटुंबभावना फार महत्त्वाची आहे. ती निर्माण करण्यात गजाभाऊ मेहेंदळे, प्रदीपदादा रावत आणि त्यांचे सर्व सहकारी यांचा मोलाचा वाटा आहे. मंडळासारख्या संशाधन-संस्थेत अभ्यासक तरुणांची गर्दी असण्याचा चमत्कार घडण्यामागे खचितच गजाभाऊ आणि सहकाऱ्यांचे प्रयत्न कारणीभूत आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये गजाभाऊ मेहेंदळे यांच्या-माझ्या संबंधातील जिव्हाळा अधिक वाढत गेला. आम्ही वारंवार भेटत व बोलत असू असे नाही; पण भेटलो की होणारा छोटासा संवाद आनंददायी असे. मंडळाच्या वर्धापनदिनाला भेट हमखास ठरलेली. मंडळात तर भेटी होत असतच; पण इतरत्रसुद्धा होत असत. उदारणार्थ काही वेळा दिल्लीत. २०१८ ते २०२३ या काळात सुमारे चार वर्षे मी दिल्लीच्या भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेचा (ICHR) सदस्य होतो. २८ सप्टेंबर २०१९ या दिवशी पुण्याला परतण्यासाठी मी दिल्ली विमानतळावर विमानाच्या प्रतीक्षेत बसलो होतो आणि बघतो तर काय, मेहेंदळेसुद्धा अशाच प्रतीक्षेत होते. मग आमच्या छान गप्पा रंगल्या. मी आमचा एक फोटो काढला. तो या लेखात छापलेला आढळेल. ICHR चे अध्यक्ष प्रा. अरविंद जामखेडकर हे काही सभांना मेहेंदळे यांना अभ्यागत म्हणून निमंत्रित करत असत. एकदा भारताच्या इतिहासाचा एका राष्ट्रीय परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम आमच्यापुढे चर्चेला आला. त्या चर्चेत मध्ययुगीन इतिहासावरील भागाच्या एका पाठाच्या शब्दरचनेवरून वाद उद्‌भवला. 'शिवाजी महाराजांचा आणि मुस्लीम सत्तांचा संघर्ष' अशी काहीशी शब्दरचना होती. याला मी विरोध केला. त्यावर मेहेंदळे यांनी त्या शब्दरचनेचे समर्थन केले. शिवाजी





**प्रसन्न तपस्वी**


महाराजांचे अनेक शत्रू जसे मुसलमान होते, तसे काही शत्रू हिंदुसुद्धा होते हे एक, दुसरे असे की, हा अभ्यासक्रम राष्ट्रीय स्तरावर सर्व धर्मांच्या व्यक्तींसाठी आहे. त्यामुळे एका विशिष्ट समाजाला दुखावणारी शब्दरचना असता कामा नये, असा शैक्षणिक संकेत आहे, अशी काहीशी माझी मांडणी होती. मेहेंदळे यांना ते अमान्य होते. आम्ही दोघेही आपले मुद्दे धरून बसलो आणि हिरिरीने वाद घालत बसलो. बाकीचे अनेक सदस्य अवाक् होऊन आमचा वाद ऐकत होते आणि अध्यक्ष प्रा. जामखेडकर हे जरा अडचणीत आल्यासारखी परिस्थिती होती; पण अखेर हा अनिर्णित वाद अंतिम निर्णयासाठी अध्यक्षांवर सोपवून आम्ही सगळे मोकळे झालो. नंतर त्याचे काय झाले कोण जाणे! पण सांगायची गोष्ट अशी की, त्या शैक्षणिक व तात्त्विक वादाने मेहेंदळे आणि माझ्या संबंधांवर पुढे जरासुद्धा चरा उमटला नाही. यानंतर कधी आमचा असा वैचारिक सामना झाला नाही; पण झाला असता तरी आमचा स्नेह आहे तसाच राहिला असता याची मला खात्री आहे. आधुनिक महाराष्ट्राचा, विशेषतः १९ व्या शतकाचा इतिहास हे माझे अभ्यासातले विशेषीकरण होते; पण इतिहास ही सातत्य आणि बदल यांची कहाणी असल्यामुळे आधुनिक महाराष्ट्र समजावून घेण्यासाठी मध्ययुगीन महाराष्ट्राचा, विशेषतः मराठ्यांचा इतिहास थोडाफार तरी अभ्यासावाच लागतो. त्यामुळे मेहेंदळे वाचणे वा ऐकणे मला महत्त्वाचे वाटत असे. अशाच काही कारणाने असेल का, हे मला माहीत नाही; पण गजाभाऊ माझी भाषणे आवर्जून ऐकत असत. ३१ डिसेंबर २००६ चे 'राजवाड्यांची इतिहासदृष्टी' या विषयावरचे 'राजवाडे स्मृतिव्याख्यान,' २० फेब्रुवारी २००७चे औरंगजेब बादशाहच्या मृत्यूच्या ३००व्या वर्षपूर्ती चर्चासत्रातले व्याख्यान, २८ एप्रिल २००९चे पराग टोपे लिखित 'तात्या टोपेज ऑपरेशन रेड लोटस' या इंग्रजी ग्रंथ-प्रकाशनावेळच्या परिसंवादातले व्याख्यान ही त्याचीच उदाहरणे होत. मंडळाच्या शताब्दीनिमित्त दरमहा एक याप्रमाणे देशभरातल्या बारा अभ्यासकांची व्याख्याने आयोजित करण्याची जबाबदारी माझ्याकडे सोपवण्यात आली. त्यासाठी ICHRचे अनुदान मिळवून मी व्याख्यानमाला (२००९-१०) घडवून आणली. त्या मालेत २८ ऑक्टोबर २००९ रोजी मेहेंदळे यांचे 'भा. इ. सं. मंडळाचे शिवचरित्राच्या अभ्यासाला योगदान' या विषयावर व्याख्यान झाले. ६ जुलै २०१० या दिवशी प्रतापराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंडळ शतकपूर्ती समारंभ झाला. २७-२८ सप्टेंबर २०१० रोजी 'मराठ्यांच्या इतिहासातील कुटस्थळे' या विषयावर माझ्या संयोजनातून राज्यव्यापी परिषद भरवण्यात आली. या सर्व प्रसंगी मला अर्थातच औपचारिक असे बोलावे लागत असे किंवा स्वतंत्र भाषणेही द्यावी लागत. ही बोलूनचालून मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित व्याख्याने तरी होती; पण मंडळाच्या आणि मेहेंदळे यांच्या लेखनाच्या पठडीबाहेरची व्याख्याने मी मंडळात जाणीवपूर्वक दिली होती. उदाहरणार्थ, २५-२६ मे २०१३ रोजी ग. ह. खरे स्मृतिप्रीत्यर्थ 'इतिहास आणि वस्तुनिष्ठता' या विषयावर, तर ५-६ जून २०१६ रोजी 'इतिहास आणि अवकाश (Space)' या विषयावर दिलेली व्याख्याने.


गजाभाऊंनी ही सर्व व्याख्याने मागच्या रांगेतील खुर्चीवर बसून काळजीपूर्वक ऐकली होती. ७ जुलै २०२१ रोजी मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.बी.डी. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष कार्यक्रम झाला. त्यामध्ये पहिला 'सरदार आबासाहेब मुजुमदार पुरस्कार' मला प्रा. अरविंद जामखेडकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मंडळाच्या त्रैमासिकाचे, तसेच अनुपमा मुजुमदार यांच्या 'सरदार आबासाहेब मुजुमदार ऐतिहासिक लेखसंग्रह' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. बहुधा आपल्याकडे पुस्तक-प्रकाशनाची जबाबदारी येईल, याची कल्पना आल्याने प्रसिद्धीपराङ्मुख मेहेंदळे व्यासपीठ टाळून सभागृहाच्या आसपास कोठेतरी जाऊन थांबले होते. महाराष्ट्र टाइम्स आणि एच. व्ही. देसाई महाविद्यालय यांच्या वतीने डॉ. गणेश राऊत यांनी हेरिटेज वॉकच्या निमित्ताने मंडळाच्या इतिहासावर १३ जुलै २०१४ आणि ६ जुलै २०२४ रोजी माझी व्याख्याने मंडळात आयोजित केली होती. त्यातील एका व्याख्यानानंतर गजाभाऊंनी सांगितले होते, "छत्रपती शिवाजी महाराजांच्या उपलब्ध झालेल्या दोनशे पत्रांपैकी १२१ पत्रे भारत इतिहास संशोधक मंडळात उपलब्ध आहेत. त्यामुळे शिवचरित्राचा अभ्यास करणाऱ्यांना मंडळाशिवाय वेगळा पर्याय नाही." मंडळातल्या असंख्य कागदपत्रांची खडानखडा माहिती त्यांना होती. मी संपादित केलेल्या शताब्दी स्मरणिकेसाठी 'शिवचरित्र आणि भारत इतिहास संशोधक मंडळ' असा एक लेख गजाभाऊंनी आवर्जून लिहिला होता.

गजाभाऊंच्या 'दुर्वास'रूपाचा अनुभव व्यक्तिश: माझ्या वाट्याला कधीही आला नाही. माझे वडील म. श्री. दीक्षित यांच्या वाट्याला मात्र तो एकदा आला होता. मेहेंदळे आणि म.श्री. या दोघांचा संबंध मंडळात आणि चित्पावन संघात येत असे. मेहेंदळे सात्त्विक संतापाने हट्टाला पेटले की, संस्थांमध्ये सत्तापालट घडवण्यात कुशल होते. तसे त्यांनी चित्पावन संघात केल्याचे मला वडलांकडून समजले होते. मश्री आपल्या जातीचा अभिमान बाळगून होते. मात्र सार्वजनिक कार्यात त्याचा अडसर त्यांनी कधी येऊ दिला नाही. माझी भूमिका जातीविरोधाची होती आणि मला वडलांचे हे कार्य पूर्ण नापसंत होते. स्वाभाविकच मेहेंदळे यांचे जातीप्रेमही मला नापसंत होते. मात्र माझ्या दृष्टीने तो त्यांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न होता. मश्री आणि मेहेंदळे या दोघांचेही जातीप्रेम सार्वजनिक जीवनात संकुचित बनले नाही आणि संस्थांच्या कारभारात त्यांनी जातीनिरपेक्ष वर्तन ठेवले. चित्पावन संघ हा एक छोटा निरुपद्रवी अपवाद! एकदा एका स्मरणिकेच्या कामासंदर्भात मश्री प्रसिद्ध चित्पावनांची विस्तृत यादी बनवत होते. त्या यादीत माधुरी दीक्षित यांचा समावेश करण्यावरून मंडळाच्या कट्ट्यावर त्यांचा आणि मेहेंदळे यांचा जोरदार खटका उडाला. जरा अशिष्ट भाषा वापरत मेहेंदळे यांनी माधुरी दीक्षित यांच्या नावाला विरोध केला. मश्री यांनी तो खोडून काढला. यावरून संतापलेल्या मेहेंदळे यांनी मश्रींना एक प्राणीनामदर्शक शिवी दिली आणि मश्रींनी दुसऱ्या प्राणीनामदर्शक शिवीने परतफेड केली! हा किस्सा मला मश्रींकडून आणि काही मित्रांकडून समजला. मेहेंदळे यांचे हे वर्तन चुकीचे असल्याचे माझे मत बनले. विशेषतः एका अभिनेत्रीबद्दल ज्या अनुदार पद्धतीने ते बोलले, ते माझ्यासारख्या स्त्री-पुरुष-समतावादी व्यक्तीला खटकणारे होते. मश्री आणि मेहेंदळे या दोघांचे गालीप्रदानसुद्धा माझ्या स्वभावाला



















गजानन मेहेंदळे यांची ग्रंथसंपदा



मेहेंदळे-दीक्षित-दिल्ली विमानतळावरील भेट (२८ सप्टेंबर २०१९)

मानवणारे नव्हते; पण या ऐकीव वादात मी अर्थातच पडलो नाही. मुद्दा असा की, या प्रसंगाचा फारसा बाऊ न करता मश्री आणि मेहेंदळे पुढे एकमेकांशी वागत राहिले. मेहेंदळे यांच्या माझ्याशी वागण्यात तर त्याचा सुतरामही संबंध आला नाही. माझ्या पुढच्या पिढीशीसुद्धा ते चांगले वागले. माझा मुलगा निखिल याला फार्सी आणि नाणकशास्त्र यांमध्ये बराच रस आहे. २००५ साली तो फार्सीसंदर्भातील काही शंका विचारण्यासाठी गजाभाऊंना भेटला. तेव्हा अतिशय आस्थापूर्वक गजाभाऊंनी त्याचे शंकानिरसन तर केलेच; पण 'केव्हाही अवश्य येत जा' असेही त्याला सांगितले. मात्र नेमक्या त्याच सुमारास निखिलला नोकरीसाठी बंगलोरला जावे लागले. निखिलसारख्या अनेक तरुणांसाठी मेहेंदळे हा ज्ञानात्मक आधार होता. गजाभाऊंच्या विक्षिप्तपणाच्या, विशेषतः कोपिष्टपणाच्या कथा ऐकायला मिळतात आणि मिळत राहतील. काही वेळा त्यांना संताप अगदी अनावर होत असे. मग रागाच्या भरात ते समोरच्या व्यक्तीला अपमानित करायला मागेपुढे पाहत नसत. समोरच्याचे पुस्तक, कागदपत्र, ऐतिहासिक नाणे अशा वस्तू त्यांनी भिरकावून दिल्याची उदाहरणे ऐकिवात आहेत. ही झाली व्यक्तींच्या पातळीवरील गोष्ट; पण ५ जानेवारी २००४ या दिवशी जेम्स लेन या अमेरिकी लेखकाच्या वादग्रस्त पुस्तकावरून भडका उडून पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेवर जो हल्ला झाला, त्या पार्श्वभूमीवर गजाभाऊंनी अत्यंत उद्विग्न मन:स्थितीत आपल्या शिवचरित्रासाठी लिहिलेली शेकडो पाने फाडून टाकली. त्यांच्या मनावर झालेला आघात समजू शकतो; पण आपल्या शिवचरित्राच्या हस्तलिखिताची पाने अशा रीतीने नष्ट करण्याचा आततायीपणा त्यांनी करायला नको होता. ती इतिहास जगताची फार मोठी हानी होती. एका हानीने दुसरी हानी भरून निघते का? असो. अशा सामाजिक शोकांतिकांपासून योग्य तो बोध पुढच्यांनी घ्यायला हवा, हे नक्की! एकंदरीत, गजानन भास्कर मेहेंदळे यांची दोन परस्परविरोधी रूपे होती. मानवी व्यक्तिमत्त्व असे असते खरे! गजाभाऊ संतप्त झाले की, क्रुद्ध ऋषीप्रमाणे दिसत असत, तर प्रसन्न असले की कधीकधी त्यांच्या चेहऱ्यावर एखाद्या बालकासारखे निरागस हसू झळकत असे. समुद्र जसा रौद्र आणि प्रशांत रूपे धारण करत असतो, तशी राजवाडे किंवा गजाभाऊंसारखी मोठी माणसेही दोन परस्परविरोधी रूपांमध्ये प्रकट होत असतात. या मानवी छटांपलीकडे उभे असणारे त्या व्यक्तींचे भरभक्कम कार्य आपल्याला दीर्घकाळ प्रेरणा देणारे असते, उपयोगी पडणारे असते. त्यांच्या कार्यपूर्तीआधीच त्यांची अवतारसमाप्ती झाली, तर समर्थ रामदासांनी सांगून ठेवल्याप्रमाणे हे लक्षात घ्यायचे की,

''व्हावया वस्तूची प्राप्ती। साधक साधनें करिती।।
तंव ते वस्तु आहुती। साधकाची मागे।।''

महाराष्ट्रात इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात एकोणिसाव्या शतकापासून चांगल्या अर्थाने काही 'दांडगी' व्यक्तिमत्त्वे होऊन गेली. राजवाडे आणि शेजवलकर ही त्याची दोन ठळक उदाहरणे. माझ्या समकालीनांमध्ये इतिहास-लेखनातील दोन 'दांडगी' व्यक्तिमत्त्वे म्हणजे प्रा. डॉ. सदानंद मोरे आणि गजानन भास्कर मेहेंदळे. हा लेख म्हणजे गजाभाऊ मेहेंदळे या 'दांडग्या' इतिहासकाराला मी केलेले विनम्र अभिवादन आहे आणि त्याच्याविषयीचे माझे छोटेसे सर्जनशील आकलनसुद्धा आहे.

■■

**प्रा. डॉ. राजा दीक्षित**
संपर्क : ९७६७७८८९५४ smrajadixit@gmail.com

# भैरप्पा गेले तेव्हा!


## गणेश कुलकर्णी

२४ सप्टेंबर २०२५ या दिवशी ज्येष्ठ साहित्यिक, ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व डॉ.एस.एल.भैरप्पा यांचे निधन झाले आणि अवघे साहित्य विश्व झाकोळून गेले. आपल्या कादंबऱ्यांतून हिंदू तत्त्वज्ञान अतिशय प्रवाही कथानकाच्या माध्यमांतून सांगणारे भैरप्पा, हे व्यासंगी साहित्यिक होते, असे म्हणावे लागेल. आपली साहित्यकृती निर्माण करताना त्यामागे त्यांचे केवळ कष्ट नव्हते, तर त्यामागे त्यांची साधना असे. 'पर्व' ही कादंबरी लिहिताना त्यांनी महाभारतातील उल्लेखित अनेक स्थळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या होत्या. 'वंशवृक्ष' सारखी अद्वितीय कादंबरी लिहिताना त्यांनी म.म.पा.बा. काणे यांचे धर्मशास्त्रावरचे सहाही खंड वाचले होते, त्याशिवाय इतर अनेक ग्रंथांचे परिशीलन केले होते. त्यांच्या साधनेला मर्यादा नव्हत्या असेच म्हणावे लागेल. उमाताई कुलकर्णी यांनी त्यांच्या अनेक कादंबऱ्यांचे इतके सरस अनुवाद मराठी भाषेत केले आहेत, की ते मूळ साहित्यच वाटावे! उमाताईं यांच्यामुळेच मराठी वाचकांना कन्नड साहित्याची ओळख जवळून झाली. भैरप्पा यांचे परिचित श्री. गणेश कुलकर्णी यांचा हा भैरप्पांना आदरांजली वाहणारा लेख!

भैरप्पा गेल्याची बातमी आली, खात्री करून घेतली, मनात उगाचच वाटत होतं, की हे खोटं असू दे वगैरे पण बातमी खरीच होती. मौनच व्हावंसं वाटलं. डोळे कशानं तरी भरून यायला लागले, हुंदका दाटून आला. आपल्या कुणीतरी फार जिवाभावाचं आपल्याला सोडून गेलंय असं खोलवर वाटत राहिलं. भैरप्पांनीही अनेक मृत्यू बघितले होते आणि तेही कोवळ्या वयात. त्यांची आई वारली याची बातमी त्यांच्यापासून लपवून ठेवली होती, ते रात्री अपरात्री उठून आईच्या नावाने हाक मारायचे, हेही त्यांनीच कुठेतरी लिहिलं म्हणूनच आपल्यापर्यंत पोहोचलंय.

भैरप्पांच्या बरोबर एक वेगळाच बंध जुळलेला होता. वाचनाचा परीघ वाढत गेला, की एका टप्प्यावर तुम्हाला भैरप्पा भेटतातच. कन्नड साहित्यातील नव्योदय परंपरेतील प्रगतिशील परंपरेचे वाहक असलेल्या भैरप्पांनी विविध विषयांवर लेखन केलेलं आहे. म्हैसूर, नंतर गुजरातमधील सरदार पटेल विश्वविद्यालय नंतर दिल्ली अशा विविध ठिकाणी तत्त्वज्ञानाची प्राध्यापकी करत त्यांनी विपुल लेखन केलं आहे. त्यांची प्रत्येक पात्रं आपापल्या कृतींमागील विचार आपल्याला सांगतात आणि ते विचार बरोबर आहेत की नाही याचा निर्णय भैरप्पा आपल्यावर सोडतात.

गरीब ब्राह्मण घरात जन्मलेल्या आणि लहानपणी प्लेगच्या साथीत मातृछत्र हरवलेल्या भैरप्पांनी शिक्षणाला मध्येच विराम देऊन मुंबईत हमाली केली, नंतर साधूंच्या मागे जीवनाचा शोध घेत फिरले आणि शेवटी पुन्हा शिक्षणाकडे वळून त्यांनी तत्त्वज्ञानावर आपली पीएच.डी. पूर्ण केली. 'सत्य आणि सौंदर्य' हा त्यांचा प्रबंध समजून घेण्यासाठी तरी आपण कन्नड शिकायला हवं. त्यांचं 'माझं नाव भैरप्पा' वाचून कमालीचा भारावून गेलो होतो. हळूहळू त्यांच्या एकेक कादंबऱ्या वाचण्याचा सपाटाच लावला. 'पर्व'ने तर त्या वेळी माझ्यावर गारूडच करून टाकलं होतं. त्या वेळी भैरप्पा आणि उमाताई यांच्याबद्दल काहीच कल्पना नव्हती. ते समजण्याची समजही त्या




वयात नव्हती. नंतरच्या आयुष्यात या दोघांनी माझ्या समग्र आयुष्यालाच वेढून टाकलं. नियतीने हे असं दान माझ्या पदरात टाकून मला कायमचं ऋणात टाकून ठेवलंय. उमाताईंनी त्यांच्या बहुतेक महत्त्वाच्या कादंबऱ्या मराठीत अनुवादित केल्या आहेत. त्याबाबत त्या म्हणतात, ''माझा प्रयत्न त्यांची भाषा पकडण्याचा नाही, तर त्यांच्या लेखनाची लय पकडण्याचा आहे. माझी स्वतःची भाषा निवडण्याचा आणि त्यांच्या लेखनाच्या लयीनुसार ती जुळवून घेण्याचा हा प्रयत्न आहे.'' भैरप्पा वाचणं, समजणं ही एक प्रक्रिया होती; पण कोरोना काळात मला त्यांच्या वर लिहिण्यासाठी विचारलं गेलं त्या वेळी या सगळ्याला एक वेगळेच धुमारे फुटले.

माझा जन्म विजापूरचा त्यामुळे मलाही तिथे जायला आवडायचं. कानडी भाषेत संवाद साधताना काही अडचण नव्हती; पण ती भाषा वाचता न आल्याने आपलं काही अडेल, असं मात्र त्या काळात मुळीच वाटत नव्हतं. नंतर कधीतरी जेव्हा भैरप्पांचं साहित्य वाचायला घेतलं तेव्हा त्यांच्या कादंबरीतले प्रसंग माझ्या अवतीभोवती घडतात की काय, असं वाटण्याइतपत मी त्यात रमून गेलो. भाषा मराठी होतीच; पण वातावरण मात्र माझ्या अधिक जवळचं होतं, ओळखीचं होतं. भैरप्पा समजून घेताना मला माझ्या आजोळी घालवलेल्या दिवसांचा नकळत उपयोग झाला. त्या वेळी प्रथमच मला माझ्या कर्नाटकातील आजोळी घालवलेल्या दिवसांकडे पुन्हा नव्यानं पाहावंसं वाटलं. तोपर्यंत माझा कानडी साहित्याशी काहीच परिचय नव्हता. एक तर वय लहान आणि त्या भवतालात असं काही मुळातच नव्हतं. प्रचंड कर्मठपणा, रुढी- परंपरा यांचा मात्र जबरदस्त पगडा, सोवळंओवळं यांचं माजलेलं स्तोम एवढंच काय ते जाणवत होतं; पण नंतर भैरप्पा वाचताना अनुवादित पुस्तकांच्या भाषेचा डौल प्रथमच लक्षात येत होता. विजापूर-धारवाडकडे बोली भाषा फारच रांगडी आहे. त्यामानाने बेंगलुरू-मैसूरची भाषा फारच गोड आहे. म्हणजे आमच्या आजोळच्या भाषेला पुरुषी भाषा म्हणून हिणवले जाते. बेंगलुरु-मैसूरच्या भाषेला स्त्रैण भाषा म्हटले जाते. भैरप्पा जसजसा वाचत गेलो तेव्हा अनेक गोष्टींची नव्यानं जाणीव होत गेली.

त्यांच्या सगळ्या कादंबऱ्या प्रदीर्घ आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांमधील स्त्री पात्रं नेहमी कणखर

रंगवलेली जाणवतात. ‘वंशवृक्ष’ वाचल्यावर त्यातल्या अनेक पात्रांची गर्दी बघून मराठीमधल्या ‘तुंबाडचे ख़ोत’ किंवा ‘कोसला’ची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. महेश एलकुंचवार यांचं ‘वाडा चिरेबंदी’ आणि ‘मग्न तळ्याकाठी’ बघताना भैरप्पांच्या वंशवृक्षचे संदर्भ मनात जागे होतात, हा सार्वत्रिक अनुभव. भैरप्पा असे तुम्हाला वेढून टाकणारे लेखक आहेत. भैरप्पांनी महाभारत हा विषय आधार धरून लिहिलेली ‘पर्व’ कादंबरी मला अधिक आवडते. या कादंबरीसाठी भैरप्पा तब्बल पाच एक वर्षे संशोधन करत होते, असेही वाचलेले आठवले. भैरप्पा म्हणायचे, ‘‘पाच पती असताना द्रौपदीला कसे वाटले असेल किंवा तिला कोणता पती जास्त आवडला असेल हे कोणीही विचारत नाही, याचा विचार मी ‘पर्व’मध्ये केला आहे. यात मी गांधारी डोळ्याभोवती पट्टी का बांधते याबद्दलची प्रेरणाही बदलण्याचा प्रयत्न केला आहे.’’ धर्म, परंपरा, एकत्र कुटुंब पद्धती हे सगळे लेखकाच्या आस्थेचे विषय आहेत. याचे संदर्भ त्यांच्या लेखनात सतत उमटत असतात. ‘पर्व’चं सर्वांत मोठं वैशिष्ट्य म्हणजे लेखकानं कादंबरीतील तमाम व्यक्तिरेखांची वयं निश्चित केली आणि त्या त्या वयाप्रमाणे त्यांचं वर्तन असेल याची काळजी घेतली आहे.

एखाद्या लेखकाचं वाचलेलं सगळंच काही सदासर्वकाळ लक्षात राहतं असं नसतं; पण काही प्रसंग मात्र खोलवर परिणाम करून जातात. अचानक कुठल्यातरी वेगळ्याच पातळीवर ते आठवत राहतात, आणि आपण समृद्ध होत जातो. महाभारतातील पांडवांनी मोक्षप्राप्ती मिळवण्यासाठी वैतरणा नदी पार करून स्वर्गारोहण केले असे संदर्भ वाचलेले ‘पर्व’मुळे अधिकच लक्षात असतात. मी रेल्वेगाडी चालवताना एक दिवसाआड रोजच वैतरणा ओलांडून जायचो तेव्हा मनात हे संदर्भ जागे व्हायचे. महाभारत, पर्व यांची सरमिसळ अनुभवत आपणही मोक्षाच्या दिशेने एखादं पाऊल ओलांडल्याचं समाधान वाटत राहायचं. भैरप्पा वाचताना जपानी लेखक मुराकामीचीही





आठवण आल्याशिवाय राहत नाही. गूढ वातावरण, प्रत्येक घटनेचं तात्पर्य न सांगता ते तुमच्यावर सोडणं ही वैशिष्ट्ये भैरप्पांच्या लेखनातही जाणवतात.

हिंदीतील प्रख्यात लेखक निर्मल वर्मांनी लिहिलेली ‘सूखा’ नावाची कथा, कलावंतांचे आतून सुकत जाणं, शुष्क होणं यावर आधारित आहे. हेमिंग्वेसारख्या नोबल विजेत्यालाही हा कोरडेपणा टाळता न आलेला, त्यामुळे आत्महत्या ही त्यांची अपरिहार्य शोकांतिका. त्यामानाने भैरप्पांचा हात शेवटपर्यंत लिहिता राहिला. आपल्या भारतीय परंपरेत रविशंकर वयाच्या ९२ व्या वर्षी वारले आणि शेवटपर्यंत कार्यक्रम करत होते. पिकासोसारखा जागतिक प्रतिभेचा चित्रकार वयाच्या ९२ व्या वर्षी वारला, तोही शेवटपर्यंत पेंटिंग करतच होता. ९६ व्या वर्षी मृत्यूला सामोरे गेलेले खुशवंतसिंह यांचं सदर अगदी शेवटपर्यंत सुरू होतं. जोहरा सहगलसारख्या विदुषी वयाच्या १०० व्या वर्षीदेखील कार्यरत होत्या. त्या पार्श्वभूमीवर भैरप्पांना अजूनही काही वर्षं मिळायला हरकत नव्हती. तसाही वयाच्या ९४ व्या वर्षी आलेला मृत्यू समाधानकारक मानायला हरकत

नाही. अर्थात आपलं माणूस आपल्याला कायमचं सोडून गेलंय याचा त्रास होतोच. मध्यंतरी वयाची नव्वदी पार केल्यावर एका मुलाखतीत ते म्हणाले होते की, ''माझं लेखन सध्या थंडावलंय कारण माझं फिरणं वयोमानानुसार कमी झालंय.'' भैरप्पांना फिरायला खूप आवडायचं. भैरप्पा सर्वत्र सातत्याने भटकंती करत असायचे, त्यामुळे त्यांच्या कादंबरीतील पात्रंही कुठल्या तरी एकाच प्रांतात अडकून पडत नाहीत. भैरप्पांच्या चाहत्यांनी लिहिलेल्या लेखांच्या कन्नडमधील पुस्तकावर हिमालयाचे चित्र बघून मी त्या वेळी आश्चर्यचकित झालो होतो. यात माझाही लेख कन्नडमधे अनुवादित होऊन समाविष्ट करण्यात आला आहे. मुखपृष्ठावरच्या हिमालयाचा संदर्भ नंतर लक्षात आला, की भैरप्पांना कन्नड वाचक/साहित्यिक हिमालयाच्या तोडीचा प्रतिभावान लेखक मानतात. त्यांना प्रेमाने 'दैत्य प्रतिभेचा लेखक' असेही म्हणतात. त्यांच्या अनेक कादंबऱ्या वाचताना याची प्रचीतीही येत जाते. भैरप्पांचा भारतीय तत्त्वज्ञान आणि इतिहासाचा अभ्यास त्यांच्या लेखनातून जाणवतोच; पण त्यांचं या सगळ्या तळाशी असलेलं माणूसपण अधिक लोभस आहे. त्यांच्या बहुतेक मराठी कादंबऱ्या उमाताईंनीच अनुवाद केलेल्या आहेत. एकदा 'गृहभंग'चा अनुवाद उमाताई करत असताना उमाताईंना भैराप्पांचा फोन आला, की मी पाठवलेल्या पुस्तकाचा अगोदर अनुवाद कर. ताई म्हणाल्या की तुमच्याच 'गृहभंग'चाच अनुवाद सुरू आहे, भैरप्पा म्हणाले 'ते बाजूला ठेवा आणि मी सांगतोय त्या पुस्तकाचा अनुवाद अगोदर करा.' स्वतःच्या पुस्तकाची पर्वा न करता इतरांच्या पुस्तकाचा अनुवाद कर म्हणून सांगणारा हा लेखक वेगळ्याच मुशीत घडलेला होता. ते पुस्तक म्हणजे सहना विजय कुमार या कन्नड लेखिकेचे 'कशिर' हे पुस्तक. या पुस्तकाला भैरप्पांची व्यासंगी प्रस्तावना आहे. स्वतंत्र प्रज्ञेच्या या लेखिकेला कर्नाटकात भैरप्पांची शिष्या म्हणून ओळखले जाते, जे खरंच खूप कठीण आहे. आयटी कंपनीत छानपैकी नोकरी करत स्थिर झालेली असताना एके दिवशी त्या भैरप्पांकडे गेल्या आणि म्हणाल्या, ''मला लेखक म्हणून जगायचं आहे, तुमची शिष्या म्हणून माझा स्वीकार व्हावा.'' भैरप्पा म्हणाले, ''थांब, अगोदर पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, भारतीय तत्त्वज्ञान, जागतिक लेखक आणि आपल्या भाषेतील उत्तुंग प्रतिभेच्या लेखकांना वाचून, समजून घे. त्यांनतरच तुला माझी शिष्या म्हणवून घ्यायला हरकत नाही.'' असा सगळा आभ्यास करून लिहिलेल्या कशिर या त्यांच्या कादंबरीने नंतर इतिहासच घडवला. २५ एक आवृत्त्या कर्नाटकात झाल्याच; पण मराठीतही तब्बल सहावी वगैरे आवृत्ती सुरू असावी. कशिरच्या मराठीतल्या अनुवादाच्या लेखिका उमाताई म्हणतात, की ''या पुस्तकाच्या शेवटी संदर्भ म्हणून तब्बल दीडशे पुस्तकांचा उल्लेख प्रकाशकांनी पानं वाढतात म्हणून टाळला आहे.'' इतका अभ्यास करून लेखन सिद्ध करण्याची प्रेरणा भैरप्पांनीच तर लेखिकेला दिली होती. कर्नाटकातील कुवेम्पू आणि शिवराम कारंथ सारख्या महान व्यक्तींनंतर भैरप्पा साहित्यिक अवकाशात उदयास आले. त्यांच्या समकालीनांमध्ये यू. आर. अनंतमूर्ती, पूर्णचंद्र तेजस्वी आणि पी. लंकेश यांचा समावेश होतो, जे सर्व जण त्यांच्या कामाकडे अवाक् होऊनच पाहत होते. २००७ मध्ये जेव्हा त्यांचे सर्वांत वादग्रस्त पुस्तक 'आवरण' प्रकाशित झाले तेव्हा अनंतमूर्तींना ते धोकादायक वाटले होते आणि तेव्हा ते असेही म्हणाले होते की, ''भैरप्पा त्यांच्या हिंदू-मुस्लिम वादविवादात खूप उजवीकडे वळले आहेत.'' या काळात अनंतमूर्तींनी त्या वादात उगाचच भर घातली. त्यांनी एका मुलाखतीत असं विधान केलं की, ''भैरप्पा हे कादंबरीकारच नव्हेत, ते डिबेटर आहेत.'' असं त्यांनी म्हटल्यावर भैरप्पांचा वाचक वर्ग खवळला आणि ज्या वर्तमानपत्रात अनंतमूर्तींचे ते विधान आलं होतं त्या संपादकांना हजारोंनी वाचकांची पत्रं गेली आणि त्याच्यामधे अनेक पत्रं अशी होती की, 'अडीच कादंबरी' (तोपर्यंत अनंतमूर्तींच्या दोन-तीनच कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या होत्या) लिहिलेल्यांनी

भैरप्पांना कादंबरी कशी लिहायची हे शिकवू नये. म्हणजे भैरप्पांच्या मागे सरकार आहे की नाही माहीत नाही; पण हा जो वाचकवर्ग आहे ना तो त्यांच्यामागे समर्थपणे नेहमीच उभा राहिलेला आहे. भैरप्पांवर त्या वेळी एका विशिष्ट विचारांच्या वळचणीला गेलेला लेखक म्हणूनही आरोप झाले होते. अरविंद अडिगा यांनी लिहिले होते की, ''आवरण' ही त्यांची सर्वांत कमकुवत कादंबरी होती आणि त्यामुळे ज्ञानपीठ पुरस्कारासाठी त्यांना वगळले जाईल.'' हिंदी (११) भाषेनंतर सर्वांत अधिक ज्ञानपीठ पुरस्कार कन्नड (८) भाषेतील असूनही, भैरप्पांची योग्यता असूनही त्यांना या पुरस्कारापासून वंचित ठेवले गेले ही खंत माझ्या सारख्या अनेक वाचकांच्या मनात नेहमीच सलत राहील. भैरप्पा यांना ज्ञानपीठ देऊ नये, मिळू नये यासाठी ऊर फाटेस्तोवर प्रयत्न करणारेही त्या काळात होते. पूर्वग्रह वगळता दुसऱ्या कोणत्याही कोनातून अशा गोष्टींचे समर्थन करणे शक्य नाही. भैरप्पा यांचे साहित्य न वाचताच केलेल्या या कोरड्या गोष्टी आहेत. मागे एकदा भैरप्पा यांना मरणोत्तर ज्ञानपीठ द्या, अशीही मागणी करण्यात आली होती. अशी असभ्य संस्कृतीहीन वक्तव्ये करणारी मंडळीही आहेत. अशा प्रकारची भाषा करणाऱ्यांत बहुतांश कन्नड भाषिकच होते, हे अधिक खेदजनक आहे. त्यांच्या 'आवरण' या कादंबरीच्या कर्नाटकात आजतागायत ६७ आवृत्त्या संपल्या आहेत. या कादंबरीत मुस्लिम राजवटीतील भारतीय संस्कृती आणि त्याचा सामाजिक प्रगतीवर झालेला परिणाम दाखवणारं, ऐतिहासिक सत्यावर आधारित लेखन आहे. भैरप्पा हे भ्रम निर्माण न करता वास्तवतेच्या आधारावर संशोधन करून लिहिणाऱ्या संशोधकांच्या रांगेतील साहित्यिक होते. वेद आणि उपनिषद हे देशाच्या संपूर्ण संस्कृतीचे मूळ आहेत असे सांगणारे साहित्यिक भैरप्पा पुराणातील दंतकथांचे भंजन करून, वास्तव जीवनाचा शोध घेऊनच 'पर्व', 'उत्तरकांड'सारख्या सर्जनात्मक कृतींची निर्मिती करतात. 'आवरण'मुळे कर्नाटकात एका विशिष्ट पक्षाचे सरकार सत्तेत येण्यासाठी मदत झाली असेही म्हटले जात होते. ज्या वेळी हे आरोप होत होते त्याही वेळी भैरप्पा स्वतःहून कुणाला उत्तर वगैरे देत बसले नाहीत. त्यांना समजून घेणाऱ्या वाचक आणि साहित्यिकांच्या मते भैरप्पांनी हा विषय लिहून आत्तापर्यंत न बोलणाऱ्यांना नकळत एक आवाज प्रदान केला. भैरप्पांसारखा लेखक असा कुठलाही आव आणून लिहीत नाही. ज्या वेळी भारतीय समाजमन अयोध्या प्रकरणाने संपूर्ण ढवळून निघालेलं होतं त्या काळात वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांची 'उत्तरकांड' प्रकाशित झाली होती. ते म्हणतात ''उत्तरकांड'मध्ये, मी सीतेच्या दृष्टिकोनातून रामायणाचाच पुन्हा अनुवाद केलेला आहे.'' ही कादंबरी सीतेला रामाच्या विरोधात उभं करते. खरं तर या वयात कुठलाही लेखक आपल्या पूर्वसंचितावर निवांत जगू शकला असता; पण भैरप्पा त्याही वयात वेगळं आव्हान स्वीकारतात. सीता आणि रामाची कठोर चिकित्सा करताना दिसतात. त्यामुळे कुठलीतरी एखादी कादंबरी वाचून लेखकाबद्दल मत बनवणं चुकीचं आहे. खरं तर भैरप्पा यांना कधीही पक्षीय राजकारणात वैयक्तिक रस नव्हता; परंतु उजव्या विचारसरणीने त्यांना खरोखरच स्वीकारले होते. धर्म आणि इतिहासावरील त्यांची तात्त्विक भूमिका त्यांच्या स्वतःच्या आवडत्या सिद्धान्तांशी जुळत असल्याचे त्यातल्या धुरिणांना जाणवले होते. २०२३ ला पद्मभूषण पुरस्काराने त्यांना जेव्हा गौरवलं गेलं तेव्हा भैरप्पाही जाहीरपणे म्हणाले होते, की ''या विचारांचे सरकार असल्यानेच माझा सन्मान होऊ शकला.'' भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे, तर कन्नड साहित्यिक आणि समीक्षेतील दिग्गजांनी आदराने मौनच बाळगले आहे. पद्मभूषणसह अनेक सन्मान प्राप्त करणारे भैरप्पा निःसंशयपणे एक उत्तम लेखक होते. त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येणार नव्हते. भैरप्पा नेहमी म्हणायचे, ''मी जेव्हा जेव्हा लिहिले आहे, तेव्हा ते माझ्या मनाची तहान भागवण्यासाठी लिहिले आहे, कोणालाही खूश करण्यासाठी किंवा मार्ग










सुचवण्यासाठी नाही.'' मायकोव्हस्की हा रशियन कवी म्हणतो की 'स्लॅप युअर एल्डर्स' याची प्रचीती भैरप्पांच्या लेखनात सर्वांगाने येताना दिसते. भैरप्पांवर लिहिताना, बोलताना एक वेगळाच आनंद मनात पाझरत असतो. भैरप्पांना महाराष्ट्रातील वाचक मराठी लेखक म्हणूनच ओळखतात. हे श्रेय अर्थातच प्रसिद्ध लेखक, अनुवादक उमाताई कुलकर्णींचं. भैरप्पा महाराष्ट्रात त्यातही पुण्या-मुंबईत नेहमीच ये-जा करायचे. इथल्या साहित्यिक घडामोडींची त्यांना इत्थंभूत माहिती असायची. अनेक लोक त्यांच्याकडे जायचे, पुस्तक अनुवाद करायला द्या म्हणून पण भैरप्पा स्वतःहून 'उमा करतेय तर तिला करू द्या' म्हणायचे. भैरप्पा आणि उमाताईंच्या आत्मीय नात्यातले पदर मी अगदी जवळून अनुभवले आहेत. 'मंद्र' कादंबरी लिहिताना त्यांनी गाण्याची शिकवणी लावली होती हे तर सर्वज्ञात आहेच; पण त्या काळात त्यांनी सवाई गंधर्व महोत्सवात हजेरी लावण्याची एकही संधी सोडली नव्हती. 'मंद्र'ने भैरप्पांची शब्दांवरची हुकुमत, संगीताचा व्यासंग नव्यानं प्रत्ययास आला होता. ते म्हणायचे, की ''फक्त संगीतच मला आतली ओढ लावते आणि आत्मपरीक्षण करायला लावते. इतर कोणत्याही गोष्टीत इतकी जादुई, गूढ, चुंबकीय शक्ती नाही. त्यांच्या आत्मचरित्रात त्यांच्या जवळच्या नातेवाइकांचे संदर्भ वाचायला मिळतातच. एकदा उमाताई सहज गप्पा मारताना त्यांना म्हणाल्या, की ''तुमच्या नातवाचा या वयातला आत्मविश्वास बघून दंग व्हायला होतं.'' त्या वेळी भैरप्पा मिश्किलपणे म्हणाले होते, की 'त्याला कुठे भीक मागून शाळा शिकावी लागली?' भैरप्पांनी शिक्षणासाठी अपार खस्ता खाल्ल्या मात्र त्यातून निर्माण झालेला हा कडवटपणा त्यांच्या लेखनात कधी उमटलेला दिसत नाही. त्यांच्या कादंबऱ्या वाचताना निखळ आनंद मिळतो आणि मन प्रसन्न होऊन जातं. त्यांच्या लेखनात निश्चितच प्रामाणिकता होती. त्यांनी एकदा एका मुलाखतीत सांगितलं होतं की, लेखकाने फक्त सत्याशी निष्ठा ठेवली पाहिजे, विचारसरणीशी नाही, लोकप्रियतेशी नाही. त्या श्रद्धेने त्यांना त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत मार्गदर्शन केले. ज्या काळात अनेक लेखक राजकीय वाऱ्यांशी झुकत होते, त्या काळात भैरप्पा एका उंच वटवृक्षासारखे उभे राहिले, कदाचित अशा किरकोळ वादळांनी त्यांना धक्का बसलाही असेल; पण ते कधीही हलले नाहीत. ते म्हणायचे, ''दक्षिण कर्नाटकातील एखाद्या छोट्याशा गावाचे




वर्णन करतानाही इतका रंगून जायचो, की मला वाटायचं माझ्या हातात देशाचीच नस आली आहे.'' अशा जागतिक पातळीवर पोहोचलेल्या भैरप्पांना ठाण्याच्या एका कार्यक्रमात भेटण्याचा योग उमाताईंमुळेच मिळाला होता. ते इतके नम्र आणि सोज्ज्वळ होते, की आपल्या साध्या वागण्यानेही त्यांना आपण डिस्टर्ब तर केलं नाही ना असंच त्या वेळी मला जाणवलेलं होतं. भैरप्पा अपार मृदुभाषी होते, जवळजवळ लाजाळूच. जेव्हा ते बोलत असत तेव्हा ते शब्दांना सोन्याच्या नाण्यांसारखे तोलत असत. जेव्हा ते ऐकत असत तेव्हा ते तुमच्याकडे पूर्ण लक्ष देऊन ऐकत. खरं तर एवढ्या मोठ्या कर्तृत्ववान माणसाला भेटायला मिळणं, हा माझ्या आयुष्यातील राजयोगच असावा!

मार्गारेट बुर्के नावाची रशियन छायाचित्रकार होती. त्यांनी रशिया- जर्मनी युद्धाचं वर्णन साक्षात युद्धभूमीवर जाऊन केलं होतं. आपण जो गांधीजींचा चरखा चालवतानाचा ऐतिहासिक फोटो बघतो तो याच मार्गारेट बाईंनी काढलेला आहे, त्यांना या फोटोबद्दल विचारले तेव्हा त्या म्हणाल्या की, ''चरखा चालवणं शिकल्यामुळेच मला गांधीजींचा फोटो नेमका कसा असावा याचा अगदी योग्य अंदाज आला.'' याच बुर्के बाईं गोलमेज परिषदेच्या वेळी सतत गांधीजीं बरोबर असायच्या तेव्हा एका पत्रकाराने त्यांना विचारले, की गांधीजींबरोबर वावरताना तुम्हाला कसे वाटते तर त्या म्हणतात, ''मला येशूच्या सान्निध्यात असल्याचा भास होतो.'' याचप्रमाणे भैरप्पांच्या भोवताली भिरभिरताना परमेश्वराचे सान्निध्य असेल, तर ते असेच असेल अशीच काहीशी भावना मनात दाट होत गेली.

अशा माणसाला गमावताना मौन होणं अपरिहार्य होतं. एखादा अमूल्य ठेवा गमावल्याचं हे दुःख होतं. मृत्यू ही काही पुन्हा पुन्हा घडणारी कला नाही म्हणून भैरप्पांसारख्या उत्तुंग प्रतिभेच्या व्यक्तींनी तरी जगायलाच हवे, असे वाटायला लावणारा हा काळ आहे. हिंदीतील प्रसिद्ध लेखक ज्ञानरंजन म्हणून गेले होते, 'अंत श्मशान में नहीं, इतिहास में दर्ज होगा।' हे भैरप्पांना तंतोतंत लागू पडते.

■■

**गणेश मनोहर कुलकर्णी**
डोंबिवली,
संपर्क : ९८१९९५७८५२

# ९९व्या साहित्य संमेलनाची पालखी साताऱ्यात

सातारा म्हणजे सात तारकांच्या कृपादृष्टीने नटलेली नगरी. आपली ऐतिहासिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये जपणाऱ्या या शहरात साहित्य संमेलनाचे आयोजन केले जात आहे. त्यानिमित्ताने सातारा आणि संमेलन असा एक दृष्टिक्षेप...

**महादेव गायकवाड**

यंदाचे मानांकन अर्थात शंभराला एक कमी म्हणजे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्याचा सन्मान साताऱ्याला लाभला आहे. मराठा साम्राज्याची ऐतिहासिक राजधानी म्हणून लौकिकास पोहोचलेले सातारा शहर आजही सांस्कृतिक आणि साहित्यिक परंपरेचे तेज जपून आहे. ध्येयधुरंधर अजिंक्यताऱ्याच्या मार्गदर्शनाखाली आणि अस्मानातील ऋषींच्या सात तारकांच्या कृपादृष्टीने नटलेली ही नगरी, ६६ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विद्वान विद्याधर गोखले यांनीही गौरवाने उल्लेखलेली आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या पुण्यातील बैठकीत सर्वसंमतीने हा निर्णय घेण्यात आला. सातारा, इचलकरंजी व कोल्हापूर या तीन शहरांनी यजमानपदासाठी अर्ज केला होता. प्रत्यक्ष पाहणी व सोयीसुविधांचा अभ्यास करून अखेर साताऱ्याची निवड झाली. महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी हा निर्णय अधिकृतरीत्या जाहीर केला. साताऱ्यातील हे चौथे संमेलन असून यापूर्वी १९०५, १९६२ आणि १९९३ मध्ये येथे संमेलने पार पडली आहेत.

### इतिहासातील ठळक क्षण

१९०५ मध्ये झालेल्या ३३व्या संमेलनाचे अध्यक्षस्थान लोकमान्य टिळकांचे सहकारी वकील र.पा. ऊर्फ दादासाहेब करंदीकर यांनी भूषविले.

१९६२ मध्ये ४४ व्या संमेलनाचे अध्यक्ष नरहर विष्णू गाडगीळ होते.

१९९३ मध्ये ६६ व्या संमेलनाचे अध्यक्ष विद्याधर गोखले होते.

सन २०२५ मधील हे चौथे संमेलन साताऱ्याच्या सांस्कृतिक वैभवात आणखी एक मैलाचा दगड ठरेल.

### आयोजन व वैशिष्ट्ये

या संमेलनाचे आयोजन महाराष्ट्र साहित्य परिषद व मावळा फौंडेशन, शाहुपुरी शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शाहू महाराज जिल्हा क्रीडा संकुलात होणार आहे. सातारा जिल्ह्याचे ऐतिहासिक महत्त्व विशेष अधोरेखित करावे लागेल. येथे कृष्णा व कोयना नद्यांचा संगम असून त्याच ठिकाणी कै. यशवंतराव चव्हाण यांची समाधी आहे. तसेच पाचगणी येथील

मिलिटरी स्कूलपासून मराठा रेजिमेंटपर्यंत सैन्य क्षेत्रात जिल्ह्याचे मोठे योगदान आहे.

साताऱ्याचे निसर्गसौंदर्यही वैशिष्ट्यपूर्ण आहे. कास पठारावरील पुष्पगंध, आंबा-पेरू यांसारख्या फळांची समृद्धी, तसेच ऐतिहासिक किल्ले जिल्ह्याची ओळख अधिक खुलवतात. समर्थ रामदासांचे 'मनाचे श्लोक', ज्योतिबा फुले यांचे सामाजिक कार्य, तसेच रामशास्त्री प्रभुणे यांची न्यायपरंपरा या सर्वांमुळे साताऱ्याला सांस्कृतिक दृष्टीने मानाचे स्थान आहे.

### राजघराण्याचा सहभाग

३३ वर्षांपूर्वी झालेल्या साहित्य संमेलनात छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज अभयसिंह भोसले स्वागताध्यक्ष होते. या वेळी त्यांचे पुत्र, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले हे स्वागताध्यक्षपद भूषविणार आहेत. पिता-पुत्रांच्या या योगायोगामुळे संमेलनाला ऐतिहासिक परंपरेची जोड लाभणार आहे.

### साहित्यिक मेजवानी

साहित्य संमेलन म्हणजे केवळ सत्रे आणि भाषणेच नव्हे, तर विचारांची देवाणघेवाण, नवोदितांना संधी आणि मायमराठीच्या समृद्ध परंपरेचे दर्शन असते. साताऱ्यातील संमेलनाला 'कंदी पेढ्यांची मेजवानी' अशी आगळी-वेगळी जोड लाभणार आहे.

### साहित्य संमेलनाचे ऐतिहासिक योगदान

साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून अनेक ऐतिहासिक ठराव झाले. १९३८ च्या मुंबई संमेलनात संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा पहिला ठराव मंजूर झाला. १९४६ च्या बेळगाव संमेलनापासून या चळवळीला अधिकृत दिशा मिळाली. प्रत्येक संमेलनातून मराठी भाषा, मराठी माणूस, विकास व स्वाभिमान यांसारखे विषय ठळकपणे मांडले गेले.

मराठी भाषेतील असंख्य बोलीभाषांचे (कोकणी, मालवणी, वऱ्हाडी, कऱ्हाडी, सोलापुरी, आदिवासी आदी) सौंदर्य जपण्यासाठी हे व्यासपीठ महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विचारमंथन, चर्चासत्रे आणि वैचारिक देवाणघेवाणीमुळे नव्या पिढीला प्रेरणा मिळत आली आहे.

### शासनाचे योगदान

मराठी संस्कृतीच्या संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाने केलेले प्रयत्न लक्षणीय आहेत. तुकाराम महाराजांची गाथा, ज्ञानेश्वरी यांसारखे संतसाहित्य अल्पदरात उपलब्ध करून देणे, मराठी-उर्दू कोश व विश्वकोश निर्मिती, तसेच अण्णासाहेब किर्लोस्कर, गडकरी, बालगंधर्व यांच्या स्मृतिदिनांचे आयोजन ही त्यातील काही ठळक उदाहरणे आहेत.

### निष्कर्ष

साताऱ्यात भरत असलेले ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे ऐतिहासिक वारसा, सांस्कृतिक परंपरा, साहित्यिक समृद्धी आणि राजघराण्याचा सहभाग, अशा सर्व वैशिष्ट्यांचा सुंदर संगम ठरणार आहे. विचारांचे आदानप्रदान, नव्या पिढीचे सहभाग, आणि मायमराठीच्या समृद्ध भवितव्यासाठी ही संमेलन-पालखी साताऱ्यातून पुढे निघणार आहे.

**महादेव गायकवाड**
कार्यवाह, मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

# साहित्य संमेलने - अध्यक्ष आणि वर्ष सूची

| क्र. | वर्ष | स्थळ | अध्यक्ष |
|---|---|---|---|
| १ | १८७८ | पुणे | न्या. महादेव गोविंद रानडे |
| २ | १८८५ | पुणे | कृष्णशास्त्री राजवाडे |
| ३ | १९०५ | सातारा | रघुनाथ पांडुरंग करंदीकर |
| ४ | १९०६ | पुणे | वासुदेव गोविंद कानिटकर |
| ५ | १९०७ | पुणे | विष्णू मोरेश्वर महाजनी |
| ६ | १९०८ | पुणे | चिंतामण विनायक वैद्य |
| ७ | १९०९ | बडोदे | कान्होबा रामछोडदास कीर्तिकर |
| ८ | १९१२ | अकोला | हरी नारायण आपटे |
| ९ | १९१५ | मुंबई | गंगाधर पटवर्धन |
| १० | १९१७ | इंदूर | गणेश जनार्दन आगाशे |
| ११ | १९२१ | बडोदे | नरसिंह चिंतामण केळकर |
| १२ | १९२६ | मुंबई | माधव विनायक किबे |
| १३ | १९२७ | पुणे | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर |
| १४ | १९२८ | ग्वाल्हेर | माधव श्रीहरी अणे |
| १५ | १९२९ | बेळगांव | शिवराम महादेव परांजपे |
| १६ | १९३० | मडगांव | वामन मल्हार जोशी |
| १७ | १९३१ | हैदराबाद | श्रीधर व्यंकटेश केतकर |
| १८ | १९३२ | कोल्हापूर | महाराजा सयाजीराव गायकवाड |
| १९ | १९३३ | नागपूर | कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर |
| २० | १९३४ | बडोदे | नारायण गोविंद चापेकर |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | १९३५ | इंदूर | भवानराव श्रीनिवासराव पंतप्रतिनिधी |
| २२ | १९३६ | जळगाव | माधव जुलियन/माधव त्रिंबक पटवर्धन |
| २३ | १९३८ | मुंबई | विनायक दामोदर सावरकर |
| २४ | १९३९ | अहमदनगर | दत्तो वामन पोतदार |
| २५ | १९४० | रत्नागिरी | नारायण सीताराम फडके |
| २६ | १९४१ | सोलापूर | विष्णू सखाराम खांडेकर |
| २७ | १९४२ | नाशिक | प्रल्हाद केशव अत्रे |
| २८ | १९४३ | सांगली | श्रीपाद महादेव माटे |
| २९ | १९४४ | धुळे | भार्गवराम विठ्ठल वरेरकर |
| ३० | १९४६ | बेळगांव | गजानन त्र्यंबक माडखोलकर |
| ३१ | १९४७ | हैदराबाद | नरहर रघुनाथ फाटक |
| ३२ | १९४९ | पुणे | शंकर दत्तात्रय जावडेकर |
| ३३ | १९५० | मुंबई | यशवंत दिनकर पेंढारकर/कवी यशवंत |
| ३४ | १९५१ | कारवार | अनंत काकबा प्रियोळकर |
| ३५ | १९५२ | अमळनेर | कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी |
| ३६ | १९५३ | अहमदाबाद | वि. द. घाटे |
| ३७ | १९५४ | दिल्ली | लक्ष्मणशास्त्री बाळाजी जोशी |
| ३८ | १९५५ | पंढरपूर | शंकर दामोदर पेंडसे |
| ३९ | १९५७ | औरंगाबाद | अनंत काणेकर |
| ४० | १९५८ | मालवण | अनिल/आत्माराम रावजी देशपांडे |
| ४१ | १९५९ | मिरज | श्रीकृष्ण केशव क्षीरसागर |
| ४२ | १९६० | ठाणे | रामचंद्र श्रीपाद जोग |
| ४३ | १९६१ | ग्वाल्हेर | कुसुमावती देशपांडे |
| ४४ | १९६२ | सातारा | नरहर विष्णू गाडगीळ |
| ४५ | १९६४ | मडगाव | वि. वा. शिरवाडकर/ कुसुमाग्रज |
| ४६ | १९६५ | सातारा | वामन लक्ष्मण कुलकर्णी |
| ४७ | १९६७ | भोपाळ | विष्णू भिकाजी कोलते |
| ४८ | १९६९ | वर्धा | पु. शि. रेगे |
| ४९ | १९७३ | यवतमाळ | गजानन दिगंबर माडगूळकर |
| ५० | १९७४ | इचलकरंजी | पु. ल. देशपांडे |

| | | | |
|---|---|---|---|
| ५१ | १९७५ | कऱ्हाड | दुर्गा भागवत |
| ५२ | १९७७ | पुणे | पु. भा. भावे |
| ५३ | १९७९ | चंद्रपूर | वामन कृष्ण चोरघडे |
| ५४ | १९८० | बार्शी | गं. बा. सरदार |
| ५५ | १९८१ | अकोला | गो. नी. दांडेकर |
| ५६ | १९८१ | रायपूर | गंगाधर गाडगीळ |
| ५७ | १९८३ | अंबेजोगाई | व्यंकटेश दिगंबर माडगूळकर |
| ५८ | १९८४ | जळगांव | शंकर रामचंद्र खरात |
| ५९ | १९८५ | नांदेड | शंकर बाबाजी पाटील |
| ६० | १९८८ | मुंबई | विश्राम बेडेकर |
| ६१ | १९८८ | ठाणे | वसंत कानेटकर |
| ६२ | १९८९ | अमरावती | केशव जगन्नाथ पुरोहित |
| ६३ | १९९० | पुणे | यू. म. पठाण |
| ६४ | १९९० | रत्नागिरी | मधू मंगेश कर्णिक |
| ६५ | १९९२ | कोल्हापूर | रमेश मंत्री |
| ६६ | १९९३ | सातारा | विद्याधर गोखले |
| ६७ | १९९४ | पणजी | राम शेवाळकर |
| ६८ | १९९५ | परभणी | नारायण सुर्वे |
| ६९ | १९९६ | आळंदी | शांता शेळके |
| ७० | १९९७ | अहमदनगर | ना. सं. इनामदार |
| ७१ | १९९८ | परळी–वैजनाथ | द. मा. मिरासदार |
| ७२ | १९९९ | मुंबई | वसंत बापट |
| ७३ | २००० | बेळगांव | य. दि. फडके |
| ७४ | २००१ | इंदूर | विजया राजाध्यक्ष |
| ७५ | २००२ | पुणे | राजेंद्र बनहट्टी |
| ७६ | २००३ | कऱ्हाड | सुभाष भेण्डे |
| ७७ | २००४ | औरंगाबाद | रा. ग. जाधव |
| ७८ | २००५ | नाशिक | केशव मेश्राम |
| ७९ | २००६ | सोलापूर | मारुती चितमपल्ली |
| ८० | २००७ | नागपूर | अरुण साधू |

| | | | |
|---|---|---|---|
| ८१ | २००८ | सांगली | म. द. हातकणंगलेकर |
| ८२ | २००९ | महाबळेश्वर | आनंद यादव |
| ८३ | २०१० | पुणे | द. भि. कुलकर्णी |
| ८४ | २०१० | ठाणे | उत्तम कांबळे |
| ८५ | २०१२ | चंद्रपूर | वसंत आबाजी डहाके |
| ८६ | २०१३ | चिपळूण | डॉ. नागनाथ कोत्तापल्ले |
| ८७ | २०१४ | सासवड | फ. मुं. शिंदे |
| ८८ | २०१५ | घुमान (पंजाब) | सदानंद मोरे |
| ८९ | २०१६ | पिंपरी–चिंचवड | श्रीपाल सबनीस |
| ९० | २०१७ | डोंबिवली | अक्षयकुमार काळे |
| ९१ | २०१८ | बडोदे | लक्ष्मीकांत देशमुख |
| ९२ | २०१९ | यवतमाळ | डॉ. अरुणा ढेरे |
| ९३ | १०, ११, १२ जानेवारी २०२० | उस्मानाबाद | फादर फ्रान्सिस दिब्रिटो |
| ९४ | २६, २७, २८ मार्च २०२१ | नाशिक | जयंत नारळीकर |
| ९५ | २२, २३, २४ एप्रिल २०२२ | उदगीर | भारत सासणे |
| ९६ | फेब्रुवारी २०२३ | वर्धा | नरेंद्र चपळगावकर |
| ९७ | २–५ फेब्रुवारी २०२४ | अमळनेर | श्री. रविंद्र शोभणे |
| ९८ | २१–२३ फेब्रुवारी २०२५ | दिल्ली | श्रीमती तारा भवाळकर |
| ९९ | २०२५ | सातारा | विश्वास पाटील |


# ग्रामीण साहित्य प्रवाह : काही निरीक्षणे

**प्रा. डॉ. राजाभाऊ विनायक भैलुमे**

महाराष्ट्राची एक चांगली ओळख आहे ती म्हणजे मराठी माणूस सांस्कृतिक दृष्ट्या चांगला व्यक्त होतो. संत, पंत, तंत साहित्य असेल, ग्रंथीय साहित्य असेल, लोकसाहित्य असेल, तो वेगवेगळ्या वाङ्मयीन प्रकारातून सातत्याने व्यक्त होत आला आहे. आताही दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, महानगरीय अशा असंख्य साहित्य प्रवाहांतून तो व्यक्त होत आला आहे. तो आपली मते, विशेषतः द्वेष, राग, प्रेम, आपल्या इतर भावना साहित्यातून व्यक्त करतोय म्हणून, तर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाबरोबरच इतरही लहान-मोठी मराठी साहित्य संमेलने महाराष्ट्रात, देशात विविध ठिकाणी व आता परदेशातसुद्धा भरत आहेत. यांची संख्या १०० पेक्षा जास्त आहे. अशा प्रकारे सांस्कृतिकदृष्ट्या अभिव्यक्त होणे तेही बहुसंख्य प्रमाणात, समूहाच्या पातळीवर अभिव्यक्त होणे ही गोष्ट मानवी विकासाच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे. यातील अनेक साहित्यिकांनी कधी उघडपणे, तर कधी सूचकपणे इथल्या धर्मव्यवस्थेला, समाज व्यवस्थेला, अर्थव्यवस्थेला, राजव्यवस्थेला प्रश्न विचारले आहेत. त्यांना नाकारण्याची भूमिका घेतलेली आहे. त्यांच्याविरुद्ध विद्रोह केलेला आहे. समकालीन समाजाच्या विकृत, अमानवीय वेगवेगळ्या अवस्थांच्या विरुद्ध लेखणीच्या मार्फत उठाव करणे म्हणजेच एखादी समृद्ध वैचारिक व मानवतेला अनुलक्षून किंवा मानवता केंद्री समाज निर्मितीसाठी हे उचललेले पाऊल आहे, असेच म्हणता येते. या सर्वांतून एक प्रकारची वैचारिक घुसळून, सांस्कृतिक दृष्ट्या संवाद, परस्पर विरोधी असणाऱ्या गटांमध्ये मराठी साहित्याच्या माध्यमातून झाला व होत आहे. भक्ती, मनोरंजन, पौराणिक, ऐतिहासिक साहित्याबरोबरच समाज बदलाचे साधन म्हणूनसुद्धा साहित्याकडे पाहिल्यामुळे किंबहुना त्याचा तसा प्रभावी वापर केल्यामुळे, तसा परिणामही साधला गेल्यामुळे साहित्याचा समाज बदलासाठी मराठी साहित्यात आज मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. म्हणूनच की काय, मराठी समाजात रक्तरंजित क्रांती न करता अनेक मोठमोठे सामाजिक बदल, मानसिक परिवर्तने झाली आहेत. यामागे अनेक महापुरुषांची कामगिरी असली तरी त्यांच्या

अनुयायांनीसुद्धा त्यांची प्रेरणा घेऊन साहित्य लेखन करण्यास सुरुवात केली. म्हणून समाज परिवर्तनाच्या दृष्टीने साहित्याचे योगदान महत्त्वाचे ठरते. ही गोष्ट इथे महत्त्वाची वाटते.

दलित, ग्रामीण साहित्य प्रवाह १९६० नंतर सुरू झाले, असे म्हटले जाते. याबाबतही काही मतमतांतरे आहेत. कोणताही साहित्य प्रवाह का निर्माण झाला? त्यामागील कारणे कोणती होती? कोणाची प्रेरणा म्हणून हा साहित्य प्रवाह वाटचाल करत आहे? या गोष्टी पाहणे एकूणच तो साहित्य प्रवाह समजून घेण्यासाठी, त्याच्या वाटचालीची तटस्थ चिकित्सा करण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. डॉ. आनंद यादव ग्रामीण साहित्याच्या प्रेरणेसंबंधी म्हणतात की, ''या चळवळीने म. ज्योतिबा फुले, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, सुधारक आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, विज्ञाननिष्ठ व समाज प्रवर्तक वि. दा. सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी तसेच समाजवादी विचार प्रवाह, सौंदर्यवादी विचार प्रवाह आणि महर्षी धोंडो केशव कर्वे, छत्रपती श्री. शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या बहुजन समाजविषयक कार्याची दिशा इत्यादींमधील अनेक विचार घटक आत्मसात करून तिने आपला विचार आकाराला आणलेला आहे.'' (मराठी वाङ्मयाचा इतिहास, संपा. प्रा. रा. ग. जाधव, खंड सातवा- भाग दुसरा पृष्ठ. क्र.४४९) वेगवेगळ्या विचारधारा असलेल्या व्यक्तींना यादव प्रेरणास्थानी मानत असल्याने ग्रामीण साहित्याच्या प्रेरणेसंबंधी वैचारिक गोंधळ व मत-मतांतरे असलेली दिसतात. आनंद यादवांच्या मतावर एकनाथ पगार मार्मिक भाष्य करताना म्हणतात की, ''संमिश्र वैचारिकतेशी समरसता अनुभवत ग्रामीण साहित्यचळवळ गतिमान राहिलेली आहे.'' (तत्रैव पृ. क्र. ४४९) या ठिकाणी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते, महात्मा ज्योतिबा फुले व शाहू महाराज यांची प्रेरणा घेऊन ग्रामीण साहित्याने सुरुवातीपासून वाटचाल केली असती; अपवाद सुरुवातीच्या ग्रामीण कादंबऱ्या; तर ग्रामीण




साहित्याने मराठी साहित्याला व समाजाला भरीव असे योगदान दिले असते; परंतु तसे सुरुवातीला झाले नाही. काही प्रमाणात महात्मा गांधी यांची प्रेरणा घेऊन प्रादेशिक व ग्रामीण साहित्य अवतरलेले दिसते. नंतर मात्र ग्रामीण साहित्याच्या तिसऱ्या पिढीने महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज यांची प्रेरणा घेऊन ग्रामीण साहित्य लिहिण्यास सुरुवात केल्यामुळे जातीव्यवस्थेवर आधारित, पुरुषसत्ताक व्यवस्थेवर आधारलेली ग्रामीण व्यवस्था त्यातले समाजजीवन, ग्रामीण मानस, ग्रामीण साहित्यात येऊ लागले; परंतु हेही अल्प प्रमाणात येत होते हेही तेवढेच खरे.

सुरुवातीला ग्रामीण साहित्य, प्रादेशिक साहित्य अशा संज्ञा वापरल्या गेल्या. यासंबंधी डॉ. एकनाथ पगार म्हणतात की, ''प्रादेशिक किंवा ग्रामीण ही वर्णनात्मक विशेषणे आहेत, वाङ्मय निकष असे त्यांचे स्वरूप नाही. विशिष्ट प्रदेशाचे उठावदारपणे चित्रण करणाऱ्या साहित्याला प्रादेशिक मानावे आणि कृषीकेंद्री जीवन व्यवहार शेतीशी निगडित ग्रामजीवन व्यवहार चित्रित करणाऱ्या साहित्याला ग्रामीण मानावे अशी एक व्यवस्था लावलेली दिसते.'' (मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, महाराष्ट्र साहित्य परिषद, प्र. आ. जानेवारी २०१०, पृष्ठ क्रमांक ३९५) १९६२ नंतर जिल्हा परिषदा, नगरपरिषदा यापुढे

आल्या, या अनुषंगाने केल्या जाणाऱ्या राजकारणामुळे ग्रामीण जनता होरपळून निघाली. ग्रामीण समाजाच्या समस्यांमध्ये त्यामुळे अधिक भर पडत गेली. या सर्वांचे चित्र ग्रामीण साहित्यामध्ये येऊ लागले. १९९० नंतर जागतिकीकरणामुळे शहरीकरणाला वेग आला विशेषतः ग्रामीण भागातील लघुउद्योग मोडकळीला निघाले. नवशिक्षित तरुण वर्ग शहरात येऊन स्थिर झाला. त्यामुळे शहरी व ग्रामीण हा वाद ग्रामीण पातळीवर घराघरात सुरू झालेला आपणास दिसतो. वेगवेगळ्या अनुषंगाने ग्रामीण भागाचे शोषण होऊ लागले. या शोषणाची भनक या नवशिक्षित ग्रामीण लेखकांना प्रकर्षाने जाणवू लागली व तेही ही समस्या वेगवेगळ्या अंगाने आपल्या साहित्यातून मांडू लागले. त्यामुळे विषयाच्या अनुषंगाने ग्रामीण साहित्यामध्ये जेवढी विविधता आहे तेवढी विविधता इतर कोणत्याही साहित्य प्रवाहामध्ये असलेली आपणास दिसत नाही. ग्रामीण वास्तव, ग्रामीण समस्या, ग्रामीण बोली, ग्रामीण अस्मिता या सर्व गोष्टी या १९९० नंतरच्या ग्रामीण साहित्यामध्ये जाणीवपूर्वक मोठ्या ताकदीने आलेल्या दिसतात. विशेषतः ग्रामीण कादंबरीमध्ये या गोष्टी आल्यामुळे या समस्यांचे बारीक बारीक पैलूसुद्धा पुढे आले. (मराठी ग्रामीण कादंबरी, संपा. डॉ. संग्राम टेकले, शौर्य पब्लिकेशन, लातूर, प्र. आ. ३०/११/२०१७) त्यामुळे ग्रामीण साहित्याने मराठी वाचकांना वास्तवाचे भान आणून दिले असे म्हटल्यास वावगे ठरू नये. हीच गोष्ट ग्रामीण कथा लेखनाचीसुद्धा आहे. असे असले तरीही सरधोपटपणे वास्तव चित्रणावर या कथा, कादंबऱ्यांमध्ये भर दिलेला दिसतो. यामागील कारणांचा शोध घेणे, याला पर्यायी व्यवस्था देणे, उपाय सुचविणे याबाबत मात्र ग्रामीण साहित्य उदासीन असल्याचे दिसते. तसेच ग्रामीण साहित्यात प्रयोगशीलता ही अभावानेच आलेली दिसते. अशी कबुली अनेक ग्रामीण समीक्षकांनीसुद्धा दिलेली आहे. (मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, पृष्ठ क्रमांक- ५०४)

ग्रामीण कविता ही सुरुवातीपासून सकसपणे प्रवास करत असलेली आपणास दिसते. ती आत्तापर्यंत अशीच सकसपणे प्रवास करत आलेली आहे. ग्रामीण कवितेने ग्रामीण मानस कसे काळानुरूप बदलत गेले, तेथील समस्यांचा अडचणींचा मानवी भावजीवनावर कसा व कोणता परिणाम होतो, याचे फार सूक्ष्म निरीक्षण केलेले दिसते. असे असले तरी ग्रामीण लेखिकांची, कवयित्रींची संख्या आजही कमी दिसते. थोडक्यात, ग्रामीण भागात आपल्या भावभावना काव्यरूपात मांडणाऱ्या बहिणाबाई अजून पुस्तकाच्या रूपाने पुढे आल्या नाहीत, असेच म्हणावे लागते. काही मंडळींनी आपल्या आईच्या, आजीच्या, बहिणीच्या कविता पुस्तकरूपाने पुढे आणलेल्या आहेत, हा प्रयत्न मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. ग्रामीण समाजाची पार्श्वभूमी ही पुरुषप्रधान असल्यामुळे शहरापेक्षाही ग्रामीण भागामध्ये स्त्रियांना जाच, बंधने अधिक आहेत. या पार्श्वभूमीवर ग्रामीण स्त्रीवाद हा चांगल्या प्रकारे मांडता येऊ शकतो; परंतु तसा प्रयत्न अद्याप झालेला दिसत नाही. ग्रामीण साहित्य प्रवाहाने खरं म्हणजे हा ग्रामीण स्त्रीवाद अधोरेखित करणे, त्याला गती देणे गरजेचे आहे.

डॉ. वासुदेव मुलाटे यांनी २० वर्षांपूर्वी नागनाथ कोत्तापल्ले यांची घेतलेली मुलाखत आजही महत्त्वाची आहे. वासुदेव मुलाटे यांनी या मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नांवर नागनाथ कोत्तापल्ले यांनी दिलेली काही उत्तरे आजच्या ग्रामीण साहित्याला तंतोतंत लागू पडताना दिसतात. त्यातील काही प्रश्नांची उत्तरे पाहा.

१. ग्रामीण भागातील अनेक प्रश्न जातीव्यवस्थेने जसे निर्माण केले आहेत तसे अर्थव्यवस्थेनेही निर्माण केलेले आहेत. ग्रामीण साहित्य चळवळीने याचे भान बाळगले, तर एक व्यापक संघर्षाचे भक्कम व्यासपीठ म्हणून ग्रामीण साहित्याची चळवळ ओळखली जाईल; पण सध्या तरी ही जाणीव ग्रामीण साहित्यात अत्यल्प आहे.

२. एकूण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याची आणि नवी समताधिष्ठित समाजरचना उभारण्याची जाणीव ग्रामीण

साहित्यात कमी प्रमाणात आहे. याची कारणे (१) सर्व दूर पसरलेल्या, अनेक समाज गटांत विभागलेल्या ग्रामीणांचे असंख्य प्रश्न एकदम डोळ्यासमोर येणे शक्य नाही. (२) ग्रामीण समाजाचे असंघटित असणे. (३) शेतकऱ्यांची मुले लिहिती झाली, बोलती झाली; परंतु शेतमजुरांच्या घरातील लेखक, कवी अभावानेच प्रकट झालेले दिसतात. (४) ग्रामीण वास्तवाच्या बिंब प्रतिबिंबात्मक पसाऱ्याचा अवकाश ग्रामीण लेखकांनी मांडला; परंतु सूक्ष्म संघर्ष नाट्य असे सूत्रांमध्ये आलेले नाही. तसेच चळवळीचा आवेश साहित्यकृतीत पुरेशा उत्कटतेने प्रतीतही झालेला नाही. याच मुलाखतीमध्ये नागनाथ कोत्तापल्ले एक आशावादही व्यक्त करतात की, दलित साहित्य व ग्रामीण साहित्य यांचे इप्सित, ध्येय एकच असेल दोन्ही चळवळी हातात हात घेऊन समतेचा लढा लढतील ही काळाची गरज आहे. (ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, स्वरूप प्रकाशन, तृतीय आवृत्ती, २६ जानेवारी २००७ पृष्ठ क्रमांक २२८)

दत्ता भगत दलित, ग्रामीण साहित्यसंबंधी काही नोंदी करताना दिसतात. (ग्रामीण दलित साहित्याचा अनुबंध, संपा. प्राचार्य डॉ.म.सु पगारे, दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १२ मार्च २०१०, पृ. क्र. ४५) त्यांच्या मते, १) दलित, ग्रामीण यांचा सामाजिक स्तर हा ब्राह्मणेतर आहे. २) मराठीतील मध्यवर्ती प्रवाहासंबंधी ग्रामीण आणि दलित लेखक असमाधान व्यक्त करतात. ३) मध्यवर्ती प्रवाहातील समीक्षेचे मापदंड या दलित, ग्रामीण साहित्यकृतींना लावता येणार नाहीत. ४) खेड्यांची स्वयंपूर्णता कायम ठेवून सामाजिक विषमता दूर कशी करता येईल त्याबाबत ग्रामीण साहित्यिकांनी काही विवेचन केले आहे, असे आढळून येत नाही. ५) सामाजिक न्यायाचा मुद्दा ग्रामीण साहित्याच्या चळवळीत कधीही केंद्रस्थानी येत नाही. ६) म. फुले मान्य आहेत; परंतु फक्त 'शेतकऱ्याचा असूड' ग्रंथापुरते, 'गुलामगिरी' ग्रंथ यांना मान्य नाही किंवा यावर हे ग्रामीण साहित्य




बोलायला तयार नाही. ७) ग्रामीण साहित्य हा स्वतंत्र प्रवाह आहे; पण ती चळवळ नाही. दलित साहित्य मात्र केवळ प्रवाह नसून ती एक चळवळ आहे, ही भूमिका १९८० नंतर उदयाला आली. ८) आत्मसन्मानाचा मुद्दा दलित साहित्यात केंद्र वरती आहे, तर ग्रामीण साहित्यात तहान, भूक, बेकारी, आत्महत्या, शेती व राजकारण केंद्रस्थानी आहे. ९) चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी या ज्या साहित्यकृती निर्माण होत आहेत त्यांच्या मूल्यमापनाकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. १०) 'दलित' ही संज्ञा आजही वापरणे म्हणजे इथल्या ग्रामीणतेशी तेथील माणसांशी अजून आपण नाळ जोडून आहोत हा संकेतच यातून दलित लेखकांनी दिलेला आहे.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी जो आशावाद व्यक्त केला होता की, ग्रामीण दलित लेखकांनी एकत्र येऊन आपल्या साहित्यातून गावपातळीवरील सर्व जात, वर्ग, लिंग या सर्व समस्या ताकदीने मांडल्या पाहिजेत, ते आज काही प्रमाणात का होईना घडताना दिसत आहे. आज अनेक लेखकांना ग्रामीण, दलित लेखक म्हणून स्वतंत्रपणे उपाध्या लावता येणार नाहीत आणि त्यांचे लेखन हे संमिश्र स्वरूपाचे असेच आहे, उदाहरणार्थ भास्कर चंदनशिव, वामन होवाळ, सदानंद देशमुख, जी. के. ऐनापुरे, योगीराज वाघमारे, चांगदेव

कांबळे, वासुदेव मुलाटे, नागनाथ कोत्तापल्ले, आनंद पाटील, मोहन पाटील, भारत काळे, प्रकाश होळकर, बाबाराव मुसळे, लक्ष्मण महाडिक, सोपान हाळमकर, रा. रं. बोराडे, शेषराव मोहिते, इंद्रजित भालेराव, भरत दौंडकर, नारायण सुमंत, तुकाराम धांडे, रवींद्र ठाकूर, सुरेश पाटोळे, उत्तम बंडू तुपे, उत्तम कांबळे, महेंद्र कदम असे अनेक लेखक सांगता येतील.

डॉ. गोपाळ गुरू म्हणतात की, जातीला परिभाषा गावाने दिली. म्हणजेच 'दलित' ही संकल्पना ग्रामीण आहे. शहराने 'दलित' ही संकल्पना निर्माण केली नाही तर ती ग्रामीण व्यवस्थेतून आलेली आहे. तेव्हा ग्रामीण व्यवस्थेत बदल करावयाचे असतील, तर 'दलित' ही संकल्पना तुम्हाला तिच्या मागील व्यवस्था नष्ट करणे गरजेचे आहे. ही व्यवस्था गाव पातळीवर सर्व घटकांत असलेली दिसून येते, म्हणून गाव पातळीवरील समतेच्या दृष्टिकोनातून, मानवतेच्या दृष्टिकोनातून सर्व घटकांमध्ये बदल करणे गरजेचे आहे व हा बदल साहित्य, व इतर कलांच्या साह्याने म्हणजे सांस्कृतिक परिवर्तन करूनच होणे शक्य आहे. म्हणून, ग्रामीण साहित्याचा केंद्रवर्ती हा माणूस, माणुसकी, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या गोष्टी असणे काळाची गरज आहे. अनेक ग्रामीण लेखकांना शहरीकरणाचा राग आहे. यामागे अनेक कारणे आहेत. त्याशिवाय आधुनिकीकरण आल्याने जातीनिष्ठ व्यवसायाला छेद बसतो. दलित संकल्पना पुसण्यास मदत होते. हीही कारणे असलेली दिसतात. याही गोष्टी इथे लक्षात घेणे गरजेचे आहे. ग्रामीण लेखक ग्रामीण समस्या समर्थपणे मांडत आहेत यात वाद नाही; परंतु फक्त समस्या मांडून जमणार नाही, तर समताधिष्ठित समाजासाठी विशिष्ट भूमिका घेणे गरजेचे आहे. यासाठी साहित्याला समांतर अशी जन चळवळ उभी राहणे गरजेचे असते. ग्रामीण साहित्याबाबत मात्र समांतर अशी जन चळवळ उभी राहिलेली दिसत नाही. सामाजिक समतेच्या अनुषंगाने दलित वर्गाने, स्त्रियांनी बदलणे ही त्यांची गरज आहे; परंतु ग्रामीण पातळीवरील शहरी पातळीवरील व्यक्तींनी समतेच्या अनुषंगाने बदलणे हा त्यांचा मानवतावाद ठरणार आहे व हा काळाचा रेटासुद्धा आहे. याचे भान नवलेखकांनी ठेवणे गरजेचे आहे. काही ठिकाणी असेही दिसते, की दलितांनी व स्त्रियांनी जो परिवर्तनवादी दृष्टिकोन स्वीकारलेला आहे तो दृष्टिकोन स्वीकारण्यास इतर मंडळी तयार होत नाहीत; कारण का तर तो वरील मंडळींनी स्वीकारलेला आहे व तो आपल्या हिताचा नाही म्हणून, ही मंडळी बौद्धिक छल, शाब्दिक छल करत हा समतावादी दृष्टिकोन नाकारण्याचा प्रयत्न करत असतात. यापासून दूर जाण्याचा, याचा उपहास करण्याचा, प्रयत्न करत असतात. किंवा इतर दुय्यम मुद्द्याला महत्त्व देत या विषयाला बगल दिली जाते. संस्कृतीच्या, देशी परंपरेच्या नावाखाली विषमता मान्य केली जाते व त्याला कुणी विरोध करू नये, मोडू नये यासाठी साम-दाम-दंड याचा वापर केला जातो. आता जास्त काळ असे करता येणार नाही कारण सर्वांच्या समस्या एकमेकात गुंतलेल्या आहेत. यासाठी एकाने बाहेर पडून चालणार नाही तर सर्वांनी बदलणे काळाची गरज आहे, हे जितक्या लवकर या मंडळींना कळेल तेवढे बरे. अलीकडे फार गुंतागुंतीचे वातावरण गाव शहर पातळीवर दिसते. माणसाकडे त्याच्या जातीच्या दृष्टीने तर पाहिले जातेच; पण त्याच बरोबर तो एक आपला मतदार आहे, वोट बँक आहे म्हणूनसुद्धा पाहिले जाते, परिणामी हा समूह वोट बँकेच्या फायद्याच्या अनुषंगाने जातीय पातळीवर एकत्र येण्याचा, जातीय संघटना करण्याचा प्रयत्न करत आहे म्हणून, जातीय अस्मिता तोही वाढवतो आहे व सत्ताधारीवर्गसुद्धा त्याला यासाठी प्रलोभने देत आहे. त्यातून नवीन संघर्षसुद्धा पुढे येत आहे आणि म्हणून डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर म्हणतात की, जे सूक्ष्म संघर्ष आहेत तेसुद्धा साहित्यात येणे गरजेचे आहे. म्हणजेच विशिष्ट जातीचा माणूस आहे म्हणून तू मला नको आहेस; परंतु तो मतदार आहे म्हणून किंवा मतदार म्हणून तू मला हवा आहेस. त्यामुळे अशी दुटप्पी भूमिका मोठ्या प्रमाणात इथे घेतली जाताना दिसत आहे. दलित साहित्य फुले, शाहू, आंबेडकर










यांची प्रेरणा घेऊन ठाम भूमिका घेऊन पुढे येत असल्यामुळे जागोजागी दुःख, समस्या असताना सुद्धा यामध्ये उदासीनता, रडगाणे येत नाही. उलट ही दुःखे का आहेत, समस्या का आहेत, याची कारण-मीमांसा केली जाते व त्यातून विद्रोह, नकार पुढे येतो. म्हणजेच भूमिका असणारे साहित्य निराशावादी नसते तर ते लढणारे, आशावादी, वेळप्रसंगी आत्मटीका करणारे, बदल स्वीकारणारे असते. समाज बदलू पाहणाऱ्या, नवसमान निर्मितीची मांडणी करणाऱ्या व्यक्तीची प्रेरणा हवी किंवा त्याचा विचार स्वीकारला गेला पाहिजे, तरच समस्यांना पर्याय देणारे साहित्य निर्माण होऊ शकते व याच साहित्यातून नवसमाजाची निर्मिती होऊ शकते.

साहित्याला समांतर लोक चळवळ असणे गरजेचे आहे. ग्रामीणतेचे आणि शेतीचे अर्थशास्त्र अतिशय व्यवस्थित तर्कशुद्ध पद्धतीने शरद जोशी यांनी मांडले. उत्पादन खर्चावर आधारित बाजार भाव शेतमालाला मिळाला पाहिजे ही जाणीव शेतकरी संघटनेने सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली; परंतु हेच शरद जोशी ग्रामीण लेखकांसंबंधी म्हणतात की, शहरात गेलेली शेतकऱ्यांची पोरे शहरात रमली त्यात लिहिण्याचे कसब असणाऱ्यांनी आपल्या गावाविषयी लिहिले; पण शहराला काय पटेल, काय आवडेल याचा विचार करत लिहिले; पण 'हरामखोरांनो, तुम्ही माझं गाव लुटलं या पापाचा तुम्हाला झाडा द्यावा लागेल.' हा टाहो कोणी फोडला नाही. उलट आपल्या ग्रामीण जन्मामुळे साहित्यात आपल्याला काही राखीव जागा असावी असा आक्रोश करणारी एक साहित्य आघाडी उभी राहिली. (म.सा.प. पृ. क्र. ४४७) शरद जोशी यांचा ग्रामीण लेखकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन किंवा त्यांचे अनुभव चांगले. यावर आजही तेवढ्याच गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. नागनाथ कोत्तापल्ले यांनी सुद्धा या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले होते. उदा. शेतकऱ्यांच्या लढ्याबद्दल किती ग्रामीण साहित्यिकांना उत्सुकता वाटली होती? या लढ्याशी निदान मनाने तरी ते बांधील होते काय? दुष्काळाच्या काळात हे लेखक काय करीत होते? म. फुले यांच्या जीवनपटाचा भव्यपट किती लोकांना समजावून घ्यावासा वाटला? उद्या शेतीमालाला योग्य भाव द्या या मागणीसाठी आणि ग्रामीण भागातील दलित शोषितांना न्याय द्या, या मागणीसाठी कार्यकर्त्यांनी मोर्चे काढले, तर त्यात किती साहित्यिक सहभागी होतील, लढा देण्यासाठी किती लोक उभे राहतील, निदान ग्रामीणच्या मागण्यासंबंधी, प्रश्नांसंबंधी वस्तु-स्थितीदर्शक आणि लोकजागृती करणारे लेखक किती? हे आणि यांसारखे प्रश्न मला महत्त्वाचे वाटतात. ग्रामीण साहित्याच्या निर्मिती बरोबरच ग्रामीण साहित्याची चळवळ चालवायची असेल, तर हे प्रश्न महत्त्वाचे ठरतात. कुठलीही चळवळ ही जीवनातल्या ठाम भूमिकेशिवाय नीटपणे

उभी राहू शकत नाही. (ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. २२६) शेतकरी चळवळीचे नेते शरद जोशी यांना समजून घेण्यास ग्रामीण साहित्यिक कमी पडले. असे नेमके का घडले, याचाही अभ्यास संशोधनाच्या पातळीवर होणे गरजेचे आहे. कॉ. शरद पाटील हे ''जाती अंतासाठी वर्ग अंताचा लढाही महत्त्वाचा आहे,'' असे म्हणतात. या सर्वांकडे गंभीरपणे पाहणे गरजेचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सातत्याने खाजगीत बोलायचे की, ज्या व्यक्तींना जन्माने काही अधिकार मिळालेले आहेत ते त्यांनी का नाकारावेत? त्यांचा अन्य काही फायदा असला तरच ते सहजतेने नाकारतील अन्यथा ते नाकारणार नाहीत. तसेच ते म्हणत, की तुम्ही कोणत्याही मार्गाने विकास करण्याचा प्रयत्न करा, जात व्यवस्थाही आडवी येणारच म्हणून भारतीय पातळीवर शाश्वत विकास करण्यासाठी अगोदर जाती नष्ट करणे गरजेचे आहे. आजही हाच प्रश्न आपणांसमोर ठाण मांडून उभा आहे. म्हणून आज मानवतावादी भूमिका, समताधिष्ठित समाजासाठी साहित्य निर्मिती करणे काळाची गरज आहे. कोणत्या एका व्यक्तीला प्रेरणास्थानी मानून सर्व व्यक्ती लेखन करतील, असे आता होईल असे वाटत नाही. लहानातल्या लहान खेडेगावातसुद्धा एकाच देवाला मानणारे लोक नसतात. तिथेही वेगवेगळ्या देवाची मंदिरे असतात. म्हणून एकाच व्यक्तीला सर्व जण स्वीकारतील किंवा त्याला स्वीकारावे, असा आग्रह धरणे हे योग्य नाही. संविधान सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य देते आहे. आचार, विचारांचे स्वातंत्र्य देत आहे. आपआपल्या उपासनांचे स्वातंत्र्य देत आहे. स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्याची संधी व हक्क देत आहे; परंतु त्याचबरोबर कुणाचा अवमान होणार नाही. कोणाचे स्वातंत्र्य, समता धोक्यात येणार नाही. याच्यासाठीसुद्धा हे संविधान कटिबद्ध आहे म्हणून, सर्वसमावेशक अशा संविधानाला केंद्रवर्ती ठेवून उज्ज्वल भारतीय समाजासाठी साहित्य-निर्मिती होणे गरजेचे आहे. आजही अनेक लेखक या दृष्टीने वाटचाल करत आहेत, हा आशावाद मराठी साहित्याच्या कक्षा वाढविणारा आहे.

**आधारभूत ग्रंथ**


१) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग दुसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, संपा. प्रा. रा. ग. जाधव, प्रथम आवृत्ती -जानेवारी २०१०.

२) ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही, संपा. डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती ०९ ऑगस्ट २००५.

३) ग्रामीण साहित्य स्वरूप व दिशा-डॉ. वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती - ०६ डिसेंबर २००८

४) ग्रामीण साहित्यप्रकार स्वरूप आणि चिकित्सा, डॉ. मनोहर सुरवाडे, सुगन प्रकाशन, फैजपूर, प्रथमावृत्ती १४/१०/२०१२

५) ग्रामीण साहित्य आणि संस्कृती - मोहन पाटील, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती - १५/ १०/ २००८

६) ग्रामीण : समाज आणि कथा साहित्य, डॉ. मनोहर सुरवाडे, सुगम प्रकाशन, प्रथमावृत्ती - १३/ ०५/ २०१२

७) ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद तृतीय आवृत्ती -२५/०१/२००७

८) ग्रामीण - दलित साहित्याचा अनुबंध, संपा. प्राचार्य डॉ. म. सु. पगारे, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १२/०३/२०१०



**प्रा. डॉ. राजाभाऊ विनायक भैलुमे**

चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय,

शिरूर, पुणे

संपर्क : ९८२२२१५३८८

# महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
# कार्यवृत्त

### महाराष्ट्र साहित्य परिषद,
### शाखा – जुळे सोलापूर

**कार्यवृत्तान्त– १**

मसाप जुळे सोलापूरच्या कार्यकारिणी आणि पदाधिकाऱ्यांची सभा १४ सप्टेंबर २०२५ रोजी अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांच्या उपस्थितीत इंडियन मॉडेल स्कूल येथे संपन्न झाली. यात कोषाध्यक्ष आनंद देशपांडे यांच्या निधनाने रिक्त झालेल्या जागेवर आजीव सदस्य अविनाश कामतकर यांची सर्वानुमते कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्या नयना देशपांडे या नोकरीच्या निमित्ताने पुणे येथे स्थायिक झाल्याने त्यांच्या जागी कार्यकारिणीवर सदस्य आणि शिक्षिका अश्विनी मोरे – वाघमोडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. सभेतील इतर विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. दिवंगत आजीव सदस्य रमेश जहागीरदार आणि इतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून सभा संपन्न झाली. या वेळी पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

**कार्यवृत्तान्त – २**

मसाप जुळे सोलापूर आणि हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालय सोलापूर यांच्या वतीने १ ऑक्टोबर २०२५ रोजी 'हिरा' या मराठी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांच्या हस्ते प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे, उपाध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, कोषाध्यक्ष अविनाश कामतकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे मराठी भाषा दक्षता अधिकारी तथा साहेब कुलसचिव शिवाजी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या वेळी प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, प्रा. अजित देवसाळे यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. शिवाजी शिंदे यांचे या वेळी मराठी भाषेला अभिजात भाषा दर्जा मिळून वर्षपूर्ती झाली म्हणून व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल चव्हाण, श्रुती चडचण यांनी केले, तर आभार शुभम मामडयाल यांनी मानले. याच कार्यक्रमात मिताली कुलकर्णी, संस्कृती शिंदे यांच्या पसायदानाने कार्यक्रम संपन्न झाला.

**कार्यवृत्तान्त –३**

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, व्ही.जी. शिवदारे महाविद्यालय जुळे सोलापूर, आणि मसाप जुळे सोलापूर यांच्यावतीने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळून एक वर्ष झाल्याच्या निमित्ताने ३ ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्‌घाटन उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांच्या हस्ते शिवदारे महाविद्यालयात करण्यात आले. शिवदारे महाविद्यालयाचे प्राचार्य दत्तात्रय सुत्रावे, मसापचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे, कोषाध्यक्ष अविनाश कामतकर, मराठी

विभाग प्रमुख प्रा. डॉ. शुभदा उपासे-शिवपुजे आदींची या वेळी प्रमुख उपस्थिती होती. यानंतर ज्येष्ठ गझलकार बद्दीउजमा बिराजदार म्हणजे साबीर सोलापुरी यांच्या गझल गायनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली पाटील यांनी केले, तर सी. पी. उमरजकर यांनी आभार प्रदर्शन केले. या वेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कार्यवृत्तान्त – ४**

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर आणि मसाप जुळे सोलापूर यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात १५ ऑक्टोबर २०२५ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती स्वर्गवासी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी डॉ. मोनिका सिंग ठाकूर यांच्या हस्ते ग्रंथ पूजन आणि डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. या वेळी उपजिल्हाधिकारी तथा मराठी भाषा सदस्य सचिव अंजली मरोड, पुनर्वसन विभाग उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, तहसीलदार सरस्वती पाटील, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे साहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, साहाय्यक महसूल अधिकारी श्रीमती पल्लवी बागुल, महसूल साहाय्यक मुर्बीण कडेचुर, मसापचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, उपाध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे, कोषाध्यक्ष अविनाश कामतकर, यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी आणि मसापचे पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी अप्पर जिल्हाधिकारी डॉ. मोनिका सिंग ठाकूर यांनी गुलज़ार यांची 'किताबे' ही गझल सादर करून त्यांच्या संदर्भात मनोगतही व्यक्त केले, तर डॉ. शिवाजी शिंदे यांनी वाचन प्रेरणा दिनाला अनुसरून आपले विचार व्यक्त केले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा – उत्तर सोलापूर

**कार्यवृत्तान्त**

उत्तर सोलापूर शाखेची सभा दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी बाळे येथील महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यालयात मसाप सोलापूर जिल्ह्याचे प्रमुख पद्माकर कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या शाखेच्या संस्थापक अध्यक्ष आणि माजी आमदार स्वर्गवासी निर्मलाताई ठोकळ यांच्या निधनानंतर या शाखेची पुनर्रचना करण्यात आली. या वेळी सचिन ठोकळ यांची संस्थापक अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली, तर शाखेच्या अध्यक्षपदी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे साहाय्यक कुलसचिव आणि मराठी भाषा दक्षता अधिकारी डॉ. शिवाजी शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या बैठकीत शाखेचे इतर पदाधिकारी निवडण्यात आले. उपाध्यक्ष– शिल्पा ठोकळ, कार्याध्यक्ष– उज्ज्वला साळुंखे, प्रमुख कार्यवाह– संतोष काळुंके, कार्यवाह– डॉ. नितीन आवताडे, सहकार्यवाह– पूनम पाटील, कोषाध्यक्ष– शिवाजी आतकरे, यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून सारंग पाटील, आशा भोसले, आशा ठोकळ, अब्दुलकादर मुजावर, विद्या पुजारी, निवृत्ती दळवी, ह.भ.प. ज्योती चांगभले, स्वाती गाजरे आदींची निवड करण्यात आली. मार्गदर्शक म्हणून पद्माकर कुलकर्णी, ह.भ.प. सुधाकर इंगळे महाराज यांचीही या वेळी निवड करण्यात आली.

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा – धुळे आणि नंदुरबार

महाराष्ट्र साहित्य परिषद, धुळे जि. शाखा आणि नंदुरबार जि. शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र उत्सवानिमित्त वाचन कट्टा अंतर्गत दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी ऑनलाईन कवी-संमेलन आयोजित केले होते. त्यात नागपूर, नांदेड, धाराशिव, नंदुरबार,

साक्री, पिंपळनेर शिरपूर, मुक्ताईनगर, धुळे येथील कवी आणि कवयित्री यांनी स्त्री, तिचं जीवन, स्त्रीचं कुटुंबातील आणि समाजातील स्थान, तिच्या नातेसंबंधातील विविध भूमिका, स्त्री शक्तीची विविध रूपे, स्त्री पुढील आव्हाने या विषयावर आशयघन आणि अर्थपूर्ण कविता २४ कवी आणि कवयित्री यांनी सादर केल्या. कवी संमेलनाचा समारोप मा. रवींद्र तांबोळी (नांदेड) यांनी केला. या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन प्राचार्य डॉ. संजीव गिरासे यांनी केले, प्रास्ताविक धुळे-नंदुरबार जि. प्रतिनिधी प्रा. डॉ. शशिकला पवार यांनी केले. आभार प्रा. डॉ. उमेश शिंदे (नंदुरबार) यांनी मानले. या कवी संमेलनास दोन्ही शाखांचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, सभासद, वाचन कट्टाचे सदस्य, इतर मान्यवर यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. संमेलनाच्या आयोजनास शाखांच्या कार्यकारिणी सदस्यांचे सहकार्य लाभले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा – चाळीसगाव

**चाळीसगाव मसाप शाखेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे उत्साहात आयोजन**

**९ नोव्हेंबर २०२५**

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा चाळीसगाव तर्फे ९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत चाळीसगाव येथील राष्ट्रीय सह.शि.प्र.मंडळ कर्मचारी पतपेढी सभागृहात वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी मसाप शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप होते. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य तानसेन जगताप यांनी मसाप शाखेस आर्थिक मदत करण्याचे आवाहन करत येऊ घातलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा येथे बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले. सभेस शाखेचे कार्यकारी विश्वस्त किसनराव जोर्वेकर, विश्वस्त उत्तमराव काळे, सुधीर पाटील, अध्यक्ष डॉ. सुनिल राजपूत उपस्थित होते.

प्रारंभी कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे यांनी सभेस उपस्थित सभासदांचे स्वरचित शाखागीत गाऊन स्वागत केले. प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे यांनी मागील वर्षाच्या सभेचे इतिवृत्त वाचन करुन आर्थिक वर्ष २०२४-२५ चे शाखा कार्यवृत्त सादर केले. तदनंतर रामचंद्र गोसावी यांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ चा जमाखर्च ताळेबंद सभासदांसमोर मांडला, सादर केलेल्या ताळेबंदास सभासदांनी हात उंचावून मंजुरी दिली.

या प्रसंगी सभासद एस. आर. राजपूत यांनी प्रातिनिधिक मनोगत व्यक्त करत मसाप शाखेच्या कार्यपद्धतीविषयी समाधान व्यक्त केले. सूत्रसंचालन शालिग्राम निकम यांनी, तर आभार प्रदर्शन विजय कदम यांनी केले. उपस्थित सभासदांतील योगाचार्य वसंतराव चंद्रात्रे यांचा नुकतेच 'पंचामृत' हे पुस्तक प्रकाशित झाल्याप्रीत्यर्थ अध्यक्षांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**चाळीसगाव येथे 'कृतार्थ' ग्रंथाचे प्रकाशन**

**३० नोव्हेंबर २०२५**

आपली भाषा ही संस्कृतीची निदर्शक असते : प्रा. जोशी.

आपण जे जे बोलतो, जशा पद्धतीने बोलतो. त्या वेळी आपल्यावर झालेले भाषिक संस्कार व विवेकाचे आपसूकच प्रकटीकरण होत असते. यातून आपली संस्कृती कळते. अर्थातच आपली भाषा ही आपल्या संस्कृतीची निदर्शक असते, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष तथा 'मसाप' पुणेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी केले.

वाणी मंगल कार्यालयात आयोजित येथील 'मसाप'च्या शाखेचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप यांच्या जीवनकार्यावर आधारित 'कृतार्थ' या ग्रंथाचे प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. शहादा येथील सेवानिवृत्त प्राचार्य विश्वासराव पाटील अध्यक्षस्थानी होते. 'मसाप' पुणेचे विभागीय

कार्यवाह वि. दा. पिंगळे, सत्कारमूर्ती प्राचार्य तानसेन जगताप, लीलावती जगताप व 'कृतार्थ' ग्रंथाच्या संपादिका प्रतिभा बागूल मंचावर उपस्थित होत्या. प्रा. जोशी म्हणाले, की ''ज्या माणसाच्या डोळ्यांत पाणी येऊ शकते, तोच माणूस समाजाचे अश्रू पुसू शकतो. त्यासाठी तानसेन जगताप यांच्यासारखे संवेदनशील होता आले पाहिजे'' असे त्यांनी सांगितले. सुरुवातीला केतकी बागूल व तितिक्षा पवार यांनी कथ्थक व भरतनाट्यम् एकापाठोपाठ दोन नृत्ये सादर करून श्रोत्यांमध्ये चैतन्य निर्माण केले. त्यानंतर 'कृतार्थ'च्या संपादिका प्रतिभा बागूल यांनी प्रास्ताविक सादर केले. वि. दा. पिंगळे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्राचार्य विश्वासराव पाटील यांनी अध्यक्षीय मनोगतात तानसेन जगताप यांच्या कार्याचा गौरव केला. सत्काराला उत्तर देताना प्राचार्य तानसेन जगताप भारावून गेले होते. त्यांनी जो दुःख पचवतो तोच विचारांनी प्रगल्भ होतो असे सांगत,

'आयुष्याशी अजून माझा करार बाकी आहे,
मावळताना लखलखण्याचा विचार बाकी आहे'

ही कवी कुसुमाग्रजांची कविता ऐकवली. प्राचार्य तानसेन जगताप यांच्याविषयी डॉ. संजीव गिरासे लिखीत संस्कृत कवितेचे कामिनी अमृतकार यांनी वाचन केले. कार्यक्रमात केतकी बागूल, तितिक्षा पवार व शालिग्राम निकम यांचा प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पुणे येथील युवा उद्योजक दिग्विजय निकुंभ यांचाही विश्वासराव पाटील यांच्याहस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. कवी मनोहर आंधळे व शालिग्राम निकम यांनी सूत्रसंचालन तर उत्तमराव काळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्राचार्य तानसेन जगताप यांच्या कन्या मंजुषा निकुंभ, निशा पाटील, सुषमा पवार, जावई प्रा. जयसिंग बागूल, रवींद्र पाटील व संजीव पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यशस्वितेसाठी कार्याध्यक्ष गणेश आढाव, कोषाध्यक्ष रामचंद्र गोसावी, प्रमुख कार्यवाह नितीन खंडाळे, कार्यकारणी सदस्य अशोक ब्राह्मणकार, अशोक वाबळे, विजय कदम, भाऊसाहेब वाघ, ॲड. सुषमा पाटील, गोरख ढगे तसेच किरण मगर, प्रवीण पवार, समाधान बच्छाव, भाऊसाहेब काळे, मधुकर कासार, नीलेश काकडे आदींचे सहकार्य लाभले.

### मसाप कथाकथन, निबंध स्पर्धेत ५२ शाळांतील ३०० स्पर्धकांचा सहभाग

**१० ऑगस्ट २०२५**

मसाप कथाकथन व निबंध लेखन स्पर्धेस चाळीसगावकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत ५२ शाळांतील तब्बल ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

''मसाप कथाकथन व निबंधलेखन स्पर्धेस मिळालेला प्रतिसाद खरोखरच उल्लेखनीय आहे,'' असे प्रतिपादन रंगगंध कलासक्त न्यासचे व शेठ नारायण बंकट वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. मुकुंद करंबेळकर यांनी केले. रविवारी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा चाळीसगाव आयोजित इयत्ता ५ वी ते पदवीधर या वर्गातील तीन गटांत झालेल्या कथाकथन व निबंध लेखन या स्पर्धांचे उद्घाटन डॉ. करंबेळकर यांचे हस्ते झाले. त्या प्रसंगी ते बोलत होते. मसापचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप हे अध्यक्षस्थानी होते. त्या प्रसंगी विश्वस्त मंडळाचे कार्यकारी विश्वस्त किसनराव जोर्वेकर, सदस्य उत्तमराव काळे, स्पर्धा समिती अध्यक्ष अशोक ब्राह्मणकार हे मंचावर उपस्थित होते.

### साहित्य उपक्रम घेण्यासाठी प्रेरणादायी

डॉ. करंबेळकर म्हटले की, मसाप शहरासोबतच तालुक्यातील ग्रामीण विद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंत जाऊन पोहोचल्यामुळे हे घवघवीत यश मिळाले आहे. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप यांनी ''मसाप शाखेतर्फे विद्यार्थ्यांसाठी हा पहिलाच प्रयोग आम्ही केला व यशस्वी झालो. हा आनंद अधिकचे साहित्य उपक्रम घेण्यासाठी प्रेरणादायी आहे,'' असे मत मांडले.

प्रमुख उपस्थितांपैकी किसनराव जोर्वेकर यांनी

''३०० संख्येच्यावर उपस्थित असलेले विद्यार्थी व मिळालेला प्रतिसाद म्हणजे महाराष्ट्र साहित्य परिषदेविषयी दाखवलेला विश्वास आहे.'' असे सांगितले. उद्घाटन समारंभाच्या प्रारंभी स्पर्धा प्रमुख सुधीर देवरे यांनी सूत्रसंचालनासह प्रास्ताविक सादर केले, तर कार्याध्यक्ष कवी मनोहर आंधळे यांनी उपस्थितांसमोर स्वलिखित मसाप शाखा गीत सादर केले. उपाध्यक्ष गणेश आढाव यांनी स्पर्धेचा आवाका व कार्यवाहीचा लेखाजोखा मांडला. आभारप्रदर्शन नितीन खंडाळे यांनी केले.

**तीन गटांत रंगली स्पर्धा; मुलींचा सहभाग अधिक**

इयत्ता पाचवी ते सातवी, आठवी ते दहावी आणि अकरावी ते पदवीधर अशा तीन गटांत या दोन्हीही स्पर्धा तब्बल चार तासांपर्यंत सुरू होत्या. या स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून ह.भ.प. प्रा.पी.एस. चव्हाण, विलास पाटील, ए.बी.राठोड, किरण मगर, प्रवीण पवार यांनी काम पाहिले. स्पर्धेस चाळीसगाव तालुक्यातील ५२ शाळांमधील ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले. त्यात मुलींचा सहभाग प्रचंड होता. शिक्षक व पालकही बहुसंख्येने उपस्थित होते.

**महाराष्ट्र साहित्य परिषद,**
**शाखा – पिंपरी चिंचवड**

**जागतिक पुस्तक दिन विशेष कार्यक्रम**
**दि. २३ एप्रिल २०२५**

दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेतर्फे भव्य ग्रंथ पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम सायंकाळी ठीक ६ वा. परिषद कार्यालय, लक्ष्मी कॉम्प्लेक्स, बिजलीनगर, चिंचवड येथे पार पडला. पुस्तक म्हणजे ज्ञान, संस्कार आणि विचारांची संपत्ती याचा संदेश देत हा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला, लेखक आणि कवी बांधवांनी स्वतःच्या प्रकाशित पुस्तकांसह उपस्थिती लावली. तसेच वाचकांनीही आपली आवडती पुस्तके आणून पूजन विधीत सहभागी होत साहित्यनिष्ठा व्यक्त केली. ग्रंथाचे महत्त्व पटवून देणारे विचारमंथन व संवाद यामुळे कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण झाला. मसाप पिंपरी चिंचवड कार्यकारिणी मंडळाच्या पुढाकाराने आयोजित हा उपक्रम वाचन संस्कृती मजबूत करणारा ठरला. मसाप अध्यक्ष राजन लाखे, कार्याध्यक्ष विनीता ऐनापुरे, उपाध्यक्ष रजनी शेठ, कार्यवाह संजय जगताप, सदस्य किरण जोशी व मसाप सदस्य अशोक पगारिया, सीमा गांधी, बाबू डिसूजा, माधुरी डिसूजा हे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी अशा उपक्रमांची सातत्याने गरज व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व साहित्यप्रेमींनी सहकार्य केले. ज्ञानयज्ञाच्या या सोहळ्याला उपस्थिती लावणाऱ्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद!

**महाराष्ट्र दिन व कामगार दिन विशेष कार्यक्रम**
**दि. ३ मे २०२५**

शनिवार, दिनांक ३ मे २०२५ रोजी 'महाराष्ट्र दिन' व 'कामगार दिना'निमित्त महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेतर्फे कामगार सत्कार व कवी संमेलन या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. फरांदे डेंटल हॉस्पिटलच्या सभागृहात संध्याकाळी ५.३० वा. कार्यक्रमाची सांगता झाली. 'मी मराठी' किंवा 'कामगार' या विषयावर कवी संमेलनात विविध कवींनी समाजातील कामगारांचे योगदान, त्याची जिद्द व मराठी अस्मिता यावर प्रभावी काव्य सादर केले. प्रमुख पाहुणे उद्योजक मा. विक्रम माने व मा. अतुल इनामदार यांनी कामगारांचे समाजनिर्मितीतील अनन्यसाधारण स्थान अधोरेखित केले. प्रमुख उपस्थिती म्हणून मा. मकरंद बापट, तर विशेष उपस्थिती म्हणून मा. वसंत गुजर व डॉ. माऊली फरादे यांनी उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला. या प्रसंगी जनार्दन कांबळे, सायली धोरात, स्वानंद राजपाठक, समाधान शिंदे, संजय भगत आणि विजय चव्हाण या कामगार बांधवांचा सन्मान करून

त्यांना कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. अध्यक्ष राजन लाखे, कार्याध्यक्षा विनीता ऐनापुरे, कार्यवाह संजय जगताप आणि समस्त कार्यकारिणी मंडळाच्या पुढाकाराने आयोजित हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. सर्व साहित्यप्रेमी व कामगार बांधवांच्या सहकार्याने कार्यक्रमाला यश लाभले.

### मा. अण्णा बनसोडे यांचा सत्कार सोहळा दि. २४ मे २०२५

महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड आणि आनंद ज्येष्ठ नागरिक संघ, लिंक रोड यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक २४ मे २०२५ रोजी मा. अण्णा बनसोडे (उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र राज्य) यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे स्थळ आनंद ज्येष्ठ नागरिक संघाचे सभागृह असून सायंकाळी ५ वाजता हा सोहळा सुरू झाला. सत्कारकर्ते म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष मा. राजन लाखे यांनी अण्णा बनसोडे यांचा गौरव केला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद 'आनंद ज्येष्ठ नागरिक संघा'चे अध्यक्ष मा. ज्ञानेश्वर खेडकर यांनी भूषविले. विशेष उपस्थिती म्हणून डॉ. दिगंबर इंगोले, अध्यक्ष– 'विदर्भ सहयोग मंडळ' यांनी मार्गदर्शक संदेश दिला. अण्णा बनसोडे यांनी समाजकार्य, साहित्य, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्यांच्या समस्यांबाबत केलेल्या उपक्रमांचे कौतुक करून उपस्थितांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमानिमित्त आयोजित कवी संमेलनात कवीबंधूंनी प्रभावी काव्य सादर करत बातावरण साहित्यसुगंधी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद व आनंद ज्येष्ठ नागरिक संघाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. सर्व उपस्थित मान्यवरांचे मनःपूर्वक आभार!

### तुकाराम महाराज पालखी दर्शन सोहळ्यात मसापचा सहभाग – दि. २० जून २०२५

महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेतर्फे या वर्षीही तुकाराम महाराज पालखी वारीत सहभागी होण्याचा उत्तम उपक्रम जाहीर करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे या पवित्र वारी सोहळ्यात संस्थेचे सदस्य मोठ्या श्रद्धेने सहभागी होत असतात. देहू येथून १८ जून रोजी प्रस्थान झाल्यानंतर पालखी शुक्रवार, २० जून रोजी पहाटे आकुर्डी येथून पुढे निघते त्या अनुषंगाने मसापतर्फे पालखी दर्शन सोहळ्याचे आयोजन चिंचवड येथे सकाळी ५.४५ वाजता करण्यात आले. सर्व सदस्यांनी चिंचवड येथे वेळेवर जमून सामूहिक दर्शन घेत पिंपरीपर्यंत वारीत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. राजन लाखे (अध्यक्ष), विनीता ऐनापुरे (कार्याध्यक्ष) आणि संजय जगताप (कार्यवाह) तसेच समस्त कार्यकारिणी मंडळाने भक्तजनांना या धार्मिक उत्सवात सहभागी होण्याचे निमंत्रण दिले, आणि विठ्ठल नामस्मरणाने आणि वारी भक्तिभावाने सोहळा अधिक मंगलमय रीतीने संपन्न झाले.

### जिजाऊंच्या प्रेरणेने साजरे झाले व्याख्यान व विडंबन कविसंमेलन – दि. २४ ऑगस्ट २०२५

महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेतर्फे रविवार, दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी व्याख्यान आणि कविसंमेलनाचा सुंदर कार्यक्रम मसाप कार्यालय, बिजलीनगर, चिंचवड येथे उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात 'शिवकालीन इतिहासाला प्रकाशमान करणाऱ्या जिजाऊ, ममता आणि कर्तव्य' या विषयावर सुप्रसिद्ध शिव व्याख्यात्या मा. सुलभा सत्तुरबार यांचे प्रेरणादायी व्याख्यानाने झाली. जिजाऊंच्या संगोपनातून घडलेला छत्रपती शिवरायांचा महामानवत्वाचा प्रवास त्यांनी प्रभावी शब्दांत उलगडला. यानंतर आचार्य प्र. के. अत्रे यांच्या जयंतीनिमित्त विडंबन कविसंमेलन रंगले. विडंबनकार मा. अनिल दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली हास्यरसाची कारंजी उडाली, कार्यक्रमात सन्माननीय उपस्थिती हास्यकवी मा. बंडा जोशी यांनी राखली. त्यांच्या विनोदी कविता व मार्मिक भाष्यामुळे सभागृहात खळखळून हशा

पिकला. साहित्यिक वातावरणात गंभीरता आणि विनोद दोन्हींचे सुंदर मिश्रण लाभल्याने रसिकांनी जोरदार प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन अध्यक्ष राजन लाखे, कार्याध्यक्ष विनीता ऐनापुरे, कार्यवाह संजय जगताप तसेच संपूर्ण कार्यकारिणी मंडळ यांनी केले. एकाच मंचावर इतिहास, प्रेरणा आणि हसत-खेळत साहित्याची मेजवानी देणारा हा उपक्रम संस्मरणीय ठरला.

### शिक्षक दिनाचे औचित्य साधत शिक्षक कविसंमेलन संपन्न – दि. ७ सप्टेंबर २०२५

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड आणि प्रतिभा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनानिमित्त रविवार, ७ सप्टेंबर २०२५ रोजी भव्य शिक्षक कविसंमेलन आयोजित करण्यात आले. काळभोरनगर येथील प्रतिभा महाविद्यालयाच्या ऑडिटोरियममध्ये संध्याकाळी ५ वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अशोक पगारिया (अध्यक्ष प्रीतम प्रकाश महाविद्यालय) उपस्थित होते. त्यांनी शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व घडविण्यातील योगदान आणि साहित्यिक अभिव्यक्तीचे महत्त्व स्पष्ट केले. विशेष उपस्थितीमध्ये डॉ. राजेंद्र कांकरिया (सीईओ प्रतिभा महाविद्यालय) आणि शिवलिंग ढवळेश्वर (संस्थापक संत साई विद्यालय) यांनी साहित्य व शिक्षण याचा संगम एक संस्कारित समाज घडवितो, असे प्रतिपादन केले. यानंतर रंगलेल्या कविसंमेलनात शिक्षक कवींनी सादर केलेल्या कविता, भावुकता, विनोद, प्रेरणा आणि समाजभानाने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. शिक्षकांनी आपल्या शब्दांनी मंच भारावून टाकत ज्ञानयज्ञातील आपल्या सेवेला योग्य अभिवंदन दिले. राजन लाखे (अध्यक्ष), विनीता ऐनापुरे (कार्याध्यक्ष), संजय जगताप (कार्यवाह) तसेच मसाप कार्यकारिणी मंडळ यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. ज्ञान आणि काव्याचा सुंदर मिलाफ साधणारा हा सांस्कृतिक उपक्रम संस्मरणीय ठरला.

### विश्वास पाटील सत्कार सोहळा – दि. २३ सप्टेंबर २०२५

पिंपरी– ''मराठी भाषेची समृद्ध परंपरा जपण्यासाठी प्रत्येकाने मराठी भाषेवर प्रेम करणे ही काळाची गरज आहे,'' असे प्रतिपादन विश्वास पाटील यांनी सत्कार प्रसंगी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेतर्फे आयोजित या कार्यक्रमात औद्योगिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप पाचपुटे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

पि.चिं. मसापचे अध्यक्ष राजन लाखे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यशवंत ग्रुपचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी, डॉ. सत्यानंद धुत, ललित कानोरे आदी मान्यवरांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. मराठी भाषेचे संवर्धन हीच खरी मराठी माणसाची जबाबदारी असून, मराठी भाषेत लिहिणाऱ्या आणि वाचणाऱ्या नवीन पिढीला प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे विश्वास पाटील यांनी सांगितले.

कार्यक्रमात डॉ. गिरीश प्रभुणे यांनी मनोगत व्यक्त केले, तर अमित गोरख, डॉ. संदीप पाचपुटे, विश्वेश कुलकर्णी यांनी मनोगतातून मराठीप्रेम व्यक्त केले. अखेरीस डॉ. सत्यानंद धुत यांनी आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली. ज्ञान, संस्कृती आणि मराठी मातृभाषेच्या संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उत्स्फूर्त वातावरणात संपन्न झाला.

### दिवाळी काव्यपहाट – कविसंमेलन व अक्षरवेध अंक प्रकाशन – दि. १८ ऑक्टोबर २०२५

पिंपरी-चिंचवड येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेमार्फत 'दिवाळी काव्यपहाट' हा अनोखा साहित्य उपक्रम साजरा झाला. शनिवारी दि. १८ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी सहाच्या शुभमुहूर्तावर कार्यक्रमास सुरुवात झाली. संत तुकाराम संकुलातील शान्ता शेळके सभागृहात कवी-गझलकारांची साहित्यपर्वात रंगलेली उपस्थिती पाहायला मिळाली. 'अक्षरवेध' दिवाळी अंकाच्या प्रकाशनाचा या

कार्यक्रमात समावेश होता. या वर्षीचा अंक 'गझल विद्यापीठ सुरेश भट विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात आला. अंकाचा लोकार्पण सोहळा गझल गंधर्व मा. सुधाकर कदम यांच्या हस्ते झाला. दिवाळी उत्सवाच्या वातावरणात कविता आणि गझलांचा सुरेल संगम रंगला. रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कविसंमेलन संस्मरणीय केले. कार्यक्रमासाठी इच्छुक कवी-गझलकार नोंदणी प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी झाले. संजय जगताप यांनी या नोंदणीचे संयोजन केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेच्या कार्यकारिणीने उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. दिवाळी काव्यपहाटचा हा साहित्य सोहळा सर्जनशीलतेची नवी पहाट उजाडणारा ठरला.

**कविसंमेलन व अभिनंदन सोहळा-**
**१४ ऑक्टोबर २०२५**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड शाखा, फेडरल कमिटी व ज्येष्ठ नागरिक, रुणाल गेटवे सोसायटी, रावेत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कविसंमेलन व अभिनंदन समारंभ १४ ऑक्टोबर २०२५ रोजी संध्याकाळी ५.३० वाजता उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ हास्यकवी मा. बंडा जोशी उपस्थित होते, तर विशेष अतिथी म्हणून मसाप पिंपरी-चिंचवड अध्यक्ष मा. राजन लाखे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कविसंमेलनामध्ये विविध कवी व कवयित्रींनी आपल्या काव्यरचनांमधून प्रेक्षकांचे मन जिंकले, हास्य, शृंगार, जीवनदर्शन अशा विविध भावभावनांनी ओथंबलेल्या कविता रसिकांना मंत्रमुग्ध करून गेल्या, शब्दांच्या या महोत्सवाला उपस्थित नागरिकांनी भरभरून दाद दिली.

कार्यक्रमात पाहुण्यांचा शाल-श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. सुनील ठकरे (अध्यक्ष) व संजय आंबवले (सचिव) यानी संयोजनाची धुरा यशस्वीपणे पार पाडली. शेवटी उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**सुरेल स्वरगंध तुझ्यासाठी कार्यक्रम संपन्न-**
**१५ नोव्हेंबर २०२५**

पिंपरी चिंचवड : महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेमार्फत आयोजित 'स्वरगंध तुझ्यासाठी' हा सुरेल कार्यक्रम शान्ता शेळके सभागृह, प्राधिकरण निगडी येथे १५ नोव्हेंबर २०२५ उत्साहात पार पडला. मराठी गझल गायनाला विशेष उंची देणारे गझलगंधर्व सुधाकर कदम यांनी स्वरबद्ध केलेल्या गीत-गझलांची सुंदर मैफल या वेळी सादर झाली. या कार्यक्रमात प्रमुख गायक म्हणून मयूर महाजन व प्राजक्ता सावरकर शिंदे यांनी हृदयस्पर्शी सादरीकरण करून रसिकांना सुरेल मेजवानी दिली, तबला, हार्मोनियम, व्हायोलिन व की-बोर्डच्या साथीने सादर झालेल्या गीतांनी सभागृह मंत्रमुग्ध झाले.

सूत्रसंचालन शाहीर सुरेशकुमार वैराळकर यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष राजन लाखे होते. विनिता ऐनपुरे (कार्याध्यक्ष), संजय जगताप (कार्यवाह), तसेच उपाध्यक्ष डॉ. रजनी शेट व कोषाध्यक्ष विजय नाईक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास अनेक साहित्यसेवी, मान्यवर व रसिक प्रेक्षकांची उपस्थिती लाभली. संपूर्ण संगीत मैफलीत कलाकारांचे प्रशंसक प्रतिसादात दणदणीत टाळ्यांनी स्वागत करण्यात आले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या उपक्रमांत संगीतप्रेमींचा सहभाग वाढत असल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद,
## शाखा - डोंबिवली

**दि. ८ जून २०२५**

**इस्रो भारतीय अवकाश मोहिमा**

दि. ८ जून २०२५ रोजी, रविवारी सकाळी गणेश मंदिर संस्थान, डोंबिवली (पू) येथे 'इस्रो भारतीय

अवकाश मोहिमा' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्याते होते, 'नभवेधक' अर्चित गोखले. या वेळी चांद्रयान, मंगळयान, सूर्याकडे पाठवलेले आदित्ययान आदी विषयावर त्यांनी भाष्य केले.

या वेळी इस्रो निर्मितीमागचा प्रवास इथपासून ते इस्रोच्या भविष्यातील मोहिमांची सविस्तर माहिती त्यांनी दिली.

सकाळी १०.३० पासून सूत्रसंचालन, आभार दुपारी १२.३० पर्यंत रंगलेल्या या व्याख्यानानंतर समाधानकारक प्रश्नोत्तरांनी या व्याख्यानाची सांगता झाली.

**मुक्ताई**

रविवार, दिनांक २० जुलै २०२५ या दिवशी सकाळी १०.३० वाजता, प्रसिद्ध व्याख्यात्या सौ. आरती मुनीश्वर यांचे ब्रह्मचित्कळा 'मुक्ताई' या विषयावर व्याख्यान झाले.

संत मुक्ताबाई यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान या भावंडांच्या जीवनावरही त्यांनी प्रकाश टाकला.

मुक्ताबाई आदिमाया, आदिशक्ती, वीज होती हा संदर्भ थेट श्री कृष्ण चरित्राशी त्यांनी जोडून दाखवला.

अत्यंत प्रसन्न, रसाळ, ओघवत्या वाणीतून त्यांनी संत मुक्ताबाई यांचं जीवन भावपूर्णतेने उभे केले.

ऐकता ऐकता श्रोतेही भारावून गेले.

हा कार्यक्रम ऐकण्यासाठी रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, पाहुण्यांचा परिचय, आभार या जबाबदाऱ्या कार्यवाह उमा आवटे पुजारी यांनी पार पाडल्या.

**समग्र स्वामी विवेकानंद**

रविवार दि. २६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मंदार ओक यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

व्याख्यानाचा विषय होता 'समग्र स्वामी विवेकानंद'. विवेकानंदांचे बालपण, त्यांचा आध्यात्मिक प्रवास, शिकागो, धर्मपरिषदेतील व्याख्यान या साऱ्याचा आढावा जवळजवळ सव्वा तीन तास मंदारजींनी अत्यंत रसाळ, ओघवत्या शैलीत घेतला.

व्याख्यानाला श्रोत्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन, पाहुण्यांचा परिचय, आभार या जबाबदाऱ्या शीतल दिवेकर यांनी पार पाडल्या.

**दि. १५ ऑगस्ट २०२५ – प्रकाशन समारंभ**

१५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून प्रदीप बाळकृष्ण जोशी डोंबिवलीतील पौरोहित्य करणारे ज्यांना सगळे जोशी गुरुजी म्हणून ओळखतात त्यांच्या 'गुरुजींच्या कविता' आणि 'म्हाळसा पंचवटी' या दोन कविता-संग्रहांचे प्रकाशन मसापतर्फे करण्यात आले.


या प्रसंगी व्यासपीठावर डॉ. सतीश बडवे, श्री. नारायण लाळे, श्री. राजीव जोशी, अलकाताई मुतालिक, मसाप डोंबिवली शाखेच्या कार्यवाह श्रीमती उमा आवटे पुजारी उपस्थित होते.


या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी मिडे, हरिदास यांनी केले, तर आभार राजीव जोशी यांनी मानले. गुरुजींच्या या दोन काव्य-संग्रहांतील काही कवितांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाला रसिकांनी चांगलीच गर्दी केली होती.


## ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष
## मा. विश्वास पाटील यांचा सत्कार सोहळा








# पुस्तक सूची

- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ : रु. ५००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग २) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४ : रु. ४००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग २) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग २) : रु. ३००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग २) : रु. ८००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ३) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ४) : रु. ७००/-
- भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य : रु. ८००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड १ : रु. ५००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड २ : रु. ३००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड ३ : रु. २००/-
- म. सा. पत्रिका लेख - सूची : रु. ४००/-

## सर्व खंड २५ टक्के सवलतीत !

## महाराष्ट्र साहित्य परिषद

**डिमांड ड्राफ्टने आगाऊ पैसे पाठविल्यास संपूर्ण संच** आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस.टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.)

मागणीसाठी संपर्क : महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष : ०२०- २४४७ ५९ ६३